सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
Solapur Tarun Bharat
छत्रपती संभाजीनगर, अहमदनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित
छत्रपती संभाजीनगर गुरूवार, दि. २८ ऑगस्ट २०२५ वर्ष - तिसरे अंक १४६ पाने : ८ किंमत रु. ६/- www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

## गणेशोत्सवानिमित्त दोन्ही भाऊ एकत्र येत असतील तर ती चांगली गोष्ट : मुख्यमंत्री फडणवीस

मुंबई : मराठी भाषा आणि मराठी लोकांसाठी एकत्र आलेल्या ठाकरे बंधूंची गेल्या काही दिवसांपासून महाराष्ट्राच्या राजकीय वर्तुळात जोरदार चर्चा आहे. मराठी भाषेसाठी ५ जुलैला विजयी मेळव्यात तब्बल २० वर्षांनंतर राज ठाकरे आणि उद्धव ठाकरे एकत्र आले होते. राज ठाकरे यांनी बाळासाहेब यांची साथ सोडल्यानंतर ही पहिलेच बंधू भेट होती. त्यानंतर उद्धव ठाकरे यांच्या वाढदिवसाच्या निमित्ताने राज ठाकरे त्यांच्या घरी गेले होते. तसं तर राज ठाकरे हे उद्धव ठाकरेंची प्रकृती ठिक नसताना त्यांना भेटण्यासाठी घरून हॉस्पिटलला घेऊन जाण्यासाठी सारथी म्हणून आले होते. पण राज ठाकरेंनी बाळासाहेब ठाकरे आणि शिवसेनेची साथ सोडल्यानंतर राज ठाकरेंच्या दादरमधील घरी कधीही पाऊल ठेवले नव्हते.



तब्बल २२ वर्षांनंतर गणेशोत्सवानिमित्त उद्धव ठाकरे सह कुटुंब राज ठाकरे यांच्या शिवाजी पार्कमधील घरी बाप्पाचा दर्शनासाठी गेले होते. उद्धव ठाकरे, आदित्य ठाकरे, रश्मी ठाकरे यांनी बाप्पाची पूजा करुन आशिर्वाद घेतले. राज ठाकरे यांच्याकडे दीड दिवसांचा बाप्पा असतो. त्यामुळे उद्धव ठाकरे यांनी गणेश चतुर्थीलाच राज ठाकरेंच्या निवासस्थानी जाऊन गणरायाचे दर्शन घेतले.

दरम्यान, २००३ मध्ये श्रीकांत ठाकरे यांच्या निधनाच्यावेळी उद्धव ठाकरे हे राज ठाकरेंच्या कृष्णकुंज या आधीच्या निवासस्थानी आले होते. गेल्या काही दिवसांमध्ये राज ठाकरे आणि उद्धव ठाकरे यांची ही तिसरी भेट आहेत. तर राज आणि



उद्धव ठाकरे यांची भेट आगामी मुंबई महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर हे राजकीयदृष्ट्या अतिशय महत्त्वाची मानली जातेय.

गणेशोत्सवानिमित्त राज ठाकरे आणि उद्धव ठाकरे यांच्या भेटीवर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी प्रतिक्रिया दिलीय. ते म्हणाले की, आज गणेशोत्सवानिमित्त दोन्ही भाऊ एकत्र येत असतील तर ती चांगली गोष्ट आहे. बाप्पा दोन्ही भावांना एकत्र राहण्याची सद्बुद्धी देवो. दरम्यान, राज ठाकरे आणि उद्धव ठाकरे यांनी एकत्र यावं, यासाठी मुंबईतील गिरगाव परिसरात काही ठिकाणी पुन्हा एकदा दोन्ही भावांनी मराठी माणसाच्या हितासाठी एकत्र यावं, अशा आशयाचे पोस्टर्स लावले होते.

## पंजाबमध्ये पुराचा हाहाकार, नवोदय विद्यालयात ४०० मुले अडकली

गुरुदासपूर: पंजाबमध्ये गेल्या काही दिवसांपासून सुरू असलेल्या मुसळधार पावसामुळे आणि हिमाचल व जम्मू-काश्मीरमधून आलेल्या पुराच्या पाण्यामुळे अनेक भागांत पूरस्थिती गंभीर झाली आहे. या पुराचा मोठा फटका गुरुदासपूर जिल्ह्यातील जवाहर नवोदय विद्यालयाला बसला असून, शाळेचा संपूर्ण परिसर पाण्याखाली गेला आहे. यामुळे सुमारे ४०० विद्यार्थी आणि ४० कर्मचारी तिथे अडकले आहेत.

ही शाळा गुरुदासपूरपासून १२ किलोमीटर अंतरावर असलेल्या डाबुरी गावात आहे. तळमजल्यावरील वर्गखोल्या पूर्णपणे पाण्याने भरल्या असून, रस्ते खराब झाल्याने मदतकार्य पोहोचण्यास अडचणी येत आहेत. सध्या जिल्ह्याचे अधिकारी मुख्यमंत्री भगवंत मान यांच्या कार्यक्रमात व्यस्त असल्याने बचावकार्य सुरू होण्यास विलंब होत असल्याचा आरोप स्थानिकांनी केला आहे.



प्रशासनावर हलगर्जीपणाचा आरोप जवाहर नवोदय विद्यालय ही केंद्र सरकारची निवासी शाळा असल्यामुळे विद्यार्थ्यांना घरी पाठवण्यात आले नव्हते. मात्र, पुराची शक्यता तीन दिवसांपासून माहीत असतानाही मुलांना सुरक्षित का हलवले नाही, असा संतप्त सवाल पालकांनी विचारला आहे. प्रशासनाने संपूर्ण जिल्ह्यातील शाळांना तीन दिवसांची सुट्टी दिली असताना, या निवासी शाळेतील मुलांना घरी का पाठवले नाही, याबद्दल त्यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली आहे.

१९८८ च्या महापुरातही अशीच परिस्थिती निर्माण झाली होती, परंतु सध्याची परिस्थिती त्यावेळेपेक्षा अधिक गंभीर असल्याचा दावा केला जात आहे. शाळेजवळचा नाला गेल्या अनेक महिन्यांपासून साफ न केल्यामुळे पाणी थेट वस्तीमध्ये शिरल्याचा आरोपही करण्यात आला आहे. यामुळे प्रशासनाच्या हलगर्जीपणाविरोधात नागरिकांमध्ये संताप वाढत आहे.

## गडचिरोली येथे चकमकीत ४ नक्षलवादी ठार

गडचिरोली., २७ ऑगस्ट : नक्षलग्रस्त गडचिरोली जिल्ह्यातील कोपर्शीच्या जंगलात झालेल्या चकमकीत सुरक्षा दलांनी ४ नक्षलवाद्यांना ठार केले आहे.यासंदर्भातील माहितीनुसार गडचिरोली-नारायणपूर सीमेवरील कोपर्शी जंगल परिसरात गडचिरोली विभागाचे गट्टा दलम, कंपनी क्रमांक १० व इतर माओवादी दबा धरून बसले असल्याची विश्वासार्ह गोपनीय माहिती मिळाल्यानंतर अपर पोलीस अधीक्षक अभियान श्री. एम. रमेश यांचे नेतृत्वाखाली सी-६० ची १९ पथके आणि सीआरपीएफ क्यूएटीची २ पथके सदर जंगल परिसरात रवाना करण्यात आली होती. या भागात सुरू असणाऱ्या प्रचंड पावसादरम्यान दोन दिवसानंतर पोलीस पथके आज सकाळी सदर जंगल परिसरात पोहोचून शोध मोहीम राबवत असताना माओवाद्यांनी पोलीस पथकांवर अंदाधुंद गोळीबार सुरू केला, ज्याला पोलीस पथकाने प्रभावी प्रत्युत्तर दिले. सुमारे ८ तास चाललेल्या चकमकीनंतर सदर परिसरात शोध घेतला असता एकूण ४ जहाल माओवाद्यांचे मृतदेह (१ पुरुष आणि ३ महिला) आढळून आले आहेत. याशिवाय घटनास्थळावरून एक एसएलआर रायफल, २ इन्सास रायफल आणि एक थ्री-नॉट-थ्री रायफल जप्त करण्यात आली आहे.

## ढोल-ताशाच्या गजरात राज्यभर बाप्पाचे आगमन; पहिल्या दिवशी उत्साहाचा माहोल

मुंबई, २७ ऑगस्ट - राज्यात आज गणेशोत्सवाचा पहिला दिवस मोठ्या जल्लोषात साजरा होत असून ढोल-ताशांच्या गजरात आणि पारंपरिक वाद्यांच्या निनादात बाप्पाचे आगमन ठिकठिकाणी सुरू आहे. घराघरांत तसेच विविध मंडळांत उत्साह ओसंडून वाहतो आहे. गणपती बाप्पा मोरया, मंगलमूर्ती मोरयाच्या गजरात मानाच्या गणपतींच्या मिरवणुका निघाल्या असून भाविक भक्तिभावात न्हाऊन निघाले आहेत.

मुंबईत लालबागच्या राजाचे दर्शन घेण्यासाठी पहिल्याच दिवशी प्रचंड गर्दी झाली आहे. लालबाग-परळ परिसर गर्दीने फुलून गेला असून दर्शनासाठी भलीमोठी रांग लागली आहे. गणेश गल्ली सार्वजनिक उत्सव मंडळाने यंदा रामेश्वरममधील रामनाथ स्वामी



मंदिराची भव्य प्रतिकृती उभारली असून आध्यात्मिक व सांस्कृतिक थाटामुळे या उत्सवाला विशेष भव्यता प्राप्त झाली आहे. देशातील सर्वात श्रीमंत गणेश म्हणून ओळखल्या जाणाऱ्या जीएसबी सेवा मंडळाचा यंदा ७१ वा वर्ष आहे. या मंडळाने बाप्पाच्या मूर्तीचा ६९ किलो सोनं आणि ३६५ किलो चांदीने शृंगार केला आहे. तब्बल ४७४ कोटींचा विमा काढण्यात आला असून भाविकांच्या सुरक्षेची विशेष काळजी घेतली जात आहे. चिंचपोकळीच्या चिंतामणीची विधिवत प्राणप्रतिष्ठापना संपन्न झाली असून बाप्पाच्या दर्शनाला सुरुवात झाली आहे. चिंचपोकळी सार्वजनिक उत्सव मंडळाचं यंदाचं १०६ वं वर्ष असून यंदा मंडळाने छत्रपती संभाजी महाराजांच्या राज्याभिषेकाचा देखावा साकारला आहे. तळकोकणात लाडक्या बाप्पाचं घरोघरी आज आगमन होत आहे. कुणी डोक्यावर बाप्पाला घेऊन घरी आले आहेत, तर कुणी पालखीतून लाडक्या बाप्पाला घरी घेऊन जातानाचं दृश्य पाहायला मिळतंय.

## ऑपरेशन सिंदूरने समाधान तर ऑपरेशन महादेवने आत्मविश्वास दिला - अमित शाह

नवी दिल्ली , २७ ऑगस्ट : ऑपरेशन सिंदूर आणि ऑपरेशन महादेव यांनी दहशतवादी नेतृत्वाला भारतीय नागरिकांच्या जीवाशी खेळण्याचे गंभीर परिणाम काय असतात, हे स्पष्टपणे दाखवून दिले आहे. ऑपरेशन सिंदूरमुळे जनतेमध्ये समाधान निर्माण झालं, तर ऑपरेशन महादेवने ते समाधान आत्मविश्वासात रूपांतरित केलं, असे विधान केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी आज (दि.२७) दिल्लीमध्ये ऑपरेशन महादेवमध्ये सहभागी झालेल्या जवानांचा सन्मानित करताना केले. अमित शाह म्हणले कि, ऑपरेशन सिंदूर आणि महादेव यांनी दहशतवाद्यांना भारतीय नागरिकांशी छेडछाड केल्यास काय परिणाम होऊ शकतो, हे स्पष्टपणे दाखवून दिलं आहे. गृहमंत्र्यांनी सांगितले की, सैन्यदलांनी जगाला दाखवून दिलं आहे की, दहशतवादी कितीही रणनीती आखल्या, तरी ते भारताला इजा पोहोचवून सुटू शकणार नाहीत. ऑपरेशन सिंदूरमुळे जनतेमध्ये समाधान निर्माण झालं, तर ऑपरेशन महादेवने ते समाधान आत्मविश्वासात रूपांतरित केलं. शाह म्हणाले की, काश्मीरमध्ये पर्यटन शिखरावर असताना, पहलगाम हल्ला 'काश्मीर मिशन'ला विचलित करण्याचा एक अयशस्वी प्रयत्न होता. आज भारतीय सैन्य, अर्धसैनिक दल आणि जम्मू-कश्मीर पोलीस हे सर्व दहशतवादाविरोधातील लढाईत आघाडीवर आहेत. गृहमंत्री म्हणाले, सत्ताधारी असो वा विरोधक, सर्वांनी ऑपरेशन सिंदूर आणि महादेवबद्दल आनंद आणि गर्व व्यक्त केला आहे आणि सुरक्षा दलांचे आभार मानले आहेत. त्यांनी असेही नमूद केले की राष्ट्रीय सुरक्षेवरील हा विश्वासच भारताच्या जागतिक नेतृत्वाच्या आकांक्षेचा आधार आहे. शाह म्हणाले की, राष्ट्रीय तपास यंत्रणा (एनआयए) च्या फॉरेन्सिक लॅबने सिद्ध केले आहे की, ऑपरेशन महादेवमध्ये ठार करण्यात आलेले दहशतवादी तेच होते ज्यांनी पहलगाम हत्याकांड घडवले होते. गृहमंत्र्यांनी शेवटी म्हटले, पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि संपूर्ण देशाच्या वतीने, भारतीय नागरिकांच्या मनात सुरक्षेची भावना अधिक दृढ करण्यासाठी मी सर्व सुरक्षा दलांचे अभिनंदन करतो. २२ एप्रिल रोजी पहलगाममध्ये झालेल्या हल्ल्यात २६ निष्पाप नागरिकांची निर्दय हत्या करण्यात आली होती. याच्या प्रत्युत्तरात, सुरक्षा दलांनी मे महिन्यात ऑपरेशन सिंदूर राबवले, ज्यामध्ये पाकिस्तान आणि पाकिस्तानव्याप्त काश्मीरमधील दहशतवादी तळांवर आणि लष्करी ठिकाणांवर जोरदार कारवाई करण्यात आली. याचप्रमाणे, ऑपरेशन महादेव अंतर्गत जुलै महिन्यात पहलगाम नरसंहारात सहभागी असलेल्या दहशतवाद्यांचा पूर्णपणे खात्मा करण्यात आला.

## वैष्णोदेवी यात्रा मार्गावर दरड कोसळून पाच जणांचा मृत्यू

जम्मू : जम्मू-काश्मीरमध्ये ढगफुटी आणि सततच्या मुसळधार पावसामुळे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. अनेक भागांत पूर आला आहे. जम्मूतील नद्यांनी धोक्याची पातळी ओलांडली आहे. वैष्णोदेवी यात्रा मार्गावर दरड कोसळून पाच जणांचा मृत्यू झाला आणि १४ जण जखमी झाले आहेत. जखमींना तातडीने कटरा येथील रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले आहे. जमीन खचल्यामुळे वैष्णोदेवी यात्रा पुढील आदेशापर्यंत स्थगित करण्यात आली आहे. अर्द्धकुमारीजवळ दरड कोसळली आणि जीवितहानी झाली. घटनास्थळी मदतकार्य सुरू आहे.

जम्मू-काश्मीरमध्ये सततच्या पावसामुळे रियासी जिल्ह्यातील त्रिकुटा टेकड्यांवर असलेल्या माता वैष्णो देवी मंदिराच्या मार्गावर मंगळवारी दुपारी भूस्खलन झाले. या अपघातात अनेक जण जखमी झाले. अधिकाऱ्यांनी सांगितले की, या घटनेनंतर प्रसिद्ध मंदिराची तीर्थयात्रा थांबवण्यात आली आहे. अर्द्धकुमारी येथील इंद्रप्रस्थ भोजनालयाजवळ दुपारी ३ वाजता भूस्खलन झाले. अधिकाऱ्यांनी सांगितले की, डोंगरावर असलेल्या मंदिराकडे जाणाऱ्या बारा किलोमीटरच्या वळणावळणाच्या मार्गावर साधारणपणे अर्ध्या वाटेवर ही घटना घडली.

हिमकोटी मार्गावरील यात्रा सकाळपासूनच स्थगित करण्यात आली होती. पण दुपारी दीड वाजेपर्यंत जुन्या मार्गावरील यात्रा सुरू होती. मात्र, मुसळधार पावसाच्या पार्श्वभूमीवर अधिकाऱ्यांनी पुढील आदेश येईपर्यंत या मार्गावरील यात्राही स्थगित केली आहे. डोडा येथे ढगफुटीमुळे तवी नदीने रौद्र रूप धारण केले आहे. सततच्या जोरदार पावसामुळे जलाशयांमध्ये पाणी साचल्याने चौथ्या तवी पुलाजवळील रस्ता वाहून गेला आहे. डोडा येथे पाऊस आणि पुरामुळे चार लोकांचा मृत्यू झाला आहे.

अनेक भागांतील घरांचे आणि इतर मालमत्तांचे मोठे नुकसान झाले आहे. जिल्हा प्रशासन हाय अलर्टवर आहे. बचाव व मदतकार्य सुरू आहे. अधिकाऱ्यांनी रहिवाशांना, विशेषतः सखल आणि डोंगराळ भागांत राहणाऱ्या लोकांना, थांबून-थांबून होत असलेल्या पावसामुळे सतर्क राहण्याचे आवाहन केले आहे. जम्मू विभागातील सर्व सरकारी आणि खासगी शाळांना २७ ऑगस्टपर्यंत सुट्टी जाहीर करण्यात आली आहे. जम्मू-श्रीनगर राष्ट्रीय महामार्गावरील वाहतूकही खबरदारीचा उपाय म्हणून थांबवण्यात आली आहे. हवामान विभागाकडून 'रेड अलर्ट' जारी करण्यात आला असून, लोकांना सतर्क राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

## जरांगे पाटलांच्या नेतृत्वाखाली शेकडो मराठा मुंबईच्या दिशेने रवाना

मुंबई: गेल्या काही वर्षापासून मराठा आरक्षणाचा प्रश्न अद्याप सुटत नसल्याकारणामुळे, मनोज जरांगे पाटील यांच्या नेतृत्वाखाली शेकडोच्या संख्येने मराठा समूह मुंबईच्या दिशेने रवाना झाले आहेत. हाती आलेल्या महितीनुसार जरांगे पाटील अंतरवाली सराटी येथून निघाले असून, थोड्याच वेळात ते शहागड येथे दाखल होणार आहेत.आशाप्रकारे ते येत्या २८ ऑगस्ट रोजी ते मुंबईत पोहोचणार आहेत. मराठ्यांना ओबीसी प्रवर्गातून आरक्षण मिळावे या मागणीसाठी जरांगे आंदोलन करणार आहेत.

सध्या मुंबईत गणेशोत्सवाची धामधूम सुरू असताना, ठरल्याप्रमाणे २८ ऑगस्ट रोजी मराठा समूह मुंबईत धडकण्याची शक्यता आहे. त्यामुळे, वाहतूक व्यवस्था आणि गर्दीचे व्यवस्थापन करण्याचे मोठे आव्हान प्रशासनापुढे उभे आहे. सध्या जरांगे पाटलांना ग्रामीण भागातून प्रचंड प्रतिसाद मिळत असून, ते ज्या ज्या मार्गाहून जाणार आहेत, तिथे त्यांचे स्वागत होताना दिसून येत आहे. नुकतीच हातात आलेल्या माहितीनुसार, जरांगे शहागड येथे पोहोचणार आहेत. त्यामुळे त्यांच्या स्वागतासाठी मोठा क्रेन उभा करण्यात आला असून त्यांचे जंगी स्वागत केले जाणार आहे. यानंतर ते शहागड मधून पैठण आणि पुढे मुंबईच्या दिशेने रवाना होणार आहेत.

मनोज जरांगे पाटील वडीगोद्री फाट्यावरून मुंबईकडे रवाना होत आहे. त्यांचा पहिला मुक्काम हा जुन्नर येथे होणार आहे. शहागडवरून हा मोर्चा जुन्नरकडे जाणार आहे. पुढे मुंबईत हा मोर्चा दाखल होईल.

आपण आश्वासने विसरत नाही...
मग आपण पॉलिसी प्रीमियम का विसरावा?



भारतीय आयुर्विमा महामंडळ सादर करत आहे विशेष पॉलिसी पुनरुज्जीवन मोहिम विलंब शुल्क सवलती सह.

कालावधी 18/08/2025 ते 17/10/2025

त्वरा करा! ही संधी सोडू नका.
तुमचं विमा संरक्षण पुन्हा मिळवण्याची आणि त्याचा लाभ सतत मिळवत राहाण्याची संधी.

| एकूण देय प्रीमियम | % विलंब शुल्कात सवलत | सवलतीची कमाल मर्यादा* |
|---|---|---|
| ₹1,00,000 पर्यंत | 30% | ₹3000 |
| 1,00,001 ते 3,00,000 पर्यंत | 30% | ₹4000 |
| 3,00,001 आणि जास्त | 30% | ₹5000 |

*नियम आणि अटी लागू
पॉलिसी अदा न केलेल्या पहिल्या प्रीमियमच्या तारखेपासून 5 वर्षांच्या आत पुन्हा सुरू करता येईल.
कृपया जवळच्या एलआयसी शाखेमध्ये किंवा एजंटला संपर्क साधा. आमच्या सोबत रहा. एलआयसीमध्ये स्वतःचा मोबाइल नंबर, ईमेल, एनईएफटी आणि पॅन नंबर अपडेट करा.

डाऊनलोड करा एलआयसी मोबाईल ऍप LIC digital
भेट द्या:licindia.in
कॉल सेंटर सेवा (022) 6827 6827
IRDAI Regn No.: 512
अधिक माहितीसाठी आपल्या एजंटला/जवळच्या एलआयसी शाखेला संपर्क करा किंवा तुमच्या शहराचे नाव 56767474 ला SMS करा
आम्हाला फॉलो करा: LIC India Forever
आमचा वॉट्सअ‍ॅप नं. 8976862090 बोला 'Hi'
बनावट फोन कॉल्सपासून आणि खोट्या/फसव्या ऑफर्सपासून सावध राहा. आयआरडीएआय किंवा त्यांचे अधिकारी विमा पॉलिसींची विक्री, बोनस जाहीर करणे किंवा प्रिमियमची गुंतवणूक, रकमा परत करणे यासारख्या विमा व्यवसायाशी संबंधित कोणत्याही कामकाजात सहभाग होत नाहीत, अशा प्रकारचे दूरध्वनी येणाऱ्या पॉलिसीधारकांनी अथवा संभाव्य ग्रहकांनी पोलिसांकडे तक्रार नोंदवावी. जोखीम घटकांवर, नियम व अटींवर अधिक माहिती मिळवण्यासाठी, कृपया विक्री समाप्त करण्यापूर्वी विक्री पुस्तिका काळजीपूर्वक वाचून घ्या.
LIC भारतीय आयुर्विमा महामंडळ LIFE INSURANCE CORPORATION OF INDIA
प्रत्येक क्षणी तुमच्या सोबत
LIC / MI / 2025-26 / 15 / Mar

## राष्ट्ररक्षा

ब्रिगेडियर हेमंत महाजन
९०९६७०१२५३

# भारताच्या सामरिक सुरक्षेतील नवा अध्याय

# ड्रोन-हल्लेविरोधी कवच



पाकिस्तानचे सैन्यप्रमुख जनरल आसिम मुनीर यांनी नुकतेच अमेरिकेच्या भूमीवरून भारताला धमकी दिली की, भारत-पाकिस्तानमध्ये अणुयुद्ध होऊ शकते. त्यांच्या या विधानामुळे जागतिक समुदायामध्ये चिंता निर्माण झाली आहे. त्यांनी भारतावरील हल्ल्याचा उल्लेख करताना विशेषतः जामनगर (गुजरात) येथील जगातील सर्वात मोठ्या रिफायनरी प्रकल्पावर ( क्षमता - सुमारे १.२४ दशलक्ष बॅरल प्रतिदिन) ड्रोन आणि क्षेपणास्त्रांच्या मदतीने हल्ला करण्याची धमकी दिली. यामुळे भारताच्या सामरिक व औद्योगिक केंद्रांवर ड्रोन-हल्ल्याचा धोका गंभीर आहे, हे पुन्हा एकदा समोर आले आहे.

### ड्रोन युद्धाचा वाढता वापर

आजच्या आधुनिक युद्धात ड्रोन्स हे सर्वात प्रभावी व स्वस्त शस्त्र बनले आहेत. रशिया-युक्रेन युद्ध याचे स्पष्ट उदाहरण आहे. २०२२ पासून सुरू झालेल्या या संघर्षात रशियाने हजारो 'कामीकाझे' ड्रोन वापरले आहेत, तर युक्रेनने अमेरिकेचे स्विचब्लेड आणि स्वदेशी बनावटीचे ड्रोन हल्ल्यांसाठी तैनात केले आहेत. अंदाजानुसार, दर महिन्याला दोन्ही देशांकडून किमान १,००० ते १,५०० ड्रोन-हल्ले घडवले जातात, ज्यामुळे वीज केंद्रे, धरणे, रेल्वे-स्टेशन्स, तेलसाठे यांचे प्रचंड आर्थिक नुकसान झाले आहे.

याशिवाय, दहशतवादी गटांनी रेड सी आणि सुएझ कालवा परिसरातील आंतरराष्ट्रीय जहाजांवर वारंवार ड्रोन व क्षेपणास्त्र हल्ले केले. जागतिक ऊर्जा पुरवठ्यापैकी जवळपास १२ टक्के कच्चे तेल या मार्गांवरून वाहून नेले जाते, त्यामुळे अशा हल्ल्यांचा थेट परिणाम जागतिक अर्थव्यवस्थेवर व भारताच्या युरोपशी होणाऱ्या व्यापाराशी होतो.

### भारतावरील थेट धोका

भारताच्या बाबतीत, पाकिस्तान गेल्या काही वर्षांत पंजाब सीमेतून मोठ्या प्रमाणात ड्रोनद्वारे अफू, गांजा, चरस व शस्त्रे घुसवण्याचे प्रयत्न करत आहे. २०२३ मध्येच पंजाब पोलिसांनी आणि बीएसएफने मिळून ५०० हून अधिक ड्रोन भारतीय सीमेवर जप्त केले, ही संख्या २०१९ च्या तुलनेत तब्बल अनेक पट जास्त आहे. हे आकडे या धोक्याची तीव्रता अधोरेखित करतात. आता पाकिस्तानकडून जर भारताच्या सामरिक ठिकाणांवर - जसे की रिफायनरी, विमानतळ, डेटा-सेंटर्स, अणुवीज प्रकल्प किंवा मोठी शहरे यांना हल्ल्याचा धोका निर्माण झाला, तर त्यांचा प्रतिकार करण्यासाठी एक अत्याधुनिक संरक्षण-व्यवस्था आवश्यक आहे.

### पंतप्रधान नरेंद्र मोदींची घोषणा

याच पार्श्वभूमीवर, १५ ऑगस्ट २०२५ रोजी लाल किल्ल्यावरून स्वातंत्र्यदिन भाषण करताना पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी भारताच्या राष्ट्रीय सुरक्षेसाठी 'ड्रोन व क्षेपणास्त्रविरोधी संरक्षण कवच' उभारण्याची महत्त्वाकांक्षी योजना जाहीर केली. त्यांनी स्पष्ट केले की पुढील दहा वर्षांत भारतातील सर्व महत्त्वाची सामरिक केंद्रे आधुनिक ॲण्टी-एअरक्राफ्ट आणि ॲण्टी-ड्रोन प्रणालीखाली आणली जातील.

ही योजना टप्प्याटप्प्याने राबवली जाणार असून, प्रथम टप्प्यात सीमाभाग, रिफायनऱ्या व मोठी शहरे कव्हर केली जातील. २०३५ पर्यंत पूर्ण भारतावर बहुस्तरीय हवाई सुरक्षा कवच (मल्टी लेयर्ड एअर डिफेन्स शिल्ड) उभारण्याचे लक्ष्य आहे. आजच्या जगात ड्रोन हे फक्त गुप्तचर साधन न राहता थेट युद्धसामग्री झाले आहेत. पाकिस्तानकडून आलेल्या धमक्या, रशिया- युक्रेन युद्धातील अनुभव, तसेच पश्चिम आशियातील जहाजांवरील हल्ले हे दाखवतात की भारताला सर्वसमावेशक व स्वदेशी हवाई संरक्षण व्यवस्था उभारणे ही काळाची गरज आहे.

ड्रोन्स, सायबरहल्ले आणि भू-राजकीय संघर्ष यांच्या संगमामुळे आज भारताच्या ऊर्जा सुरक्षेचे स्वरूप बदलले आहे. ऊर्जा पायाभूत संरचना, बंदरे, पाईपलाइन, रिफायनरी आणि वीज वितरण व्यवस्था यांना आता लष्करी धोक्यांचा सामना करावा लागत आहे. मे २०२५ मधील ऑपरेशन सिंदूर या कारवाईदरम्यान भारताच्या पश्चिम आणि उत्तरेकडील सीमेजवळील ऊर्जा केंद्रे शत्रूच्या हल्ल्यांच्या कक्षेत असल्याचे स्पष्ट झाले. यामुळे ऊर्जा सुरक्षिततेला राष्ट्रीय संरक्षणाच्या चौकटीत आणणे अपरिहार्य आहे.

युद्धाचे स्वरूप बदलत आहे. पारंपरिक शस्त्रास्त्रांऐवजी आता मानवरहित ड्रोन, सायबर साधने आणि माहिती युद्ध यांचा वापर वाढतो आहे.

### ड्रोनहल्ल्यांची उदाहरणे:

- १६ जुलै २०२५ रोजी इराकच्या कुर्दिस्तानमधील तीन तेलक्षेत्रांवर स्फोटक ड्रोन्सद्वारे हल्ला झाला.
- रशिया-युक्रेन युद्धात युक्रेनने रशियाच्या इंधन संरचना लक्ष्य केल्या.
- इस्रायल-इराण संघर्षादरम्यान इस्रायलने इराणच्या साऊथ पार्स गॅस क्षेत्रावर हल्ला केला, तर इराणने प्रत्युत्तरादाखल हायफा रिफायनरी लक्ष्य केली.
- २०१९ मध्ये येमेनमधील हूथी बंडखोरांनी सौदी अरेबियाच्या अब्कैक व खुरैस येथील तेल प्रक्रिया केंद्रांवर मोठा ड्रोनहल्ला केला. या घटनांमुळे ऊर्जा केंद्रे थेट युद्धभूमीचे लक्ष्य बनू शकतात हे अधोरेखित झाले.

### जागतिक आर्थिक परिणाम

इराण-इस्रायल संघर्षानंतर ब्रेंट क्रूडचे दर केवळ एका आठवड्यात ७ टक्क्यांनी वाढून ७४ डॉलर प्रति बॅरलवर पोहोचले. आंतरराष्ट्रीय विमा कंपन्यांनी आखाती भागातील जहाजांसाठी युद्धजोखमी विमा दर ०.२-- ०.३ टक्क्यांवरून ०.५ टक्क्यापर्यंत दुप्पट वाढवले. एका प्रवासासाठी हजारो डॉलर्सचा अतिरिक्त खर्च उभा राहिला.

### सायबर हल्ल्यांचे वाढते प्रमाण

ऊर्जा सुरक्षेला मोठा धोका आता सायबर हल्ल्यांमुळे आहे.

**आंतरराष्ट्रीय चित्र:** अमेरिकेतील कोलोनियल पाईपलाईन (२०२१) वर झालेल्या रॅन्समवेअर हल्ल्यामुळे देशाच्या पूर्व किनाऱ्यावरील ४५ टक्के इंधन पुरवठा ठप्प झाला.सायबरसुरक्षा कंपनी सोहोसच्या अहवालानुसार २०२४ मध्ये जगभरातील ऊर्जा, तेल-गॅस व युटिलिटी क्षेत्रांपैकी ६७ टक्के संस्थांवर रॅन्समवेअर हल्ले झाले.

**भारतातील आकडे :** भारत आपले ८८ टक्के कच्चे तेल आणि ५० टक्के एलएनजी आयात करतो, त्यामुळे कोणताही अडथळा थेट अर्थव्यवस्थेवर परिणाम करतो.

२०२२ मध्ये भारतातील पेट्रोलियम रिफायनऱ्यांवर ३.२ लाखांहून अधिक सायबरहल्ले नोंदले गेले.

एप्रिल २०२५ मधील पहलगाम दहशतवादी हल्ल्यानंतर भारतावरील डीडीएस हल्लूयांमध्ये मोठी वाढ झाली. त्यातील ६६ टक्के हल्ले ऊर्जा क्षेत्रावर केंद्रित होते.

कोल इंडिया लिमिटेडच्या उपकंपनीवर हॅकिंगचा प्रयत्न झाला, तर २०२० आणि २०२२ मध्ये चीनशी संबंधित सायबर गटांनी मुंबई व लडाखमधील वीज वितरण व्यवस्थेत मालवेअर बसवले. ही आकडेवारी दर्शवते की भारताच्या ऊर्जा क्षेत्रावरील सायबर संरक्षण अद्याप अपुरे आहे.

### ऊर्जा सुरक्षेवर धोरणात्मक लक्ष हवे

भारताची वाढती अर्थव्यवस्था ऊर्जा आयातीवर प्रचंड अवलंबून आहे.

- देशातील एकूण तेल आयातीपैकी ४० टक्के तेल हार्मुझ सामुद्रधुनीमार्गे येते. या मार्गात अडथळा निर्माण झाला तर आर्थिक संकट उभे राहते.
- ऑपरेशन सिंदूर दरम्यान भारताने ६०० हून अधिक ड्रोन आणि क्षेपणास्त्र अडवले, यापैकी ४० टक्के हल्ले गुजरात व राजस्थानकडे होते.
- पंजाबमधील सीमावर्ती भागांत वीजपुरवठा बंद करून इंधन पाईपलाइन व वितरण यंत्रणा वाचवावी लागली. यावरून स्पष्ट होते की ऊर्जा सुरक्षेला संरक्षणाच्या चौकटीत प्राथमिकता दिली जावी .

### अपुरी आणिबाणी साठवण व्यवस्था

ऊर्जा सुरक्षेसाठी भारताने स्ट्रॅटेजिक पेट्रोलियम रिजर्व्ह (एसपीआर) उभारले आहेत. पण त्यात त्रुटी आहेत:

- २०२४ च्या सुरुवातीला एसपीआरमध्ये फक्त ५.३३ दशलक्ष टन तेल होते, जे भारताच्या आयातीच्या ९.५ दिवसांसाठी पुरेसे आहे.
- सार्वजनिक तेल कंपन्यांच्या साठ्यासह ही वेळ ७४ दिवसांपर्यंत जाते, पण आणीबाणीच्या वेळी केवळ एसपीआर साठाच तातडीने वापरता येतो.
- आंतरराष्ट्रीय ऊर्जा संस्थेच्या निकषानुसार ९० दिवसांचा साठा आवश्यक आहे. मात्र, भारताकडे प्रत्यक्षात त्याची पूर्तता नाही. कारण यावर खर्च खूप होतो.
- विद्यमान एसपीआर केंद्रे विशाखापट्टणम, मंगळूर आणि पडूर येथे समुद्रकिनाऱ्यावर आहेत. त्यामुळे ती क्षेपणास्त्र हल्ल्यांना व नैसर्गिक आपत्तीपासून असुरक्षित आहेत.

ऊर्जा क्षेत्राला केवळ व्यावसायिक नाही तर लष्करी सुरक्षेच्या चौकटीत समाविष्ट करणे आवश्यक आहे.

- **विकेंद्रीकरण:** सीमावर्ती भागांत मायक्रोग्रीड्स व नूतन ऊर्जा प्रणाली उभारल्यास केंद्रित वितरण यंत्रणांवरील अवलंबन कमी होईल.
- **सायबर संरक्षण:**२०२४ मध्ये भारताने सीएसआयआरटी- पॉवर स्थापन केले आहे. मात्र, पुढे एआय आधारित धोका ओळख प्रणाली, झिरो ट्रस्ट आर्किटेक्चर आणि रेड टीम सिम्युलेशन वापरणे आवश्यक आहे.जुनी एससीएडीए प्रणाली तातडीने अपग्रेड करणे गरजेचे आहे.
- **लवचिक साठवण :** एसपीआर सोबतच देशांतर्गत साठवण केंद्रे, खासगी सहभाग आणि मजबूत पाईपलाइन नेटवर्क उभारणे आवश्यक आहे.
- **लष्करी देखरेख :** ऊर्जा केंद्रांच्या सुरक्षेसाठी ड्रोनविरोधी प्रणाली, क्षेपणास्त्र संरक्षण व लष्करी पॅट्रोलिंग वाढवणे गरजेचे आहे.

**निष्कर्ष :** ड्रोन्स, सायबरहल्ले आणि भू-राजकीय संघर्ष यांच्या संगमामुळे भारताच्या ऊर्जा सुरक्षेला बहुआयामी धोके निर्माण झाले आहेत. आयातीवरील प्रचंड अवलंबन, अपुरे एसपीआर, सायबरहल्ल्यांचे वाढते प्रमाण आणि सीमावर्ती भागातील केंद्रांची असुरक्षितता ही गंभीर आव्हाने आहेत. भारतातील ऊर्जा टिकाव धोरणात्मक स्वायत्ततेचा पाया आहे. भारतापुढे मार्ग आहेत लवचिक, विकेंद्रीकृत आणि सुरक्षित ऊर्जा यंत्रणा उभारणे .

## मंथन

डॉ. विवेक राजे/९८८१२४२२२४

# स्मरण फाळणीचे



मागील आठवड्यात आपण आपल्या देशाचा ७९ वा स्वातंत्र्यदिन साजरा केला. १५ ऑगस्ट १९४७ साली याच दिवशी या देशाला स्वातंत्र्य मिळाले. स्वातंत्र्य दिनाच्या पूर्वसंध्येला म्हणजे १४ ऑगस्ट १९४७ रोजी या देशाची फाळणी केली गेली. १४ ऑगस्ट रोजी पाकिस्तान अस्तित्वात आले, तर १५ ऑगस्ट रोजी भारत हे स्वतंत्र प्रजासत्ताक राष्ट्र म्हणून अस्तित्वात आले. देशाची फाळणी केवळ भौगोलिक निश्चितच नव्हती. तर ती हिंदू तत्त्वज्ञानाच्या आधारे आकार घेतलेल्या भारतीय राष्ट्रवादाच्या धार्मिक , सामाजिक, वैचारिक आणि नैतिक मुलंतत्वांना छेद देणारी होती. अनादी काळापासून हिंदू तत्त्वज्ञान नेहमीच सर्व समावेशक, प्रत्येकाला संपूर्ण वैचारिक स्वातंत्र्य देणारे आणि सहअस्तित्वाचा पुरस्कार करणारे होते. प्रादेशिक सीमा, उपासना पध्दती, आहारविहार, भाषा यांच्या पलिकडील हिंदू सांस्कृतिक राष्ट्रवादाला आणि हिंदूंच्या सामाजिक सहअस्तित्वाच्या उदार वैचारिकतेला मुळातूनच हादरा देणारी ही घटना होती. धार्मिक आधारावर देशाची फाळणी होणे हे, त्या धामधूमीच्या काळातदेखील, त्यामुळेच हिंदू समाजासाठी अधिक धक्कादायक होते. कारण देशाचे विभाजन या सहअस्तित्वाला नकार देण्याच्या मुस्लिम मानसिकतेमुळे झाले. आम्ही बाकीच्यांपेक्षा श्रेष्ठ आहोत, आम्हाला विशेष लाभ, विशेष दर्जा असला पाहिजे. अन्य लोक दुय्यम आहेत या मुस्लिम धार्मिक तत्वज्ञानामुळे भारत विभाजित झाला. महात्मा गांधी, स्वातंत्र्य वीर सावरकर, राष्ट्रीय स्वयंसेवक संघ, हिंदू महासभा या कोणालाही विभाजन मान्य नव्हते. ते मुस्लिम श्रेष्ठत्वाची भावना जोपासणाऱ्या मुठभर मुस्लिम नेत्यांनी घडवून आणले, ही वस्तुस्थिती आहे.

विभाजनाला विरोध राष्ट्रीय स्वयंसेवक संघ, हिंदू महासभा, स्वातंत्र्य वीर सावरकर आणि अगदी महात्मा गांधी यांनीदेखील केला. माझ्या मृतदेहावरूनच या देशाचे तुकडे होतील , असे म्हणणाऱ्या आणि या देशातील जनतेच्या मनावर अधिराज्य करणाऱ्या गांधीजींनादेखील विभाजन मान्य करावे लागले. संघाची शक्ती तोकडी पडली. विभाजनाला सगळ्यात मोठे आणि महत्त्वाचे कारण म्हणजे, सर्वात मोठा पक्ष असलेल्या कॉंग्रेसच्या म्हाताऱ्या झालेल्या पुढाऱ्यांमधे नसलेली राजकीय इच्छाशक्ती, अखंडत्वासाठी किंमत मोजण्याची नसलेली मानसिक तयारी आणि सत्ता पदांची निर्माण झालेली लालसा होय, असे आद्य समाजवादी राममनोहर लोहिया त्यांच्या 'फाळणीचे गुन्हेगार' या पुस्तकात म्हणतात.

इंग्रजी सत्तेला भारतातून निघून जातांना दोन उद्दिष्ट साध्य करायची होती. एक म्हणजे अस्थिर परिस्थितीचा फायदा घेऊन मानसिक गुलाम असलेल्या भारतीय नेतृत्वाकडे सत्ता सोपवायची होती. ज्या योगे हा देश पुन्हा आपली जुनी ओळख जगाच्या पटलावर ठेवण्याकडे दुर्लक्ष करेल. दुसरे म्हणजे आपण या देशातून बाहेर पडल्यावर दीर्घकाळ हा देश एक दुबळा, एकता नसलेला, स्थानिक अस्मितांचा आधार निर्माण केलेल्या मतभेदांमुळे आपसात भांडत, दुबळा राहील. त्यामुळे विभाजन करताना इंग्रजी सत्ता मोहम्मद अली जिना आणि मुस्लिम लिगच्या बाजूने झुकते राहीले. हिंदू समाजाला याची सर्वात जास्त किंमत चुकवावी लागली. या एका घटनेने कोट्यवधी लोकांना आपला प्रदेश, वडीलोपार्जित घरदार जमीन सोडून स्थलांतर करावे लागले. दहा लाखांपेक्षा जास्त लोक मृत्यूमुखी पडले. असंख्य महिलांवर अपहरण, बलात्कार असे अमानवी अत्याचार केले गेले. हा सगळाच प्रकार हिंदूंच्या सहअस्तित्वाच्या तसेच सर्वसमावेशकतेच्या व उपासना स्वातंत्र्याच्या तत्वांच्या संपूर्ण विरुद्ध होते. सत्तेच्या स्वार्थापोटी तत्कालीन कॉंग्रेस पुढारी आणि कॉंग्रेसी विचारांच्या लोकांनी फाळणी मनोमन मान्य करत सत्तेची फळे चाखायला सुरुवात केली. कॉंग्रेसने उराशी बाळगलेले अखंड भारताचे ध्येय सोडून दिले. गांधीजींनीही आपले अखंड भारताचे स्वप्न सोडून दिले. त्यातच विभाजनाची एक परिणती गांधींच्या हत्येत झाली. परंतु रा. स्व. संघ, हिंदू महासभा, स्वा. सावरकर यांनी मात्र अखंड भारताच्या ध्येयाचा कधीही त्याग केला नाही. जवळजवळ पंचाहत्तर वर्षांनंतर २०२२ मधे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी १४ ऑगस्ट हा दिवस विभाजन विभाषिका स्मृती दिवस म्हणून म्हणून घोषित केला. हे, आम्ही आजही फाळणीच्या जखमा, अपमान, अत्याचार विसरलेलो नाही याचे द्योतक आहे. आणि हे फाळणीचे दुःख सामान्य जनतेने आजही विसरू नये म्हणूनच कदाचित पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी १४ ऑगस्ट हा विभाजन विभाषिका स्मृती दिन जाहीर केला असावा. आजही हे अखंड भारताचे स्वप्न करोडो भारतीय नागरिक उराशी बाळगून आहेत. ते निश्चितपणे पूर्ण होणारही आहे. फक्त सामान्य माणसाला अभिप्रेत असलेल्या पध्दतीने न होता ते टप्प्या टप्प्याने, राजकारणाचे विविध वळसे वळणे घेत, पण निश्चित साकार होईल, हा विश्वास सर्व भारतीयांनी मनाशी बाळगायला हरकत नाही. कारण काळाच्या ओघात आणि निश्चित अशा धेय्य धोरणांची अंमलबजावणी करत आज या देशाने आणि विशेषतः हिंदू समाजाने सर्व क्षेत्रात मोठी आघाडी घेतली आहे. फाळणीचा काळ आणि आज यात पडलेला फरक पुढील मुद्यांवर नजर फिरवली तरी सहजपणे लक्षात येतो.

एक म्हणजे आज हिंदुत्ववादी विचारांची शक्ती, या विचारांना वाढलेले जनसमर्थन. आज फाळणीच्या काळाच्या तुलनेत हिंदूंची संघटित शक्ती मोठ्या प्रमाणात वाढलेली आहे. हिंदूंचे आर्थिक, सामाजिक, राजकीय सामर्थ्य प्रचंड प्रमाणात वाढलेले आहे.

दुसरे म्हणजे, भारतातील मुसलमानांच्या मानसिकतेत बराच बदल घडलेला दिसतो आहे. बऱ्याच मुसलमानांना आज शरिया कायदे आणि कुराण व त्यातील नियमांनुसार जीवनपद्धती मान्य राहिलेली नाही. तिसरे म्हणजे भारतात राहणारी मुस्लिम लोकसंख्या ही पाकिस्तानात राहणाऱ्या मुस्लिम लोकसंख्येपेक्षा जास्त आहे याची जागतिक समुदायाला जाणीव झालेली आहे. तसेच पाकिस्तानपेक्षा आपण भारतातच सुखी-समाधानी जीवन जगू शकतो व हिंदूंबरोबर सह अस्तित्व सहज शक्य आहे हे भारतातील मुस्लिम समुदायाला समजले आहे. त्यातच पाकिस्तान या इस्लामिक राष्ट्राची निर्मिती आणि सातत्याने भारत द्वेशाचे राजकारण यामुळे या देशाच्या आजच्या स्थितीमुळे पाकिस्तानी मुस्लिम समाजाचा आणि विशेषतः सुशिक्षित पाकिस्तानी तरुणांचा संपूर्ण भ्रमनिरास झालेला आहे. आर्थिक सामाजिक शैक्षणिक बौद्धिक सर्वच आघाड्यांवर आज या देशाचे दिवाळे निघालेले आहे. त्यामुळे शेजारी असलेल्या भारताशी शत्रूत्व करू नये, अशा विचारांचा एक वर्ग पाकिस्तानात उदयाला येताना दिसतोय. पाचवा मुद्दा म्हणजे स्वातंत्र्यप्राप्तीनंतर आणि विशेषतः मागील दहा वर्षात सर्वच आघाड्यांवर भारताने केलेली नेत्रदीपक प्रगती हा होय. या प्रगतीमुळे आणि जागतिक पातळीवर भारताने घेतलेल्या ठाम पवित्र्यांमुळे आज या देशाकडे जागतिक समुदाय विशेष अपेक्षेने आणि आदराने पाहताना दिसून येतो आहे. त्यामुळे आज जरी फाळणीची भीती किंवा विभीषिका समाजाने मनात निर्माण होऊ देणे योग्य नसले तरी , हिंदू समाजाने भविष्यात कधीही फाळणी होऊ नये यासाठी कंबर कसून तयारी ठेवली पाहिजे. आज बदललेल्या परिस्थितीत हिंदू समाजाने पुन्हा एकदा हिंदू तत्वज्ञानाचे आधारे आपला समाज अधिक समरस आणि एकात्म करण्याची गरज आहे. जातीय, प्रांतीय, भाषिक अस्मितेला आवर घातला जाणे आवश्यक आहे. तसेच या विषयांवर उगाच अभिनिवेष देखील कुणी दाखवू नये. आठ दिवसांपूर्वी सरसंघचालक एका व्याख्यानात, एक असण्यासाठी एकसारखे असण्याची / होण्याची गरज नाही , असे म्हणाले होते. एकसारखे नसतानाही आम्ही एक होणे ही उज्वल भविष्यकाळाला दिलेली साद असणार आहे. हिंदू तत्त्वज्ञान मुळात उदार असल्याने विविध उपासना पध्दती, विविध देवता, पंथ, वाद, जाती, भाषा, प्रांत अशा विविधतेला सहजपणे आपल्यात सामावून घेणारे आहे. त्यामुळे या सगळ्या विविधता असल्या तरीही एक असण्याचा प्रयत्न केला पाहिजे. दुसरे म्हणजे हिंदू धर्मात येऊ इच्छिणाऱ्या प्रत्येक व्यक्तीचे स्वागत करून त्याला सुरक्षित, सुखी समाधानी जीवनाची हमी दिली पाहिजे. अशा लोकांबरोबर अधिक सौहार्दपूर्ण आणि आपुलकीचा व्यवहार ठेवला पाहिजे. तिसरे म्हणजे हिंदू तत्त्वज्ञान, हिंदू अध्यात्मिकता, हिंदू धर्म व्यवस्था यांचा अधिक जोमाने अभ्यास आणि प्रचार जगभरात केला पाहिजे. तसेच देशांतर्गत हिंदू समाजाने अधिक कणखर, आक्रमक आणि दृढ पवित्रा घेतला पाहिजे. त्यायोगे हा हिंदूंचा देश आहे हे सर्व समाजाला सुस्पष्टपणे कळेल. या देशाच्या फाळणीच्या दुःखावर अखंड भारत हाच इलाज आहे. आणि त्याच दिशेने हिंदू समाजाची वाटचाल होताना दिसते. ते स्वप्न, दृढ, कणखर आणि समरस हिंदू समाजच साकार करू शकतो हे सतत लक्षात ठेवले तर विभाजन स्मृती दिनाला वेगळा आयाम मिळेल.

## आंतरराष्ट्रीय

वसंत गणेश काणे/९४२२८०४४३०

# माकडाहाती कोलित नको

काही कामे करण्यासाठी मानवी बुद्धीचा वापर होत असतो किंवा करावा लागतो. अकुशल कामे करण्यासाठी बुद्धीचा फारसा वापर करावा लागत नाही. एक सोपे उदाहरण घेऊन विचार करू. एखाद्या अकुशल कामगाराला दगड उचल म्हटले की तो दगड उचलील. दगड ठेव म्हटले की, अकुशल कामगार तो दगड ठेवून देईल. या निमित्ताने बुद्धीचा फारसा उपयोग होत नाही. पण कोणता दगड उचलायचा आणि तो कुठे आणि कसा ठेवायचा यासाठी बुद्धिमत्तेचा वापर करावा लागतो. अशी कुशलतेची कामे करण्याची क्षमता जर यंत्रात निर्माण झाली तर त्या शहाणपणाला कृत्रिम बुद्धिमत्ता (आर्टिफिशियल इंजेलिजन्स) असे म्हणतात. एखादी गोष्ट शिकणे, एखादा प्रश्न सोडविणे, एखादा निर्णय घेणे यासाठी मानवी बुद्धिमत्ता लागते. अनेक आकलनात्मक क्रिया (कॉग्रेटिव्ह फंक्शन्स) जसे, बेरीज, वजाबाकी, गुणाकार, भागाकार या सारख्या क्रिया संगणक पार पाडतो, हे आपल्याला माहीत आहे. यासाठी संगणकात अनेक प्रकारचे तंत्रज्ञान (टेक्नॉलॉजी), तंत्रे /पद्धती (टेक्निक) वापरली जातात. अशी योजना केली की ते यंत्र मानवी बुद्धीप्रमाणे आकलनादी कामे पार पाडू शकते. या क्षमता म्हणजे आर्टिफिशियल इंटेलिजन्स होय. मानवी मेंदू हा एक एकसंध (मॉनोलिथिक ) अवयव आहे. तो अनेक बौद्धिक कामे पार पाडतो. कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) आता एक उदयोन्मुख तंत्रज्ञान राहिलेले नाही. यात कार्य करू शकेल असा एक विस्तृत संच असतो. काही सेकंदात मोठ्या प्रमाणात सामग्री तयार करण्यापासून ते प्रश्नांची उत्तरे देणे, डेटाचे विश्लेषण करणे, कार्ये स्वयंचलित करणे अशा अनेक गोष्टी कृत्रिम बुद्धिमत्तेच्या साह्याने साध्य करता येतात. मेंदूची ही क्षमता यंत्रात यावी यासाठी यासाठी काय करावे लागेल? अनेक तंत्रज्ञाने व तंत्रे एकमेकांबरोबर एकोप्याने काम करतील अशी योजना करावी लागेल. असे जर करता आले तर त्या यंत्रात मानवी बौद्धिक आचरण घडवून आणण्याची क्षमता येते.

संगणक अनेक बौद्धिक कामे पार पाडतो. पण त्यासाठी संगणकात एक विशिष्ट कार्यक्रम (प्रोग्राम) आखून दिलेला असतो. कृत्रिम बुद्धिमतेद्वारेही अशी कामे पार पाडता येतात. संगणक आणि कृत्रिम बुद्धिमत्ता यातील मुख्य फरक हा आहे की, कृत्रिम बुद्धिमत्तेत प्रोग्रामिंगची आवश्यकता आवश्यकता पडत नाही. कृत्रिम बुद्धिमत्तेद्वारे पार पाडली जाणारी बौद्धिक कामे अशी आहेत.

**१) शिकणे :** असलेल्या माहितीतून (डेटा) शिकणे, आकार ओळखणे, त्यात सुधारणा करणे (यासाठी संगणकाप्रमाणे वेगळी आज्ञावली वापरावी लागत नाही), **२) तर्क करणे/विचार करणे :** यात माहितीचे विश्लेषण करणे, निष्कर्ष काढणे, त्यात वेळोवेळी सुधारणा करणे अभिप्रेत असते. **३) समस्या सोडविणे :** निरनिराळ्या मार्गांमधून सर्वोत्तम मार्ग शोधणे. **४) निर्णय घेणे :** एखाद्या परिस्थितीत मानवापेक्षा अधिक वेगाने आणि अचूक निर्णय घेणे. **५) मानवाची भाषा समजून घेणे ( नॅचरल लॅंग्वेज प्रोसेसिंग - एनएलपी)** : मानवाची भाषा समजून घेणे, अर्थ लावणे, नवीन भाषा निर्माण करणे. **६) संगणक दृष्टी (कॉम्प्युटर व्हिजन) :** प्रतिमा 'पाहून' चेहरे ओळखणे किंवा आवाज ऐकून व्यक्ती ओळखणे

### कृत्रिम बुद्धिमत्तेचे तीन प्रकार

**१) संकुचित कृत्रिम बुद्धिमत्ता (नॅरो / वीक एआय)** : ही विशिष्ट क्षेत्रातील ठरविक कामेच पार पाडते उदा. सिरी किंवा अलेक्साप्रमाणे आभासी मदत (व्हर्च्युअल असिस्टंन्स), उपाय सुचविणे, लबाड्या / खोटेपणा / कपट ओळखणे (फ्रॉड ओळखणे)

**२) साधारण कृत्रिम बुद्धिमत्ता (आर्टिफिशियल जनरल इंटेलिजन्स) :** मानवाप्रमाणे आकलन, तर्क, विचार करण्याची क्षमता आदी. यात सध्या खूप वेगाने प्रगती होऊ लागली आह

**३) अतिकुशाग्र कृत्रिम बुद्धिमत्ता (सुपर इंटेलिजंट आर्टिफिशियल इंटेलिजन्स):** आजच्या मानवापेक्षा स्वतःची जास्त स्वतंत्र जाणीव असलेली (सेल्फ-अवेअरनेस), स्वतःत स्वतःहून सुधारणा करण्याची क्षमता असलेली बुद्धिमत्ता (केपेबल ऑफ सेल्फ इंप्रुव्हमेंट) आजच्या अनेक वैज्ञानिक कथांमध्ये अशा संकल्पना वापरलेल्या असतात.



### कृत्रिम बुद्धिमत्तेचे फायदे

समस्यांची स्वयंचलित सोडवणूक, उत्पादनात वाढ, निर्णय अचूक घेण्यात साह्य, ग्राहकांचे अनुभव अधिक समृद्ध करण्यास मदत कृत्रिम बुद्धिमत्तेद्वारे होऊ शकेल.

### कृत्रिम बुद्धिमत्तेचे तोटे

कुशल मनुष्यबळाची आवश्यकता कमी होईल व बेकारी वाढेल, सायबर सिक्युरिटीविषयक समस्या वाढतील, पारदर्शितेमुळे नीतीविषयक समस्याही उद्भव शकतील. कृत्रिम बुद्धिमत्ता हे आजवर मानवाला गवसलेल्या हत्यारांमधले एक सर्वात प्रभावी हत्यार ठरणार आहे. त्याचा योग्य तोच उपयोग करण्याची जबाबदारी मानवावर येऊन पडली आहे. जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रावर याचा परिणाम होत चालला आहे. याच्या दुरुपयोगाचे एक जागतिक पातळीवरचे उदाहरण व्हिडिओच्या स्वरूपात नुकतेच समोर आले आहे. यात एक पात्र आहे अमेरिकेचे विद्यमान अध्यक्ष डोनाल्ड ट्रंप तर दुसरे पात्र आहे, अमेरिकेचे माजी अध्यक्ष बराक ओबामा. अध्यक्ष डोनाल्ड ट्रंप यांच्या मनात बराक ओबामा यांच्याविषयी पराकोटीची अनादराची भावना असून ते या भावनेचे बेछूट प्रदर्शन प्रत्यक्ष जीवनात करीत आले आहेत. याउलट बराक ओबामा आपल्या शांत, संयमी, जबाबदार वागणुकीसाठी प्रसिद्ध आहेत. व्हिडिओमध्ये अध्यक्ष डोनाल्ड ट्रंप हसतांना दिसत असून त्यांच्या समोर बराक ओबामा बसलेले दाखविले आहेत. एवढ्यात कुठून तरी दोन अधिकारी येतांना दिसतात. ते कोट घालून असून कोटाच्या पाठीवरच्या भागावर 'एफबीआय' अशी अक्षरे आहेत. हे अधिकारी बराक ओबामा यांची मानगूट पकडून त्यांना घेऊन जातात. लगेच एक तुरुंग दिसतो. यातील एका खोलीत बराक ओबामा दिसतात. त्यांच्या चेहऱ्यावर असहाय्यतेचे भाव आहेत. हा व्हिडिओ व्यंगचित्राच्या जातकुळीचा नाही. तो अगदी प्रत्यक्ष घटनेचे चित्रण आहे, असे वाटते. विशेष असे की, हा व्हिडिओ खुद्द डोनाल्ड ट्रंप यांनीच 'ट्रूथ स्पेशल' या नावाच्या प्रसारमाध्यमावर प्रसारित केला होता. सोबत एक शीर्षक होते, 'कायद्यापेक्षा कोणीही मोठे नाही'. हे सर्व तपशील पाहता बराक ओबामा यांना खरोखरच अटक झाली की काय असा समज होऊ शकत होता. कारण 'मी ओबामा यांना तुरुंगात टाकीन', अशा वल्गना डोनाल्ड ट्रंप यांनी प्रत्यक्ष जीवनात अनेकदा केल्या आहेत. हे उदाहरण हा मुद्दा स्पष्ट करते की, उद्या आर्टिफिशियल इंटलिजन्सचा वापर करून समाजकंटक कोणतेही दृष्य प्रसारित करू शकतील. हुबेहूबपणामुळे जनसामान्यांचा त्याच्यावर विश्वास बसेल. यातून अनर्थ उद्भवेल. हा व्हिडिओ खरा नाही, तो ऐआयच्या सहाय्याने बेतलेला आहे. हा खुलासा लगेचच समोर आला आणि सर्व शंका फिटल्या, हा भाग वेगळा.

थोडक्यात काय तर एआय हे दुधारी व धोकादायक हत्यार आहे. अशक्यप्राय बाबी एआयने शक्यकोटीत आणल्या आहेत. हे मानवाचे साधन आहे, असे म्हणा किंवा याला मानवाचा साथीदार म्हणा किंवा आणखी काही म्हणा पण याचे भस्मासुरात परिवर्तन होऊ नये, असेच कोणीही म्हणेल. याबाबतची भीती विविध पातळींवर व्यक्तही होते आहे. त्यावर उपाय शोधण्याचा आटापिटाही सुरू आहे. पण एआयचा आवाका गगनालाही पुरून उरेल असा आहे. एआयला गवसणी घालण्याचा एकच हमखास मार्ग आहे. कोणता आहे तो मार्ग? तो मार्ग आहे विवेकाचा, संयमाचा आणि सुसंस्कृतपणाचा. विवेकाचा पोत जुळतो सकारात्मकतेशी. नकारात्मकता मानवाला घेऊन जाते असत्याकडे, अश्लीलतेकडे, क्रौर्याकडे. नकारात्मकता फक्त विषण्णतेकडे आणि आत्मघाताकडेच नेणार. एआय हे दुधारी व धोकादायक हत्यार आहे. पण एआयचा आवाका गगनालाही पुरून उरेल असा आहे. महापुरुष असतात, दीपस्तंभासारखे. ते सतत मार्गदर्शन करीत असतात. पण आज ज्यांनी मार्ग दाखवायचा तेच पथभ्रष्ट होऊन 'अदंड्योसी', 'अदंड्योसी' म्हणू लागले आहेत. प्राचीन गुरुकुल पद्धतीत, गुरू हे मार्गदर्शक, पालक आणि नैतिक आदर्श असायचे. आज आपण 'आयबॉट्स'नाच आपला गुरू मानू लागलो आहोत. 'आयबॉट्स' हे 'आर्टिफिशियल इंटेलिजन्स चॅटबॉट्स', या नावानेही संबोधले जातात. हे काय प्रकरण आहे? या आहेत संगणकीय प्रणाली किंवा कॉम्प्युटर प्रोग्राम. पण कॉम्प्युटर प्रोग्राम म्हणजे तरी काय? ही आहे सूचनांची जंत्री. कॉम्प्युटरने काय करावे, हे यात नमूद केलेले असते. क्रोम, फायर फॉक्स, मायक्रोसॉफ्ट वर्ड, विंडोज हे कॉम्प्युटर प्रोग्राम्स आहेत. आर्टिफिशियल इंटेलिजन्समधील अशा प्रोग्राम्सना वेगळी नावे आहेत. त्यांना 'आयबॉट्स' किंवा 'आर्टिफिशियल इंटेलिजन्स चॅटबॉट्स' असे म्हणतात. चॅट जीपीटी, गुगल जेमिनी, मेटाएलए-एमए या सर्व प्रणाल्या एकाच जातकुळीच्या आहेत. त्यापैकी कुणीही सजीवांची बरोबरी करू शकत नाहीत. आपल्याला बाटलीतल्या (दिव्यातल्या) राक्षसाची गोष्ट माहीत आहे. यांना म्हणायचेच असेल तर राक्षस म्हणता येईल. साहित्य, संगीत, शास्त्र अशांशी संबंधित आयबॉट्स असतात. त्या त्या बाटलीतल्या राक्षसाप्रमाणे आपण यांच्याकडून त्या त्या विषयाशी संबंधित कामे करून घेऊ शकतो, चांगली किंवा वाईट. मात्र, त्यासाठी कोड किंवा संकेत टाकावा लागतो. बस्स. मानवाची भूमिका एवढीच असते. पण आज हे राक्षस गुरूची जागा घेऊ पाहत आहेत की काय, वाटू लागले आहे. पण गुरु वेगळा असतो. तो असतो मार्गदर्शक. गुरू असतो पालक. गुरु असतो नैतिकतेचा आदर्श! पण राक्षसाला चांगल्या वाईटाची जाण नसते. तो असतो सांगकाम्याा! हा फरक लक्षात ठेवला आणि त्याच्याकडून चांगलीच कामे करून घेतली तर मानवतेच्या कल्याणाचा मार्ग शोधता येईल आणि ते सर्वस्वी आपल्या हाती आहे. पण हे हत्यार माकडाच्या हाती जायला नको. आज घडीला कृत्रिम बुद्धिमत्ताक्षेत्रात अमेरिका पहिल्या क्रमांकावर नंतर (क्रमाने नाही), चीन, ब्रिटन, कॅनडा, जर्मनी, फ्रान्स, जपान, इस्रायल. हे देश येतात. हे आघाडीचे शिलेदार भविष्यात कितपत जबाबदारीने आणि शहाणपणाने वागतात, यावरच सर्वकाही अवलंबून आहे.

## निसर्गाच्या सरीत गणरायांचे थाटात आगमन



पैठण दि २७ :- गणेश चतुर्थी लाडक्या गणपती बाप्पाचे स्वागत करण्यासाठी आज पावसाच्या सरी कोसळल्या आणि भक्तांच्या आनंदोत्सवात ढोल तासांच्या गजरात श्री गणरायांचे थाटात आगमन झाले.भाजपचे जिल्हा उपाध्यक्ष तथा मा. नगराध्यक्ष सुरज लोळगे यांच्या निवासस्थानी श्री गणेशाचे विधिवत पूजन करण्यात आले. तसेच पंचक्रोशीतील मंडळे आणि घरोघरी विघ्नहर्ताचे जयघोष घुमत आहे.

सिद्धिविनायक व्यापारी गणेश मंडळ, शिवनेरी गणेश मंडळ, लंबोदर गणेश मंडळ, राजे संभाजी गणेश मंडळ, जय बजरंग नवग्रह गणेश मंडळ, योग फ्रेंड गणेश मंडळ, संत रविदास गणेश मंडळ या सर्व मंडळांनी ढोल तासांच्या गजरात लाडक्या गणरायाचे स्वागत करत प्रतिष्ठा केली.मंडळाच्या कार्यकर्त्यांनी ११ दिवसीय उत्सवात यंदा सामाजिक प्रबोधनाचे विविध कार्यक्रम आयोजित केले आहेत. या उत्सवाची सांगता दि.६ डिसेंबर २०२५ शनिवारी होणार आहे. गणपती विसर्जनासाठी पैठणच्या नाथ मंदिर मागील गोदावरी पात्रात नाथसागरचे पुरेसे पाणी स्थानिक जलसंपदा, तहसील प्रशासन व पोलीस प्रशासन यांनी ठेवण्याचे नियोजन करावे अशी मागणी गणेश भक्तांनी केली आहे.

## बिडकीन पोलीस ठाणे हद्दीतील ३८ जणांना प्रतिबंध

बिडकीन दि २७ ऑगस्ट :गणेशोत्सव व ईद असे अन्य सण-उत्सव काळात कायदा व सुव्यवस्था तसेच सार्वजनिक शांतता अबाधित राहावी, यासाठी पोलिस ठाणे बिडकीन हद्दीत गुन्हे दाखल असलेल्या ३८ जणांवर भारतीय नागरिक सुरक्षा संहितेनुसार प्रतिबंधात्मक कारवाई करण्यात आली.पैठण-फुलंब्रीच्या उपविभागीय अधिकारी नीलम बाफना यांनी यासंदर्भात आदेश दिले. यानुसार संबंधित व्यक्तींना २७ ऑगस्ट २०२५ ते ७सप्टेंबर २०२५ या कालावधीत त्यांच्या गावात तसेच पोलिस स्टेशन बिडकीन हद्दीत वास्तव्य करण्यास अथवा कोणत्याही कारणासाठी प्रवेश करण्यास सक्त मनाई केली आहे.या यादीत जगदीश राजु पवार, रा. निलजगांव, ता. पैठण, जि. छत्रपती संभाजीनगर राजेंद्र वैजिनाथ आगळे, रा. गेवराई बाशी, मदन महाजन लकवाल, रा. जांभळी, ता. पैठण, जि. छत्रपती संभाजीनगर नारायण महाजन लकवाल, रा. जांभळी, साजन सुभाष पवार, रा. जांभळी, ताराचंद तुळशीराम कचरे, रा. नांदलगाव, धिरज नारायण लकवाल, रा. जांभळी, ता. पैठण, जि. छत्रपती संभाजीनगर संतोष शामराव गवांदे, रा. ईमामपूरवाडी, भगवान कचरुलाल जैस्वाल, रा. रांजणगाव खुरी, रुखमन चव्हाण, रा. पैठणखेडा, सुभाष कचरुलाल जैस्वाल, रा. रांजणगाव खरी, कुणाल वामन सोनवणे, रा. रांजणगाव खुरी, कल्याण बारे, रा. शेकटा, ता. पैठण, जि. छत्रपती संभाजीनगर कृष्णा अप्पासाहेब माने, रा. नांदलगाव, - संतोष रामनाथ वाकडे, रा. तोंडुळी, - अमोल लक्ष्मण जाधव, रा. तोंडुळी,जयश्री ज्ञानेश्वर बर्डे, रा. मुलानी वडगाव, - सुभद्रा बाळु नरवडे, रा. फारोळा, ता. पैठण, जि. छत्रपती संभाजीनगर साईनाथ रामनाथ रांजणे, रा. चितेगांव, ताराबाई भाऊसाहेब सागरगिळे, रा. फारोळा, रमेश विनायक तांबे, रा. चितेगांव आदींचा समावेश आहे.

## आचार्य डॉ.प्रणामसागरजी महाराज यांच्या सानिध्यात पर्युषण महापर्व साजरा होणार



छत्रपती संभाजीनगर प्रतिनिधी - श्री १००८ खंडेलवाल दिगंबर जैन पंचायत पार्श्वनाथ मंदिर राजबजार येथे दहा दिवसीय पर्युषण महापर्व २८ ऑगस्ट ते ०६ सप्टेंबर पर्यत मोठया भक्ती भावाने साजरा करण्यात येणार असल्याची माहिती पंचायत अध्यक्ष महावीर पाटणी व सचिव प्रकाश अजमेरा यांनी एका पत्रकाव्दारे दिली आहे. यावेळी आचार्य डॉ.प्रणामसागरजी महाराज भक्तांबरवाले बाबा यांच्या सानिध्यात पर्युषण महापर्व साजरा करण्यात येणार आहे.

यामध्ये उत्तम क्षमा, मार्दव, आर्जव, शौच, सत्य, संयम, तप, त्याग, अकिचन्य, ब्रम्हचर्य या दहा धर्मावर आचार्यश्रींचे विशेष उदबोधन होणार आहे. तसेच संपुर्ण कार्यकम अनुष्ठाचार्य कपिल पाटणी यांच्या मार्गदर्शनाखाली होणार आहे. २८ ऑगस्ट ते ०६ सप्टेंबर दरम्यान विविध धार्मिक कार्यकमांचे आयोजन करण्यात आले आहे. संपुर्ण कार्यकम हा राजाबजार जैन मंदिर व हिराकाका प्रागण आचार्य गुप्तीनंदी गुरुदेव सभागृहात होणार आहे. तरी समाज बांधवांनी वरील कार्यकमास मोठया संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन पंचायत अध्यक्ष महावीर पाटणी, सचिव प्रकाश अमजेरा, चातुर्मास समिती अध्यक्ष ॲड.अनिल कासलीवाल, महावीर ठोले, ललीत पाटणी, यतीन ठोले, अरैण पाटणी, संतोष सेठी, किरण पहाडे, जितेंद्र पाटणी, निता ठोले, चंदा कासलीवाल यांच्यासह महामत्रि प्रमोदपाडे रवी सेठी दिनेश ठोले अशोक गगवाल सजय पहाडे आशीश सेठी सपना पापडीवाल चातुर्मास समिती ने केले असल्याची माहिती प्रचार प्रसार संयोजक नरेंद्र अजमेरा व पियुष कासलीवाल यांनी दिली.

## जाहीर प्रगटन

**मा. दिवाणी न्यायाधिश साहेब, क. स्तर न्यायालय गंगापूर जि. औरंगाबाद**

सिव्हील एम.ए.क. ५२६/२०२५

अर्जदार :-१) ताराबाई जयराम पदार, वय. ६० वर्षे, धंदा, शेती, रा. पखोरा, ता. गंगापूर जि. औरंगाबाद २) भाऊसाहेब जयराम पदार, वय. ४८ वर्षे, धंदा, शेती, रा. पखोरा, ता. गंगापूर जि. औरंगाबाद ३) अतुल जयराम पदार, वय. ४४ वर्षे, धंदा, शेती, रा. पखोरा, ता. गंगापूर जि. औरंगाबाद ४) अरूण जयराम पदार, वय. ४२ वर्षे, धंदा, शेती, रा. पखोरा, ता. गंगापूर जि. औरंगाबाद ५) संगीता तातेराव चव्हाण, वय. ४६वर्षे, धंदा, शेती, रा. गोळेगांव, ता. खुलताबाद जि. औरंगाबाद

विरूध्द

गैरअर्जदार - निरंक

प्रकरण : कलम ३७२ भारतीय वारसा कायदयान्वये वारस प्रमाणपत्र (Succession Certificate) मिळणे बाबत बाबत

याअर्थी, वरील अर्जदारांनी ॲड. एस. के. लांडे यांच्या मार्फत या न्यायालयात वारस हक्क प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज दाखल केला आहे की, अर्जदार क. १ ही अर्जदार क. २ ते ५ यांची आई असून अर्जदार क. १ ही अर्जदार क. २ ते ५ यांची आई असून अर्जदार क. १ चे पती व अर्जदार क. २ ते ५ यांचे वडील नामे जयराम काशिनाथ पदार हे दि. ३१/१२/२०१७ रोजी मौजे पखोरा ता. गंगापूर जि. औरंगाबाद येथे मयत झालेले आहे. अर्जदारांव्यतिरिक्त मयतास इतर कोणीही कायदेशीर वारसदार नाहीत. अर्जदार क. १ ते ५ हे एकमेव मयताचे कायदेशीर वारसदार आहे. मयत जयराम काशिनाथ पदार यांच्या नावे जॉइन डीयर इंडिया लि. कंपनीचे ट्रॅक्टर वाहन ज्याचा नोंदणीकृत क. एम.एच. २० ए.एस. ७१० असा आहे. सदरचे ट्रॅक्टर हे आर.टी.ओ. ऑफीस कार्यालय औरंगाबाद येथे मयत जयराम काशिनाथ पदार यांच्या नावे नोंदणीकृत आहे. वर नमुद केल्याप्रमाणे मयत जयराम काशिनाथ पदार हे मयत झाल्यामुळे सदरचे ट्रॅक्टर हे वारसांने अर्जदार क. ३ अतुल जयराम पदार च्या नावे करणे कामी अर्जदार हे प्रादेशिक परिवहन कार्यालय येथे गेले असता संबंधीत कार्यालयातील अधिकाऱ्यांने अर्जदारांना सदरचे वर नमुद ट्रॅक्टर हे वारसांने त्यांच्या नावे करणे कामी सक्षम दिवाणी न्यायालयातुन मयताचे कायदेशीर वारस असल्याचे सक्सेशन प्रमाणपत्राची मागणी केली म्हणुन अर्जदारांना प्रस्तुतचा अर्ज दाखल करण्यास कारण घडले आहे.

त्याअर्थी या जाहीर प्रगटनाव्दारे तमाम जनतेस कळविण्यात येते की, अर्जदारांच्या हक्कात त्यांनी मागणी केल्याप्रमाणे वारस प्रमाणपत्र जारी करण्यास कोणाचाही कोणत्याही प्रकराचा आक्षेप, उजर असल्यास त्यांनी हे जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यपासून ३० दिवसाच्या आत या न्यायालयात स्वतः किंवा वकिला मार्फत आक्षेप उजर नोंदवावा. मुदतीत आक्षेप / उजर न आल्यास अर्जदारांच्या नावे वारस प्रमाणपत्र देण्यात येईल याची नोंद घ्यावी. करिता हे जाहीर प्रगटन.

दिनांक :-२५/०८/२०२५

आदेशावरून
सहाय्यक अधिक्षक,
दिवाणी व फौजदारी न्यायालय, गंगापूर

## बदलत्या हवामानाला अनुकूल शेती करणे काळाची गरज - श्री. पी. आर. देशमुख

### स्वयम् शिक्षण प्रयोग मार्फत जिल्हास्तरीय संवाद कार्यशाळा संपन्न.



छत्रपती संभाजीनगर : कृषी विज्ञान केंद्र, छत्रपती संभाजीनगर येथे आज जिल्हास्तरीय संवाद कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमाचे आयोजन स्वयम् शिक्षण प्रयोग (डडझ) आणि कृषी विज्ञान केंद्र यांच्या मार्फत करण्यात आले. कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलनाने झाली. प्रमुख पाहुणे म्हणून जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी श्री. पी. आर. देशमुख उपस्थित होते.

या कार्यशाळेत डडझ कडून असोसिएट प्रोग्राम डायरेक्टर मा. नसीम शेख आणि प्रकल्प व्यवस्थापक श्री. सम्राट कसबे यांनी मार्गदर्शन केले. तर कृषी विज्ञान केंद्राकडून डॉ. अनिता जिंतुरकर, डॉ. संजुला देशमुख, डॉ. बसवराज पिसुरे आणि डॉ. विवेक पाटणे या कृषी तज्ञ यांनी मार्गदर्शन केले. सिल्लोड तालुक्यातील एकूण ५० गावांतील ११० महिला शेतकरी या कार्यशाळेत सहभागी झाल्या.

डॉ. संजुला भवर यांनी फळबाग लागवडीवर भर द्यावा व एकाच पिकाची शेती (मोनोक्रॉपिंग) टाळावी असे सांगितले. डॉ. पाटणे यांनी दरवर्षी माती परीक्षण करणे व रासायनिक खतांचा अतिरेक टाळण्याचे आवाहन केले. श्रीमती नसीम शेख यांनी डडझ चे ध्येय, उद्दिष्टे व पुढील दिशा याबद्दल माहिती दिली. प्रमुख पाहुणे श्री. देशमुख सर यांनी मराठवाड्यातील नैसर्गिक आपत्ती व त्यावर मात करण्याचे उपाय सांगितले. तसेच सेंद्रिय शेती, हवामान बदलाशी सुसंगत शेती, मिश्र पीकपद्धती व कृषीपूरक व्यवसायाचे महत्त्व त्यांनी स्पष्ट केले.

डॉ. अनिता जिंतुरकर यांनी कृषीपूरक व्यवसायातून उत्पन्न वाढविण्याचे मार्ग सांगितले आणि महिला शेतकऱ्यांनी शेतकरी उत्पादक कंपनी (त्रझउ) स्थापन करावी असे सुचविले. तसेच कृषी विज्ञान केंद्रातील विविध उपक्रमांची माहिती दिली. श्री. शेठे यांनी पाणी व्यवस्थापनावर मार्गदर्शन केले. श्री. सम्राट कसबे यांनी महिला पुढाकारातून पर्यावरण पुरक शेती या प्रकल्पाची माहिती दिली.

कार्यक्रमात डडझ चे वैशाली घुगे, अर्चना कोळी, शुभम कुमावत, पुष्पा तूपे, अंजली झाडके आणि शांभवी सोनटक्के उपस्थित होते. शेवटी महिला शेतकऱ्यांनी सरकारी अधिकारी व विषय तज्ञांशी संवाद साधून आपले प्रश्न मांडले व मार्गदर्शन घेतले.

## सायबर फसवणुकीतील २७ हजार रुपयांचा परतावा; तक्रारदाराला दिलासा

तभा वृत्तसेवा

कन्नड : दि.२७ ऑगस्ट - शहरातील काकासाहेब बारगळ या नागरिकाची सायबर फसवणुकीत तब्बल २७ हजार रुपयांची आर्थिक फसवणूक झाली होती. मोबाईलवर आलेल्या लिंकद्वारे झालेल्या या व्यवहारानंतर त्यांची रक्कम कोलकाता, वेस्ट बंगाल येथील यूनियन बँकेच्या एका खात्यात वळविण्यात आली होती. या घटनेमुळे तक्रारदारावर मोठा आर्थिक व मानसिक ताण आला होता.

घडलेल्या प्रकाराची तक्रार बारगळ यांनी तात्काळ कन्नड शहर पोलीस ठाण्यात दाखल केली. तक्रार मिळताच सपोनि कुणाल सुर्यवंशी यांनी कोणतीही विलंब न लावता सायबर पोर्टलवर ऑनलाईन नोंदणी (तक्रार क्र. ३१९०४२५००५६६३५) केली. तपासदरम्यान फसवणुकीची रक्कम संशयित खात्यात होल्ड झाल्याचे लक्षात आले. त्यानंतर कन्नड पोलिसांनी न्यायालयातून संबंधित रक्कम परत मिळविण्यासाठी आदेश प्राप्त केले. आदेशांच्या आधारे पोलिसांनी संबंधित बँकेशी सातत्याने संपर्क साधून व कायदेशीर पाठपुरावा करून अखेर संपूर्ण २७ हजार रुपये तक्रारदाराच्या खात्यात परत मिळवून दिले.

फसवणूक झाल्यानंतर एवढ्या अल्पावधीतच नागरिकांचे पैसे परत मिळणे ही बाब नागरिकांसाठी मोठा दिलासा ठरली आहे. अनेकदा सायबर फसवणुकीत पैसे परत मिळणे कठीण जाते, परंतु कन्नड पोलिसांनी तत्परतेने केलेल्या कार्यवाहीमुळे हे शक्य झाले.

ही यशस्वी कारवाई सपोनि कुणाल सुर्यवंशी, पोलीस हेडकॉन्स्टेबल विजय चौधरी व महिला पोलीस हेडकॉन्स्टेबल मंगला ठाकरे यांचे विशेष प्रयत्नाचे मोल ठरले.

कन्नड शहर पोलीस ठाण्याच्या या कारवाईचे नागरिकांतून कौतुक होत आहे. वाढत्या सायबर गुन्ह्यांच्या पार्श्वभूमीवर पोलिसांची ही धडाकेबाज कामगिरी नागरिकांना दिलासा देणारी ठरली आहे.

जा.क्र./नपंसो/नामांतर/२०२५/२०२६ कार्यालय नगर पंचायत सोयगांव
दिनांक : ०-००-२०२५

## जाहीर प्रगटन

सर्व जनतेस याद्वारे कळविण्यात येते की, **धनराज दगडू सोनवणे** यांनी मोहल्ला **वार्ड क्र १७** सोयगांव स.नं. ----- मधील प्लॉट **१३९२** त्यांचे नांवे मालमत्ता कर रजिस्टरला नोंद घेणेसाठी या कार्यालयात अर्ज दाखल केला आहे. अर्जानुसार जागेची चतु:सीमा खालील प्रमाणे आहे.

**पूर्व : शेख जाकीर समद यांची जागा** **पश्चिम : सरकारी वापराचा रस्ता**
**दक्षिण : शेख जाकेर शेख समद यांची जागा** **उत्तर : शेख फारूक शेख हनीफ यांची जागा**

आकार : पूर्व पश्चिम **२०×४० = ८०० फुट** दक्षिणोत्तर..........

वरील नामांतराबाबतच्या कोणास आक्षेप असेल त्यांनी १५ दिवसांचे आत सकारण लेखी निवेदन कागदोपत्र पुराव्यानिशी या कार्यालयात दाखल करावे. मुदती नंतर कोणतेही आक्षेप विचारात घेतले जाणार नाही व नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात येईल.

मुख्याधिकारी
नगरपंचायत सोयगाव

## जाहीर प्रगटण

**मा. दिवाणी न्यायाधिश साहेव, व स्तर न्यायालय वैजापुर ता. वैजापुर जि. छत्रपती संभाजीनगर**

कि.दि.अर्ज क्र.२२२/२०२५

अर्जदार - १) शोभा भ्र गोरक्षनाथ उर्फ गोरख जेजुरकर वय ६७ वर्षे धंदा शेती २) अपर्णा पि गोरक्षनाथ जेजुरकर वय ४४ वर्षे धंदा शेती ३) निलम पि. गोरक्षनाथ जेजुरकर वय ४३ वर्षे धंदा शेती सर्व रा. १२, पाटील गार्डन, जे.के. पार्क नं.१, चारवाक चौक इंदिरानगर नाशिक ता. जि. नाशिक

विरुध्द

गैरअर्जदार : १) मच्छिंद्र मुरलीधर जेजुरकर वय सज्ञान धंदा शेती रा. गंगापुर रोड वैजापुर ता. वैजापुर जि. छत्रपती संभाजीनगर २) लक्ष्मीबाई भ्र शामराव जेजुरकर वय सज्ञान ३) संजय शामराव जेजुरकर वय सज्ञान धंदा शेती४) विजय शामराव जेजुरकर वय सज्ञान धंदा शेती५) छाया संजय खेरे वय सज्ञान धंदा शेती सर्व रा. जुना आधुर रस्ता पो. आधुर ता. वैजापुर जि. छत्रपती संभाजीनगर ६) भारती भ्र अशोक जेजुरकर वय सज्ञान धंदा शेती ७) गोकुळ अशोक जेजुरकर वय सज्ञान धंदा शेती ८) अमोल अशोक जेजुरकर वय सज्ञान धंदा शेती ९) जयश्री अशोक जेजुरकर वय सज्ञान धंदा शेती सर्व रा. कनेरवस्ती भोयगाव ता. कोपरगाव जि. अहिल्यानगर १०) कौशावाई भ्र. वैजीनाथ जेजुरकर वय सज्ञान धंदा शेती रा. बापू गायकवाड गारखेडा रोड, येवला ता. येवला जि. नाशिक ११) सुमन अभिमन्यु पवार, वय सज्ञान धंदा शेतीरा. कोरडगाव ता. वैजापुर जि. छत्रपती संभाजीनगर १२) विमल दत्तात्रय मंडलीक वय सज्ञान धंदा शेती रा. बालाजी मंदिरासमोर ओझर मु.पो. ओझर, ता. जि. नाशिक १३) काशाबाई भ्र. दगु बनकर, वय सज्ञान धंदा शेती रा. वनकरवस्ती उंदीरवाडी, अंदरसुल ता. येवला जि. नाशिक १४) भागिनाथ अंवादास महाजन वय सज्ञान धंदा शेती १५) वैजीनाथ अंबादास महाजन वय सज्ञान धंदा शेती १६) संजय अंबादास महाजन वय सज्ञान धंदा शेती रा. नांदगाव, महाजन वाडा, न्यु इंग्लीश स्कुल शेजारी मालेगाव रोड ता. जि. नाशिक

प्रकरण- हेअरशिप प्रमाणपत्र (वारसप्रमाणपत्र) मिळणे बाबत.

उपरोक्त विषयी सर्व जनतेस कळविण्यात येते की, या न्यायालयात अर्जदार क्र. १ ते ३ यांनी त्यांचे विधिज्ञ ॲड. श्री. के. आर. कन्हाळे यांच्या मार्फत अर्ज सादर केला आहे की, मुरलीधर किसन जेजुरकर हे स्टेशन रोड, जेजुरकर वस्ती, वैजापुर ता. वैजापुर येथील रहिवाशी होते ते दिनांक १२/०१/२००२ रोजी वैजापुर ता. वैजापुर येथे मयत झालेले आहे व मयत मुरलीधर किसन जेजुरकर यांची पत्नी नामे अनुसयाबाई मुरलीधर जेजुरकर या त्यांचे पुर्वीच मयत झालेल्या आहे. मयत मुरलीधर किसन जेजुरकर व मयत अनुसयाबाई मुरलीधर जेजुरकर यांना पाच मुले गैरअर्जदार क्र.१ मच्छिंद्र मुरलीधर, गोरक्षनाथ मुरलीधर, शामराव मुरलीधर, अशोक मुरलीधर व वैजीनाथ मुरलीधर व चार मुली गैरअर्जदार क्र.११ ते १३ सुमन पवार, विमल मंडलीक, काशावाई वनकर आणि केशरबाई महाजन असे अपत्ये होते, त्यापैकी गोरक्षनाथ मुरलीधर हे मयत झाले असुन त्यांना अर्जदार क्र.१ ते ३. हे वारस आहे, तसेच शामराव मुरलीधर यांना गैरअर्जदार क्र.२ ते ५ हे वारस आहेत, तसेच अशोक मुरलीधर यांना गैरअर्जदार क्र.६ ते ९ हे वारस आहेत व वैजीनाथ मुरलीधर यांना अर्जदार क्र.१० ही वारस आहे व एक मुलगी केशरबाई अंबादास महाजन यांना गैरअर्जदार क्र.१४ ते १६ हे वारसदार आहेत. येणे प्रमाणे मयत मुरलीधर किसन जेजुरकर यांना अर्जदार व. गैरअर्जदार हे वारसदार असुन त्यांच्या व्यतिरीक्त मयतास इतर कोणीही कायदेशीर वारसदार नसल्याचे नमुद करुन अर्जदारांना मयताचे मृत्युपश्चात शासकीय व निमशासकीय कामाकरीता वारस प्रमाणपत्राची आवश्यकता असल्याने अर्जदारांनी या न्यायालयात अर्ज सादर केला आहे.

त्याअर्थी, तमाम जनतेस याद्वारे कळविण्यात येते की, अर्जदारांच्या प्रस्तुत अर्जातील मागणीस कोणाचा काही आक्षेप-उजर असेल तर संबंधीतांनी त्याचा असलेला आक्षेप-उजर या न्यायालयात व्यक्तीशः अथवा विधीज्ञामार्फत हे प्रगटन प्रसिध्द झाले तारखेपासून ३० दिवसांच्या आत नोंदवावा मुदतीनंतरचा आक्षेप उजर लक्षात घेतला जाणार नाही व हे न्यायालय अर्जदारांच्या हक्कात त्यांनी मागणी केले प्रमाणे वारस प्रमाणपत्र जारी करील. करीता हे प्रगटन माझे सही व शिक्क्यानी आज दिनांक १६/०७/२०२५ रोजी दिले. प्रकरणात पुढील तारीख दिनांक १२/०८/२०२५ रोजीची आहे.

कनिष्ठ लिपीक    सहाय्यक अधिक्षक,
दिवाणी न्यायालय, वैजापुर

**मा. दिवाणी न्यायाधिश, क. स्तर, सोयगांव यांचे न्यायालय, जि. औरंगाबाद.**

## जाहिर प्रगटन

दिवाणी किरकोळ अर्ज क्रं. २५२/२०२५.

अर्जदार : १. द्रोपदाबाई तुकाराम नवगिरे, वय, ७० वर्षे, धंदा, घरकाम, २. अशोक तुकाराम नर्वागरे, वय. ६४ वर्षे, धंदा, मजुरी,३. दादाराव तुकाराम नर्वागरे, वय. ६० वर्षे, धंदा. मजुरी, ४. दिलीप तुकाराम नवगिरे, वय. ४६ वर्षे, धंदा, मजुरी, ५. संजय तुकाराम नवगिरे, वय. ४७ वर्षे, धंदा, मजुरी, सर्व रा. सोयगांव, ता. सोयगांव, जि. छत्रपती संभाजीनगर.

-विरुध्द-

गैरअर्जदार - कोणीही नाही.

प्रकरण - वारस प्रमाण-पत्र मिळणे बाबत.

सर्व संबंधितांस या जाहिर प्रगटणांद्वारे कळविण्यांत येते की, उपरोक्त अर्जदारांनी वारस प्रमाणपत्र मिळणेंसाठी ॲड. वाय.आर. जावळे, सोयगांव, ता. सोयगांव, जि. छत्रपती संभाजीनगर यांच्या मार्फत या न्यायालयांत अर्ज केलेला आहे. मयत तुकाराम सुखदेव नवगिरे हे दि. २२/०५/१९९४ रोजी मौजे. सोयगांव, ता. सोयगांव, जि. छत्रपती संभाजीनगर येथे त्यांचा मृत्यु झालेला असुन, त्यांच्या पश्चात वरील अर्जदार हे वारस आहे असा अर्ज न्यायालयांत वकीलांमार्फत दाखल आहे. अर्जदार क्रं. १ ते ५ हे मयत तुकाराम सखदेव नवगिरे यांचे एकमेव वारस असुन त्यांना शासकिय लाभासाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे.

तरी ज्या कोणाचा अर्जदारांच्या वारस प्रमाणपत्र देण्यांकरीता उजर अगर आक्षेप असेल त्यांनी हे जाहिर प्रगटनांद्वारे प्रसिध्द झाल्यांपासुन ३० दिवसांच्या आंत या न्यायालयांत योग्य त्या कागदोपत्री पुराव्यांसह ऊजर अगर आक्षेप नोंदवावा अन्यथा अर्जदारांना कायदेशिररीत्या योग्य ते प्रमाणपत्र देण्यांत येईल. पुढील तारीख :- ०८/१०/२०२५.

आज दि. २६/०८/२०२५ रोजी सही व न्यायालयाच्या शिक्क्यांसह दिले.

आदेशावरुन,
विभागीय लिपीक,    सहाय्यक, अधिक्षक
दिवाणी न्यायालय, क. स्तर, सोयगांव.

## जाहीर प्रगटन

**मा. दिवाणी न्यायाधिश न्यायालय क. स्तर गंगापुर यांचे न्यायालयात**

दिवाणी किरकोळ अर्ज नं. ५४६/२०२५

अर्जदार : १) शोभा प्रभाकर कोरडे, यरा ६३ वर्ष, व्यवसाय घरकाग, २) राजु प्रभाकर कोरडे, यय ३३ वर्ष, व्यवसाय गजुरी, ३) दत्ता प्रभाकर कोरडे, यय २० वर्ष, व्यवसाय गजुरी, अर्जदार नं. १ से ३ रा.सायखेडा, ता. गंगापुर जि. औरंगाबाद ४) गीताबाई संतोषप थोरात, यय ३५ वर्ष, व्यवसाय घरकाम, रा.कांबी, ता.शेवगाय, जि. अहमदनगर ५) रोहिणी गणेश गरकड, यय २९ वर्ष, व्यवसाय घरकाम, रा.व-हाणपुर, ता. नेवासा जि. अहमदनगर

विरुध्द

गैरअर्जदार : निरंक

प्रकरण : बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम २ प्रमाणे वारस प्रमाणपत्र मिळणे कामी अर्ज.

या व्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त अर्जदार यांनी त्यांचे विधीज्ञ ॲड.एस. के. लांडे, गंगापुर यांचे मार्फत Bombay Regulation Act VIII 1827 अन्वये वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत या न्यायालयाकडे अर्ज दाखल केला आहे की, अर्जदार हे वरील ठिकाणचे कायमचे रहिवाशी असुन अर्जदार नं. १ हि अर्जदार नं. २ ते ५ यांची आई असुन अर्जदार नं. १ चे पती व अर्जदार नं. २ ते ५ चे वडील नामे प्रभाकर उत्तमराव कोरडे हे मौजे सावखेडा, ता. गंगापुर जि. औरंगाबाद येथील रहिवासी होते व ते कार्यकारी अभियंता जायकवाडी पाटबंधारे विभाग नाथसागर (उ) पैठण ता. पैठण जि. औरंगाबाद येथे मजुर म्हणुन नोकरीस होते व ते दि.०१/०३/२००८ रोजी मौजे विहामांडवा, ता.पैठण जि. औरंगाबाद येथे नोकरीस असताना मयत झालेले आहेत. तसेच मयत प्रभाकर उत्तमराव कोरडे यांचे वडील नामे उत्तमराव श्रीपतराव कोरडे आणि आई नामे सरस्वतीवाई उत्तमराव कोरडे मयत झालेले आहेत. मयत प्रभाकर उत्तमराव कोरडे यांना अर्जदार नं. १ ते ५ हेच एकमेव कायदेशीर वारसदार असुन अर्जदारांच्या व्यतीरिक्त मयत प्रभाकर उत्तमराव कोरडे यांना इतर कोणीही वारसदार नाहीत. करीता उक्त अर्जदारांना कार्यकारी अभियंता जायकवाडी पाटबंधारे विभाग नाथसागर (उ) पैठण ता. पैठण जि. औरंगाबाद यांचे कार्यालयात मयत प्रभाकर उत्तमराव कोरडे यांचे पदावर अर्जदार नं. २ राजु प्रभाकर कोरडे यास अनुकंपा तत्वानुसार नोकरीवर रुजु होणे कामी आणि शासकीय, निमशासकीय कामासाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता असल्याने, त्यांनी Bombay Regulation Act VIII 1827 अन्वये वारस प्रमाणपत्र त्यांचे हक्कात देणे बाबत या न्यायालयात अर्ज

सादर केला आहे. त्याअर्थी तमाम जनतेस या व्दारे कळविण्यात येते की, अर्जदारांच्या प्रस्तुत अर्जातील मागणीस कोणाचा काही आक्षेप-उजर असल्यास संबंधितांनी त्यांचा आक्षेप-उजर या न्यायालयात व्यक्तीशः अथवा विधीज्ञामार्फत हे जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्याच्या तारखेपासुन ३० दिवसांच्या आत नोंदवावा, मुदतीनंतरचा आक्षेप विचारात घेतला जाणार नाही व अर्जदारांच्या हक्कात त्यांनी मागणी केले प्रमाणे वारस प्रमाणपत्र' जारी करण्यात येईल. करीता हे जाहीर प्रगटन माडो सही व शिक्क्यानी आज दिनांक २५/०८/२०२५ रोजी दिले.

कनिष्ठ लिपीक    सहाय्यक अधिक्षक
दिवाणी न्यायालय क.स्तर, गंगापुर

## उत्सवाचा ढोलताशा सुरू पण परवानगीच्या वेबसाईटला टाळं! आयोजकांमध्ये गोंधळ

तभा वृत्तसेवा -सहयोग प्र.जावळे

कन्नड :दि.२७ ऑगस्ट - आजपासून गणेशोत्सवाला सुरुवात झाली असून शहरासह परिसरात मंडळांनी विविध कार्यक्रमांची तयारी केली आहे. मात्र, पोलिस प्रशासनाकडून परवानगीसाठी सुरू केलेली ऑनलाईन प्रणाली पहिल्याच दिवशी कोसळल्याने आयोजक अक्षरशः हैराण झाले आहेत. सदर वेबसाईटवर मोठ्या प्रमाणावर अर्ज दाखल करण्याचा प्रयत्न होताच सर्व्हर डाऊन होऊन वेबसाईट हँग झाली. परिणामी अर्ज सादर होत नसल्याने अनेक मंडळांना आवश्यक परवानगी मिळत नाही. मंडळाचे कार्यकर्ते सांगतात की, अर्ज प्रक्रियेच्या शेवटच्या टप्प्यावर सिस्टमच बंद पडते. त्यामुळे संपूर्ण प्रयत्न वाया जात असून वेळ व श्रम खर्ची पडत आहेत. उत्सवाची रंगत वाढत असताना अजूनही परवानगीबाबत अनिश्चितता असल्याने कार्यकर्त्यांमध्ये संभ्रमाचे वातावरण आहे. परवानगी मिळाली नाही तर आयोजनावर संकट येईल अशी भीती व्यक्त होत आहे. प्रशासनाने तातडीने तांत्रिक बिघाड दूर करून अर्ज प्रक्रिया सुरळीत करावी, अशी मागणी विविध गणेश मंडळांकडून होत आहे.

## जाहीर प्रगटन

**मा. दिवाणी न्यायाधिश साहेब, क. स्तर न्यायालय गंगापूर जि. औरंगाबाद**

सिव्हील एम.ए.क. ५६१/२०२५

अर्जदार :-१) मनसुब देवराव ढोकणे, वय. ६३ वर्षे, धंदा, शेती, रा. टोकी ता. गंगापूर जि. औरंगाबाद २) नारायण देवराव ढोकणे, वय. ४० वर्षे, धंदा, शेती, रा. टोकी ता. गंगापूर जि. औरंगाबाद ३) उषाबाई रघुनाथ शेळके, वय. ५८ वर्षे, धंदा, शेती, रा. आसेगांव ता. गंगापूर जि. औरंगाबाद ४) ताराबाई सुरेश बढे, वय. ५२ वर्षे, धंदा, शेती, रा. जहांगीर बोरगांव ता. गंगापूर जि. औरंगाबाद

विरूध्द

गैरअर्जदार - निरंक

प्रकरण - वारस प्रमाणपत्र (हेअरशिप प्रमाणपत्र) मिळणे बाबत.

याअर्थी, वरील अर्जदारांनी ॲड. एस. के. लांडे यांच्या मार्फत या न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज दाखल केला आहे की, अर्जदार क. १ ते ४ चे वडील नामे देवराव कुशाबा ढोकणे हे दि. १८/०८/२०१३ रोजी मौजे टोकी ता. गंगापूर जि. औरंगाबाद येथे मयत झालेले असून अर्जदार क. १ ते ४ यांची आई व मयत नामे देवराव कुशाबा ढोकणे यांची पत्नी नामे सोनाबाई देवराव ढोकणे ही दि. २२/०६/२०२३ रोजी मौजे टोकी ता. गंगापूर येथे मयत झालेली आहे, तसेच अर्जदार क. १ ते ४ हे आपसात सख्खे बहीन भाउ असून आपसात नातेवाईक आहे. अर्जदार क. १ ते ४ हे वर नमुद पत्त्यावरील रहीवासी असून मयत नामे सोनाबाई देवराव ढोकणे यांना अर्जदार क. १ ते ४ हे एकमेव कायदेशीर वारसदार असून यांच्या व्यतिरिक्त इतर कोणीही कायदेशीर वारसदार नाही. मयतांच्या माघारी केवळ अर्जदार क. १ ते ४ हेच एकमेव कायदेशीर वारसदार आहे व इतर कोणीही कायदेशीर वारस नाही. अर्जदारांना शासकीय/ निमशासकीय व इतर कामासाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे.

त्याअर्थी या जाहीर प्रगटनाव्दारे तमाम जनतेस कळविण्यात येते की, अर्जदारांच्या हक्कात त्यांनी मागणी केल्याप्रमाणे वारस प्रमाणपत्र जारी करण्यास कोणाचाही कोणत्याही प्रकराचा आक्षेप, उजर असल्यास त्यांनी हे जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यपासून ३० दिवसाच्या आत या न्यायालयात स्वतः किंवा वकिला मार्फत आक्षेप उजर नोंदवावा. मुदतीत आक्षेप /उजर न आल्यास अर्जदारांच्या नावे वारस प्रमाणपत्र देण्यात येईल याची नोंद घ्यावी. करिता हे जाहीर प्रगटन.

दिनांक : २५/०८/२०२५

आदेशावरून
सहाय्यक अधिक्षक,
दिवाणी व फौजदारी न्यायालय, गंगापूर

## जाहीर प्रगटन

**मा. दिवाणी न्यायाधिश साहेब, क. स्तर न्यायालय गंगापूर जि. औरंगाबाद**

सिव्हील एम.ए.क. ४२०/२०२५

अर्जदार : १) छाया संतोष तांदळे, वय ४६ वर्षे, धंदा, घरकाम, रा. शिक्षक कॉलनी, गंगापूर ता. गंगापूर जि. औरंगाबाद २) सुमित संतोष तांदळे, वय २६ वर्षे, धंदा, मजुरी, रा. शिक्षक कॉलनी, गंगापूर ता. गंगापूर जि. औरंगाबाद ३) सुप्रिया संतोष तांदळे, वय. २३ वर्षे, धंदा, शिक्षण रा. शिक्षक कॉलनी, गंगापूर ता. गंगापूर जि. औरंगाबाद

विरूध्द

गैरअर्जदार :-निरंक

प्रकरण - वारस प्रमाणपत्र (हेअरशिप प्रमाणपत्र) मिळणे बाबत

याअर्थी, वरील अर्जदारांनी ॲड. एस. के. लांडे यांच्या मार्फत या न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज दाखल केला आहे की, अर्जदार क. १ चे पती व अर्जदार क. २ व ३ चे वडील नामे संतोष पांडुरंग तांदळे हे शिक्षक कॉलनी, गंगापूर ता. गंगापूर येथील रहीवासी होते ते दि. ०२/१२/२००४ रोजी मयत झालेले आहे. अर्जदार क. १ ते ३ हे वर नमुद पत्त्यावरील रहीवासी असून मयत नामे संतोष पांडुरंग तांदळे यांना अर्जदार क. १ ते ३ हे एकमेव कायदेशीर वारसदार असून यांच्या व्यतिरिक्त इतर कोणीही कायदेशीर वारसदार नाही. मयताच्या माघारी केवळ अर्जदार क. १ ते ३ हेच एकमेव कायदेशीर वारसदार आहे व इतर कोणीही कायदेशीर वारस नाही. अर्जदारांना शासकीय / निमशासकीय व इतर कामासाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे.

त्याअर्थी या जाहीर प्रगटनाव्दारे तमाम जनतेस कळविण्यात येते की, अर्जदारांच्या हक्कात त्यांनी मागणी केल्याप्रमाणे वारस प्रमाणपत्र जारी करण्यास कोणाचाही कोणत्याही प्रकराचा आक्षेप, उजर असल्यास त्यांनी हे जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यपासून ३० दिवसाच्या आत या न्यायालयात स्वतः किंवा वकिला मार्फत आक्षेप उजर नोंदवावा. मुदतीत आक्षेप / उजर न आल्यास अर्जदारांच्या नावे वारस प्रमाणपत्र देण्यात येईल याची नोंद घ्यावी. करिता हे जाहीर प्रगटन.

दिनांक : २५/०८/२०२५

आदेशावरून
सहाय्यक अधिक्षक,
दिवाणी न्यायालय, गंगापूर

जा.क्र/धउआ/नोटिस/४१६३/२०२५
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय
बाबा पेट्रोल पंपच्या शेजारी, अदालत रोड, छत्रपती संभाजीनगर
दिनांक:-२५/७/२०२५

**सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था नोंदणी कार्यालय, छत्रपती संभाजीनगर विभाग, छत्रपती संभाजीनगर**

**चौकशी नोटिस**

**(नमुना क्रमांक. २)**

(महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० याचे कलम-२२/ किरकोळ अन्वये) सन २०२५ चा चौकशी अर्ज क्रमांक ९१/२५ कलम किरकोळ

सार्वजनिक विश्वस्त व्यवस्थाः श्री. दधिमती माता मंदिर संस्थान, ७३, टिळकपथ, फ्लॅट नं.५, जहागिरदार चेंबर, औरंगाबाद

नोंदणी क्र. ई- ६९०/औरंगाबाद

अर्जदारः- श्री. गोपाल रामनिवासजी दाधीच अध्यक्ष

गैरअर्जदारः १. श्री. रामलालजी हरसोडया, रा. बालाजी नगर, औरंगाबाद २. श्री. बन्सीलालजी डोबा, रा. नाचगल्ली, औरंगाबाद ३. श्री. लालचंद मदनलाल चिपडा, रा. औरंगाबाद ४. श्री. विष्णुदासजी खटोड, रा. सराफा, औरंगाबाद ५. श्री. जगदिशजी खटोड, रा. खाराकुँआ, औरंगाबाद ६. श्री. मनोहरलालजी विसावा, रा. नक्षत्रवाडी, पैठण रोड, औरंगाबाद.

ज्या अर्थी मा. धर्मादाय उप आयुक्त, छ. संभाजीनगर विभाग छ. संभाजीनगर यांच्या कडून वरील सार्वजनिक विश्वस्त व्यवस्थेसंबंधात वरील किरकोळ अर्जान्वये कलम २२ प्रमाणे नोंदी दाखल करण्यासाठी चौकशी करण्यात येणार आहे.

त्याअर्थी गैरअर्जदार यांना चौकशीची जाहीर नोटिस वृतपत्रातुन प्रसिध्द करण्यात येत आहे आणि फर्माविण्यात येत आहे की, तुम्ही जातीने किंवा मान्यता दिलेल्या प्रतिनिधीमार्फत किंवा योग्य रीतीने सूचना दिलेल्या वकीलामार्फत, मा. धर्मादाय उप आयुक्त, छत्रपती संभाजीनगर यांचे समोर वर दिलेल्या पत्यावर नोटिस प्रसिध्द झाल्यापासुन तीस दिवसाच्या आत वरील बाबींचा अखेरचा निकाल करण्यासाठी ठरविलेल्या सुनावणीस हजर रहावे. आणि चौकशीसंबंधीच्या सर्व महत्वाच्या प्रश्नांची उत्तरे द्यावीत आणि त्यासंबंधीचा तोडी व दस्तऐवजनांच्या रुपातील सर्व पुरावा सादर करावा.

वर निर्दिष्ट केलेल्या जागी व वेळी हजर राहण्यास तुम्ही कसूर केल्यास तुमच्या गैरहजेरीत सदरहू चौकशी होईल, तिचे कामकाज चालविण्यात येईल आणि तिचा निकाल करण्यात येईल अशी तुम्हास नोटीस देण्यात येत आहे. आज दिनांकः २५/०७/२०२५ रोजी माझ्या सहीनिशी व धर्मादाय उप आयुक्तांच्या शिक्क्या निशी दिली.

अधिक्षक (न्याय शाखा)
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,
छत्रपती संभाजीनगर विभाग, छत्रपती संभाजीनगर

## अग्रलेख...

# संकटी पावावे निर्वाणी रक्षावे...

**ॐ नमो जी आद्या । वेद प्रतिपाद्या । जयजय स्वसंवेद्या । आत्मरूपा ॥**

अशा शब्दांत संत ज्ञानेश्वर माउली श्री गणेशवंदनेची सुरुवात करतात. हे विश्वाच्या आदिरुपाला, अनादिस्वरूपाला केलेले नमन आहे. माउली या आत्मरुपाला स्वसंवेद्य म्हणतात. स्वत:च स्वत:च्या चेतनेने जागृत, सजग असलेल्या स्वसंवेद्यतेचे हे वर्णन समाजालाही लागू पडते. गणेशोत्सव हे याच सामाजिक चेतनेचे जागृत उदाहरण आहे. लौकिकार्थाने विचार केला तर वाजतगाजत उत्साही मिरवणुकीने श्री गणेशाची मूर्ती स्थापन करायची, दहा दिवस त्या मूर्तीची नित्यनेमाने पूजा-अर्चा, आरती करायची आणि त्यानंतर पुन्हा वाजत-गाजत मूर्तीचे विसर्जन करायचे, असा हा उत्सव. पण त्याचा सामाजिक आशय वेगळा आहे. मनामनाला जोडणारी ती प्रदीर्घ परंपरा आहे.

आज या गणेशोत्सवाला सुरुवात होत आहे. लाडक्या बाप्पाचे आगमन होत आहे. यंदा तर आठवडाभरापासूनच मोठमोठ्या सार्वजनिक मंडळाच्या भव्य मूर्ती मिरवणुकीसह मंडपात दाखल झाल्या आहेत. सध्या स्पर्धेचे युग आहे. त्यामुळे मंडळामंडळांतही देखाव्यांची स्पर्धा असते आणि त्यासाठी मूर्ती आधीच मंडपात विराजमान होते. तसेही भाविक स्वयंसेवक आपल्या लाडक्या देवतेची वर्षभरापासूनच वाट बघत असतात. त्यामुळे हा आनंदोत्सव थोडा लवकरच सुरू होतो आणि पाहता-पाहता अवघे वातावरण भारावून टाकतो.

गेल्या काही गणेशोत्सवांवर यंत्रणेने थोडीशी बंधने आणली होती. यंदा ती दिसत नाहीत. त्यामुळे जल्लोषाचे प्रतीक असलेल्या मिरवणुका खूपच थाटात निघाल्या. खरे तर डिजेच्या अमर्याद आवाजातील मिरवणुका म्हणजेच उत्सव असा अर्थ नाही. हा उत्सव भक्तांच्या मनात असतो. तो भक्तांच्या श्रद्धेत असतो आणि तो तसुभरही कमी झाला नाही; उलट वाढतो आहे, हा शुभसंकेत मानला पाहिजे. या महोत्सवाशी अनेक सामाजिक, सांस्कृतिक गोष्टी जोडल्या आहेत. त्या या महोत्सवाचे वेगळेपण अधोरेखित करतात. सवाई माधवराव पेशवा यांच्या राज्यकाळात शनिवारवाड्यात हा सण साजरा होत असे. त्या काळी भाद्रपद शु. चतुर्थीपासून दशमीपर्यंत सात दिवस उत्सव चालायचा. मुख्यत: धार्मिक स्वरूपाच्या या उत्सवात कथाकीर्तनादी कार्यक्रम होत असत. १८९४ दरम्यान लोकमान्य टिळकांनी या उत्सवाला सार्वजनिक रूप दिले आणि स्वातंत्र्याचा विचार पेरण्यासाठी त्याचा मोठा प्रसार केला. ब्रिटिशांच्या राजवटीविरुद्ध लोकसंघटन व जनमत तयार करण्याच्या कामी या उत्सवाने खरोखर मोलाचे योगदान दिले. त्यानंतरच्या काळात लोकजागृतीचे एक साधन म्हणून त्यावेळच्या धुरिणांनी या उत्सवाला व्यापक, सार्वजनिक व ज्ञानसत्रात्मक स्वरूप दिले. समाजातील ऐक्याची भावना वाढावी, या हेतूने लोकमान्य टिळकांनी या लोकप्रिय उपास्य देवतेची निवड केली. सर्वांनी काही दिवस एकत्र येऊन वैचारिक मंथन करावे, समाजाच्या भल्याचा विचार करावा म्हणून हा उत्सव गणेशचतुर्थीपासून अनंत चतुर्दशीपर्यंत दहा दिवसांचा करण्यात आला. त्यासाठी पूजाअर्चादी धार्मिक विधींसोबतच कीर्तने, प्रवचने, व्याख्याने असे सांस्कृतिक व धार्मिक कार्यक्रम तसेच मेळे, पोवाडे, भावगीते, नकला, जादूचे प्रयोग असे मनोरंजनाचेही कार्यक्रम सुरू झाले. अशा सार्वजनिक गणेशोत्सवाचा समाजावर चांगलाच परिणाम होईल, याची लोकमान्य टिळकांना खात्री होती. गणेशोत्सवाला संघटनेचे तसेच वैचारिक जागृतीचे एक प्रभावी माध्यम बनवावे हा त्यांचा ध्यास होता. पारतंत्र्यातील आपल्या बांधवांना संघटित करावे आणि राष्ट्रीय अस्मिता जागृत करावी, हाही त्यामागचा उद्देश होता. त्यामुळेच त्यांच्यासह अनेकांचे हात या सत्कर्मात लागत गेले. राष्ट्रीय एकात्मतेची भावना वाढीस लागावी अशी पदे व पोवाडे रचले गेले. तिथपासून तर आजपर्यंत या उत्सवाने आणि उत्सवाशी जोडलेल्या घटकांनी सामाजिक आशय सोडला नाही. आज या महोत्सवाचे थोडे बदलते रूप दिसत असले, तरी अनेक मंडळांतून सामाजिक आणि सांस्कृतिक परंपरा जपली जात आहे, हेही नाकारून चालणार नाही.

गणेशोत्सवाची सुरुवात आपल्या महाराष्ट्रात, पुण्यात झाली असली, तरी दिल्ली, कोलकाता, गोवा, मद्रास यांसारख्या इतर प्रांतांतील शहरांत आणि विशेषत: दक्षिण-पश्चिमेतील राज्यांत मोठ्या उत्साहात हा उत्सव साजरा होऊ लागला. सार्वजनिक गणेशोत्सवामुळे संगीत, नकला, जादू आदी कार्यक्रम करणाऱ्या कलाकारांना प्रोत्साहन मिळाले. नवे-नवे कलाकार उदयास आले. कार्यक्रम विनामूल्य असल्याने सर्वसामान्य जनतेलाही सहभागी होता आले. नंतरच्या काळात गणेश मंडपासमारील मैदानात गाडलेल्या दोन बांबूला सोनेरी पडदा बांधून, सार्वजनिक खांबावरील दिव्यांवर पोते झाकून सिनेमे दाखवले गेले. रोज रात्री कोणत्या मंडळात कोणता सिनेमा होणार, हे दुपारपर्यंत त्या मंडळाच्या फलकावर आणि ध्वनिक्षेपकावर जाहीर होत असे आणि आपल्या आवडीप्रमाणे नागरिक त्या-त्या मंडळाच्या मैदानात सायंकाळी जाऊन बसायचे. तेव्हा सिनेमा आणि तो देखील फुकटात बघणे पर्वणीच होती.

या गणेशोत्सवाचे आरंभापासूनचे आणि आतापर्यंतचे खरे वेगळेपण म्हणजे त्या निमित्ताने समाजातील विविध घटक जवळ आले. समाजात स्नेहभाव वृंदावला. जातीचीच नव्हे, तर धर्माचीही दरी कमी झाली. अनेक मुस्लिम बांधव श्री गणेशाचे पूजन करताना दिसतात. सांगलीच्या वाळवा तालुक्यातील गोटखडी या गावातल्या मशिदीत तर गणपतीची दरवर्षी दहा दिवसांसाठी प्रतिष्ठापना केली जाते. यंदा त्यांचे ४५ वे वर्ष आहे. या गणपतीचे दर्शन घेण्यासाठी हिंदूंसह मुस्लिम धर्मीयही मोठ्या संख्येने येतात. याबद्दलची दंतकथा अशी आहे की, तिकडे एका मंडपात श्री गणेशाची प्राणप्रतिष्ठा झाली होती. मात्र, पावसाळ्याचे दिवस असल्याने मंडप गळत होता. तेव्हा मुस्लिम बांधवांनी एकत्र येऊन मूर्ती मशिदीत हलवली. पुढे तीच परंपरा बनली. काही वेळा बकरी ईद हा सण गणेशोत्सवात आला असताना मुस्लिम बांधवांनी कुर्बानी केली नाही. एकादशीलाही या गावात मांसाहार होत नाही. हे कोणत्याही सक्तीने नाही तर अगदी मनापासून जपले जाते. कोल्हापूर जिल्ह्यातील कुरुंदवाड येथे तर पाच मशिदींमध्ये गणपती बसवला जातो. गावातील कुडेखान बडेनाल साहेब मशीद, ढेपणपूर मशीद, बैरागदार मशीद, शेळके मशीद आणि कारखाना या पाच मशिदीत श्रींची प्रतिष्ठापना होते. असे अनेक समुदायांच्या बाबतीत अनेक ठिकाणी घडताना दिसते. त्यामुळे हा केवळ धार्मिक उत्सव नाही, तर तो सामाजिक आणि सांस्कृतिक ऐक्याचा महोत्सव आहे. गणेशोत्सवाला सार्वजनिक स्वरूप आल्यापासून आजतागायत त्यात अनेक स्थित्यंतरे झालीत, हे खरे आहे. स्वातंत्र्यपूर्व काळात या उत्सवाचे स्वरूप धार्मिक, सामाजिक व राष्ट्रीय होते. स्वातंत्र्यप्राप्ती, एकात्मता, स्वदेशी या मुद्यांवर ते केंद्रित होते. आज थोडे स्वरूप बदलले आहे. उत्कृष्ट रोषणाई करणे, करमणुकीचे व मनोरंजनाचे विविध कार्यक्रम आयोजित करणे यावर अधिक भर दिला जात आहे. मेळे, पोवाडे मागे पडले असून त्याची जागा संगीत, नृत्य आणि स्पर्धांनी घेतली आहे. मिरवणुकीतील डिजेच्या कर्णकर्कश आवाजात सिनेमाची गाणी वाजवली जातात आणि त्यावर तरुणाई थिरकते. शेजारून जाताना आपल्याही हृदयाचे ठोके त्या डिजेसारखे जोरजोराने वाजतात! असे काही बदल काळाच्या ओघात होतात. काळाच्या ओघात बदल अपरिहार्य असतात. मात्र ते सकारात्मक असायला हवेत. सामाजिक हिताच्या व प्रगतीच्या दृष्टीने बदल व्हावेत हे जास्त महत्त्वाचे आहे. त्यासाठी समाजाने चिंतन करणे गरजेचे आहे.

समाजाच्या गरजेनुसार परंपरा निर्माण होतात आणि गरज संपली की परंपरेचा हळूहळू ऱ्हास होतो. गणेशोत्सव मात्र वर्षानुवर्षे कायम आहे. याचाच दुसरा अर्थ असा की, या परंपरेची अजूनही समाजाला तेवढीच गरज आहे. 'संकटी पावावे निर्वाणी रक्षावे...' अशा आराधनेची आवश्यकता या देशाला आजही आहे. कारण ऐक्य गरजेचे आहे आणि समाजोपयोगी कार्याला सर्वांचे हात लागणेही. त्यामुळेच यंदाही बाप्पाला एवढेच मागणे आहे की, त्यानेच आम्हा सगळ्यांचा विवेक जागा करावा आणि आम्हाला इष्टाची, कल्याणाची व मांगल्याची दिशा दाखवावी. ▮

## विशेष

# पर्यावरण शिक्षणाचे दस्तावेजीकरण

**प्रा. सुखदेव बखळे**

'सेंटर फॉर इन्व्हायन्मेंटल रिसर्च एज्युकेशन' (सीआयआरई) चे ठाम मत आहे की, पर्यावरण हा शाळांच्या चार भिंतीच्या आत शिकवण्याचा विषय नाही. शैक्षणिक संस्थांना असा आधार बनवणे अत्यावश्यक आहे, जिथे शाश्वत जीवनशैलीचा उपदेश करण्याऐवजी त्याचे पालन केले जाते. उदाहरणार्थ ऊर्जा संवर्धन, कचरा व्यवस्थापन, पावसाचे पाणी साठवणे, शाळा-महाविद्यालय, शैक्षणिक परिसर आणि इतर परिसर हिरवे करणे, शहरी शेती, अक्षय ऊर्जेचा वापर, सार्वजनिक वाहतुकीचा वापर आणि कागदासारख्या संसाधनांची बचत. या प्रयत्नांमधून साकारत असलेले अनोखे शिक्षणचित्र आवर्जून तपासण्याजोगे आहे.

'सीआईआरई'ने सध्या उचललेले पहिले पाऊल म्हणजे भारतातील पर्यावरण शिक्षणाच्या यशस्वी मॉडेल्सचे दस्तावेजीकरण करणे. दिल्लीतील अनेक शाळा पावसाचे पाणी साठवणे, कचरा व्यवस्थापन आणि हिरवळ यासारख्या शाश्वत उपाययोजना करीत आहेत. संस्कृती स्कूलसारख्या नवीन शाळांच्या इमारतींनी आपल्या स्थापत्य डिझाईन प्लॅनमध्ये पावसाचे पाणी साठवण्याची प्रणाली समाविष्ट केली आहे, तर मीरा मॉडेल स्कूलने पावसाचे पाणी साठवण्याची प्रणाली स्थापित करण्यासाठी कोणत्याही नवीन इमारतीची वैशिष्ट्ये तयार करण्याऐवजी विद्यमान संरचनेतच काम केले आहे. श्रीराम स्कूलने छतावरील पावसाचे पाणी साठवण्याची एक यशस्वी प्रणाली लागू केली आहे. जुन्या काळात पाणी कसे वाचवले जात होते, हे समजून घेण्यासाठी विद्यार्थ्यांना 'हौज-ए-शम्सी' आणि झारणा या दोन पारंपरिक पाणी साठवण्याच्या संरचनांमध्ये नेले जाते.

आजघडीला अनेक शाळा आपल्या कँटीनजवळ गांडूळ-कंपोस्ट किंवा एंजाईम-कंपोस्ट खड्डे तयार करून कचरा व्यवस्थापन समस्या सोडवतात. नंतर हे कंपोस्ट बागकाम प्रकल्प आणि वृक्षारोपण मोहिमांमध्ये वापरले जाते. बहुतेक शाळा हस्तनिर्मित कागद बनवून कागदाचा पुनर्वापर करतात. दिल्लीमध्ये 'लीड स्कूल प्रोग्राम' नावाचा एक अनोखा कार्यक्रम आहे. त्यात एक नियुक्त 'लीड' शाळा परिसरातील २५ इतर शाळांना पर्यावरणीय शिक्षण उपक्रमांवर मार्गदर्शन आणि प्रशिक्षण देते. राजस्थानमधील तिलोनिया येथील 'बेअरफूट कॉलेज'मध्ये सौर ऊर्जा आणि पर्यायी ऊर्जेचे सर्वोत्तम मॉडेल सादर करण्यात आले. संपूर्ण कॉलेज कॅम्पस स्वयंपूर्ण आहे आणि आपल्या ऊर्जेच्या सर्व गरजा ते भागवते. ४० किलोवॅट क्षमतेच्या सौर ऊर्जा युनिटद्वारे हा प्रकल्प चालवला जातो. ग्रामीण, अशिक्षित तरुणांना आणि महिलांना 'बेअरफूट सोलर इंजिनीअर्स' म्हणून



प्रशिक्षित करण्यासाठी हे कॉलेज स्थापन करण्यात आले होते. ते त्यांच्या गावांमध्ये सौर तंत्रज्ञानाचा प्रसार करतात. या महाविद्यालयाने देशभरातील ३९२ ग्रामीण युवक आणि महिलांना 'बेअरफूट सोलर इंजिनीअर्स' म्हणून प्रशिक्षण दिले आहे. त्यांनी आतापर्यंत देशासाठी अनेक महत्त्वाची कामे केली आहेत. त्यांनी ३५० गावे आणि वाड्यांमध्ये एकूण १२ हजार घरांमध्ये सोलर फोटोव्होल्टेईक (एसपीव्ही) होम लाईटिंग सिस्टिम्स बसवल्या आहेत. देशभरातील ३०० प्रौढ शिक्षण केंद्रे आणि ८७० शाळांचे विद्युतीकरण करणे, ३५३० सौर कंदील तयार करणे आणि देखभाल करणे, ४० किलोवॅट सौर पॅनेलद्वारे लडाखच्या २८ दुर्गम गावांमधील १५३० कुटुंबांना कडक हिवाळ्यात तीन तास प्रकाश प्रदान करणे आणि सौर ऊर्जा उपक्रमांद्वारे लेह आणि कारगिल जिल्ह्यांमध्ये सुमारे एक लाख लिटर रॉकेलची बचत करणे अशी कामे त्यांच्यातर्फे करण्यात आली आहेत. कोलकात्यातील शाळा स्वयंसेवी संस्थांसोबत स्वच्छ हावडा प्रकल्प व वृक्ष गणना प्रकल्पासारख्या नागरी प्रकल्पांवर काम करतात.

गुजरातमधील सनोसरा येथे स्थित लोकभारती संस्था सामूहिक जीवनाच्या गांधीवादी तत्त्वांवर कार्य करते आणि आजूबाजूच्या गावांसह एका मोठ्या विस्तार कार्यक्रमाद्वारे प्रशंसनीय सामुदायिक सेवा देते. सध्या लोकभारतीचे कर्मचारी आणि विद्यार्थी माती आणि जलसंवर्धन, सौर विद्युतीकरण, बायोगॅस स्थापना, सेंद्रिय शेती, पशुपालन, ग्राम स्वच्छता, महिला-बाल आरोग्य आणि पोषण, घरगुती औषधी वनस्पती उपचार आणि अंधश्रद्धा निर्मूलन असे विविध उपक्रम राबवतात. या कार्यक्रमांतर्गत शिक्षकांचे छोटे गट आणि सर्व पदव्युत्तर विद्यार्थी दत्तक गावांमध्ये आठवड्यातून किमान चार तास तीन वर्षे काम करतात आणि प्रत्येक विद्यार्थी गावातील किमान पाच कुटुंबांशी जवळचा संपर्क स्थापित करतो. दत्तक गावातील शेतकरी, शाळकरी मुले, महिला आणि ज्येष्ठ नागरिक यासारख्या गटांना वर्षभर चालणाऱ्या शैक्षणिक कार्यक्रमांसाठी लोकभारती कॅम्पसमध्ये आमंत्रित केले जाते. अंतिम वर्षाच्या विद्यार्थ्यांना प्रबंध तयार करण्यासाठी गावकऱ्यांना येणाऱ्या अडचणी नीट समजून घेण्यासाठी सहा महिने गावातील एका कुटुंबासोबत राहावे लागते. तसेच लोकभारती शेजारच्या समुदायांना निसर्गाशी सुसंगत राहण्यास मदत करते.

पुण्यातील अक्षरनंदन शाळा हे पर्यावरणीय शिक्षणाचे एक आदर्श उदाहरण आहे. शाळा अनेक शाश्वत उपाययोजनांचे पालन करते, जे देशभरातील इतर शाळांद्वारे सहज स्वीकारले जाऊ शकतात. जलसंवर्धन, गांडूख खतासह कचरा व्यवस्थापन, विद्यार्थ्यांनी विविध भाज्या आणि कडधान्ये पिकवलेली शेती आणि अनेक पर्यावरणीय प्रकल्प त्यात आहेत. कॉर्पोरेट घराण्यांनी टाकून दिलेला कागद ही संस्था वापरते. वर्तमानपत्रे दान केली आहेत. या मराठी माध्यमाच्या शाळेत, प्रत्येक विद्यार्थी आणि शिक्षकाच्या गाभ्यामध्ये पर्यावरणीय जागरूकता आहे आणि कृतीतून शिकवले जाते. अक्षरनंदन शाळा ही देशभरातील काही अग्रगण्य संस्थांपैकी एक आहे, ज्यांनी शाश्वततेवर लक्ष केंद्रित करून खरोखरच समग्र पद्धतीने पर्यावरणीय शिक्षण देण्यासाठी पुढाकार घेतला आहे.

मसुरीच्या हॅम्प्टन कोर्ट येथील 'कॉन्व्हेंट ऑफ जीसस अँड मेरी स्कूल'ने गेल्या १८ वर्षांमध्ये एक आदर्श कचरा व्यवस्थापन मॉडेल विकसित केले आहे. विपीन कुमार यांनी डिझाईन केलेल्या एका साध्या मॉडेलने शाळेला शून्य कचरा क्षेत्र बनवले आहे. विद्यार्थी आपल्या वर्गातील कचरा दोन डब्यांमध्ये कसा वेगळा करायचा हे शिकत आहेत. याव्यतिरिक्त इयत्ता चौथी ते दहावीचा प्रत्येक विद्यार्थी आठवड्यातून पाच घरांमधून घन/सुका कचरा गोळा करतो. तो शाळेत आणतो आणि कचरा व्यवस्थापन कक्षात वैयक्तिकरीत्या वेगळा करतो. हा घनकचरा शहरातील सरकार-अधिकृत कचरा संकलन केंद्रामध्ये विकला जातो. याव्यतिरिक्त शाळेतील मुलांना ओल्या, जैव विघटनशील कचऱ्याचा पुनर्वापर करायला शिकवले जाते. तो शाळेभोवती वृक्षारोपण मोहिमेत वापरला जातो. मुले अगदी लहानपणापासूनच कचरा व्यवस्थापनाबद्दल शिकत असल्याने स्वतःचा कचरा व्यवस्थापित करण्यास सक्षम बनतात. हे मॉडेल कचरा वेचकांसाठीदेखील खूप उपयुक्त आहे. कचरा वेचकांना किंवा कचरा वेचकांच्या मुलांना शाळेत मोफत प्रशिक्षण दिले जाते. हॅम्प्टन कोर्ट कचरा व्यवस्थापन मॉडेल भारतातील अधिकाधिक शाळांमध्ये स्वीकारले पाहिजे.. ▮

(लेखक अर्थशास्त्राचे निवृत्त प्राध्यापक आहेत.)

## वेध

**गिरीश शेरेकर**

# कथा अमरावतीच्या रेल्वे उड्डाणपुलाची

देशातल्या अनेक शहरांना उड्डाणपूल कसा असतो, हे १९६३ साली कदाचित माहीतही नसेल, तेव्हा अमरावतीच्या राजकमल चौकातून सुरू होणाऱ्या रेल्वे उड्डाणपुलाचे बांधकाम सुरू झाले. पुढच्या पाच वर्षांत तो तयार होऊन वाहतूक सुरू झाली. त्यावेळी या उड्डाणपुलाचे प्रचंड आकर्षण होते. पुलावरचा फुटपाथ व कठड्यांना खेटून उभे राहायचे आणि खालची वर्दळ बघत आनंद लुटायचा, हा अनेकांचा तेव्हा दिनक्रम होता. विरंगुळा म्हणून फेरफटका मारण्याचे ते हक्काचे ठिकाण होते. वर्ष पुढे सरकत गेले. दोन आणखी उड्डाणपूल झाल्याने शहराच्या रचनेतही बदल झाले. स्वाभाविकपणे या उड्डाणपुलाचे आकर्षण कमी झाले होते, पण त्याची उपयोगिता अजिबात कमी झालेली नाही. एकेकाळी या पुलाने शहरातल्या ७० टक्के वाहतुकीचा भार उचलला आहे. वाहतुकीसाठी काही नवे पर्याय उपलब्ध झाल्याने सदर पुलावरची वाहतूक कमी झाली. अमरावती शहरात सध्या दररोज जी वाहतूक होते, त्यातली ४० टक्के वाहतूक याच उड्डाणपुलावरून होत असल्याने त्याच्या आवश्यकतेचा अंदाज येतो. आता हा पूल शिकस्त झाल्याचे सांगून अचानक रविवारी रात्रीपासून सर्व प्रकारची वाहतूक बंद करण्यात आली आहे. आपसूकच ही वाहतूक लगतच्या अन्य मार्गावर वळविण्यात आल्याने त्या रस्त्यांवर खूप भार वाढला. प्रचंड वाहतूक कोंडीचा प्रत्यय पहिल्याच दिवशी अमरावतीकरांना आला.



सार्वजनिक बांधकाम विभागाच्या नोंदीनुसार बंदिस्त स्वरूपाच्या या उड्डाणपुलाला आता ६२ वर्षे पूर्ण झाली आहेत. राज्याच्या व रेल्वेच्या बांधकाम विभागाने संयुक्तपणे हा पूल तयार केला आहे. बांधकामाचे जे नियम आहेत, त्यानुसार या पुलाचे आयुष्यमान केव्हाच संपुष्टात आले. वेळोवेळी डागडुजी करून पुलाचे आयुष्य पुढे ढकलण्याचेच काम आतापर्यंत झाले. असे का करता हे कोणीच संबंधितांना विचारले नाही, हे आश्चर्य आहे. रेल्वे विभागाच्या हद्दीत पुलाचा जो भाग आहे, तेथे गर्डर टाकून हा पूल बनविण्यात आला आहे. त्याच गर्डरला नटबोल्टने जोडलेल्या प्लेट्स कमकुवत होत असल्याचे लक्षात आल्यावर रेल्वे विभागाने पुलाची प्राथमिक तपासणी केली. त्यात धक्कादायक वास्तव समोर आल्याने त्यांनी पुलावरून जड वाहतूक बंद करण्याच्या सूचना दिल्या. सार्वजनिक बांधकाम विभागाने या पुलाचे लगेच सखोल संरचनात्मक परीक्षण केले. अहवाल येताच सर्व प्रकारची वाहतूक बंद करण्याचा निर्णय घेऊन पूल पाडून नवा बांधणे हाच पर्याय त्यांनी जाहीर केला. जनतेच्या सुरक्षेपलीकडे काही नाही. पण, किमान पायदळ व दुचाकीने जाणाऱ्यांचा भार जर हा पूल सहन करत नसेल तर मग या पुलाची देखभाल सांभाळणाऱ्या विभागाच्या कार्यपद्धतीचे परीक्षण करणे आवश्यक ठरते. कारण या पुलाचा काही भाग पडण्यापर्यंतच्या स्थितीत येतो आणि संबंधित दोन्ही विभागाकडून कोणतीच पूर्व हालचाल होत नाही. अचानक पूल बंद करण्याचीच घोषणा होते म्हणजेच कोणाचेच त्याकडे लक्ष नव्हते, असा त्याचा अर्थ आहे. नाकातोंडात पाणी शिरण्याची वेळ आल्यावरच सगळे खडबडून जागे झाले. आपल्या अख्त्यारीतला पूल शिकस्त होत असेल किंवा त्याचे आयुष्यमान संपत असेल तर वेळेत दखल घ्यायची कोणी याचा जाब दोन्ही विभागांना जनतेने विचारायला हवा. दोन वर्षांपूर्वी खा. अनिल बोंडे यांनी येथे नवा पूल तयार करण्याचे सूतोवाच करून नवे डिझाईन करण्याच्या सूचना दिल्या होत्या, त्याचे काय झाले? तेव्हाच हा विषय बांधकाम विभागाने ताकदीने रेटला असता तर आजची स्थिती वेगळी असती. जुलै महिन्यात जड वाहतुकीसाठी पूल बंद झाल्यावर त्यांनी रेल्वे मंत्र्यांना नव्या पुलासाठी पैशांची मागणी केली, त्याचे उत्तर अद्याप जाहीर झालेले नाही.

पुलासंदर्भातला जो घटनाक्रम समोर आहे, तो कमालीचा संशयास्पद आहे. वेगवेगळ्या लाजिरवाण्या चर्चा शहरात होत आहेत. पुलाचे नवे डिझाईन शहराच्या पुढच्या ५० वर्षांच्या वाहतुकीचा ताण लक्षात घेऊन तयार करावा लागेल. सध्या ज्या विभागाकडे हा पूल आहे, तोच ते करणार की अन्य कोणता? पैसे कोण देणार हेही स्पष्ट नाही. कारण कोणाचेच लक्ष नसल्याने पूर्वतयारी काहीच नाही. पूल बंद होऊन दोन दिवस झाले. अजूनही कोणी समोर आलेले नाही. नागरिक बोटे मोडून शिव्याशाप देत आहेत. लवकर समाधानकारक उत्तर मिळावे, अशी त्यांना अपेक्षा आहे. हा पूल देखणा, दर्जेदार आणि वेगाने बनवायचा असेल तर केंद्रीय रस्ते वाहतूक मंत्री नितीन गडकरी व मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हेच सक्षम पर्याय असल्याचे जनतेचे मत आहे. कितीही लवकर निर्णय घेतला तरी पूल तयार व्हायला किमान दोन वर्षे लागतील. पुलाचे भाग्य केव्हा उजळते बघूया! ▮

९४२०७२१२२५

## धर्म-संस्कृती

# श्रीगीता : आत्मसंयम योग

**प्रा. दिलीप जोशी**

श्रीमद्‌भगवद्‌गीतेचा सहावा अध्याय 'आत्मसंयम योग' नावाने सुपरिचित आहे. नावावरून आपल्याला एवढे नक्की समजते की, संयम पाळायला भगवान सांगत असतील. कारण आपण संसारिक सर्वजण ऐहिक सुखासाठी दिवसरात्र धडपडत असतो. म्हणजे आपण सतत संसारिक कर्मरत असतो. सहज विचार करा; आपल्याला अपेक्षित सुखांना थांबा आहे का? याचे उत्तर नकारार्थी आहे. एक उपभोग मिळाला की लगेच त्याहून उच्च भोगासाठी आपली धडपड असते. कितीही इच्छापूर्ती झाली तरीही आपण अतृप्तच असतो. त्यातच मरतोदेखील. जसा कडक लाकूड पोखरू शकणारा भुंगा जेव्हा कमलदलात अडकतो तेव्हा तो कोवळ्या कमलदलात अडकून मरतो; पण तो कोवळ्या कमळाला पोखरत नाही तसेच आपणही स्वसामर्थ्य विसरून संसारात मोहग्रस्त होऊन अडकतो. उपभोग आणि विषयभोग आपल्याला गोड वाटतात. पण हे सर्व विषय सदोष, अनित्य, दु:खाला कारणीभूत आणि मिथ्या आहेत. त्यामुळे ते आपल्याला बद्ध करतात. याचा अर्थ हे सर्व सुखोपभोग, विषय नाशवंत आणि मर्यादित आहेत. हे आपल्याला सांगण्यासाठी हा आत्मसंयम योग आहे. विषय भोगातून बाहेर पडायचे असेल तर विषयांचे पंख छाटण्याचे एकमेव शस्त्र आहे ते म्हणजे संयम. भगवंतांनी हाच आत्मसंयम या अध्यायात विशद केला आहे.

**'यदा हि नेंद्रियार्थेशू न कर्मस्वनुषंजते ।**
**सर्वसंकल्पसंन्यासी योगारूढस्तदोच्यते ॥'**

जो पुरुष इंद्रियांच्या विषयांत आणि तदनुरूप कर्मामध्ये आसक्त होत नाही, त्यालाच योगारूढ पुरुष म्हटले आहे. त्यासाठी आत्मसंयम योग हाच आहे. हा संयम स्वत:च्याच हातात आहे.

**'उद्धरेदात्मनात्मानं नात्मानमवसादयेत् ।**
**आत्मैव ह्यात्मनो बंधुरात्मैव रिपुरात्मनः ॥'**

भगवान स्पष्ट सांगतात की, स्वत:नेच स्वत:चा उद्धार करावा. कारण आपणच आपले स्वत:चे मित्र आणि शत्रू आहोत. जसा एखादा महारोगी स्वत:वरचे उपचार स्वत:च करतो; तसा हा संसाराचा जडलेला महारोग आपला आपणच संयम आणि विवेकाच्या उपचाराने घालवायचा आहे. त्यासाठी आपल्याला सहज जमू शकेल, असा उपाय भगवंताने सांगितला.

**'युक्ताहारविहारस्य युक्तचेष्टस्य कर्मसु ।**
**युक्तस्वप्नावबोधस्य योगो भवती दुःखः ॥'**

आत्मसंयम कुठून सुरू करायचा तर संयमित नियमित आहार आणि विहार, नित्यकर्मात संयमित राहणे, निद्रा आणि जागरण यातही संयम हवा. (रात्रंदिवस मोबाईलमध्ये अडकलेले आपण ना झोप ना जेवण व्यवस्थित घेतो.) संयमामुळेच दु:खहरण होते. पुढे त्याला संयमित चित्तवृत्ती प्राप्त होते. भोग कामनांविषयी आकर्षण राहत नाही. मग असा पुरुष योगारूढ झाला असे समजावे. जसा एखादा दिवा निर्वात स्थळी स्थिर राहतो तसाच संयमित चित्ताचा योगारूढ पुरुष सर्व स्थितीत स्थिर राहतो. सुखाने आणि दु:खाने विचलित न होता तो पुढे चालतो.

**'शनैः शनैरूपरमेद्बुद्ध्या धृतिगृहीतया ।**
**आत्मसंस्थं मनः कृत्वा न किंचीदपि चिंतयेत् ॥'**

विवेक आणि संयमाने मनाला स्थिर करून आत्मबुद्धीने सर्वातून मनाला निवृत्त करायचे. मनाला क्रमाक्रमाने आत्मस्वरूपात स्थिर करून त्यानंतर कोणत्याही विषयाचे स्मरण करायचेच नाही.

**'यतो यतो निश्चरति मनश्चंचलमस्थिरम् ।**
**तटस्ततो नियम्यैतदात्मन्येव वशं नयेत ॥'**

आपले मन अचपळ, अगतिक, चंचल आणि अस्थिर आहे. ते विषयाकडे वारंवार धावते. त्या मनाला आत्मसंयमाने आवर घालून विवेकाने त्याला स्वरूपस्थितीत बांधून ठेवणे. यालाच आत्मसंयम योग म्हणतात. खरं सांगू, ज्याचे मन संयमित त्याच्यातील रजोगुण पूर्ण शांत स्वरूप होतो. रजोगुण शांत असेल तर त्याला ऐश्वर्याचा विवेक प्राप्त होतो. उदा. झोपेसाठी वातानुकूलित खोली असणे हे झाले ऐश्वर्य आणि वातानुकूलित नसली, तरी साध्या खोलीतही वातानुकूलितसारखी गाढ झोप लागणे हा ऐश्वर्याचा विवेक. दोन्ही स्थितीत जो समसुख मानतो तोच खरा सर्वसुखी आहे.

भगवान पुढे सांगतात... **'यो मां पश्यति सर्वत्र सर्वंच मयि पश्यति ।**
**तस्याहं न प्रणश्यामि स च मे न प्रणश्यति ॥'**

सर्व जीवमात्रात परमेश्वर पाहतो त्याला मी दूर नाही किंवा मला तो दूर नाही. तो आणि मी एकच. हे अर्जुना, जो स्वत:कडे जसा पाहतो तसाच इतर जिवांना सम भावाने पाहतो. सुख आणि दु:ख एकाच पारड्यात मोजतो तो सामान्य असला, तरीही तो योगीच आहे. हा विवेक साधण्याचा प्रयत्न आपण नक्की करू शकतो. यावर अर्जुन शंका विचारतात आणि भगवंत उत्तर देतात. ही प्रश्नोत्तरी आपल्या दृष्टीने महत्त्वाची आहे. अर्जुन म्हणतात, हे भगवंता! तुम्ही सांगितलेला समत्वभाव कळला, पण मन तर चंचल आहे, अस्थिर आहे. त्याला वश करायचे म्हणजे वारा हातात कोंडण्यासारखे आहे. त्यामुळे खरंच हा समत्वभाव मिळू शकेल?

भगवंत इथे सांगतात... **'असंशयं महाबाहो मनो दुर्निग्रहं चलम् ।**
**अभ्यासेन तु कौन्तेय वैराग्येण च गृह्यते ॥'**

तुझा संशय बरोबर आहे, पण त्यासाठी अभ्यास, वारंवारिता यामुळे ते शक्य होईल. पुन्हा अर्जुन विचारतो की, समजा आपल्याला सर्वांप्रती समभाव साधला गेला; कालांतराने ही वृत्ती आपल्यातून नष्ट झाली तर त्यामुळे नुकसान होईल का? याचे उत्तर भगवंत देतात की, अशा योगभ्रष्ट पुरुषांचे कोणतेही नुकसान होणार नाही. त्याला मोक्ष मिळाला नाही तरी पूर्वजन्मीच्या अभ्यासामुळे पुढील जन्म पुन्हा योग परंपरेतच होईल, हा विश्वास भगवान देतात. आणि जर योगभ्रष्ट न होता तो कायम संयमित राहिला तर त्याला हमखास मोक्ष प्राप्ती आहेच.

थोडक्यात सर्व विषयांचा त्याग करून आपले मन विषयांपासून निवृत्त करावे. 'प्रपंच रचना सर्वही भोगून त्यागिली' हे संयमाने शक्य आहे. कारण मनावर संयमन केले तर माणूस अंतर्मुख होतो. अंतर्मुख मनुष्य योगाभ्यासाने आत्मस्वरूप स्थितीत स्थित होतो. हीच आपली परमोच्च विवेक स्थिती आहे. पण समजा प्रयत्न करूनही ही स्थिती प्राप्त झाली नाही तरी भगवंतांनी आपल्याला अधोगती निश्चित होणार नाही; उलट पुढील जन्म साधकाचा मिळेल, असे प्रतिज्ञापत्र दिले आहे.

**'आता अवधान एकले दिजे । मग सर्व सुखांसी पात्र होईजे ।**
**हे प्रतिज्ञोत्तर माझे, उघड ऐका ॥'** ▮

९८२२२६२७३५

## निरोगी जीवनाचा मूलमंत्र

कुठलाही आजार आपल्याला का होतो? तर, त्याचे सहज सोपे उत्तर आहे. तुम्ही स्वीकारल्यामुळे. मात्र आपल्यात प्रतिकारशक्ती आहे. ती आपल्याला कसलाच आजार होऊ नये यासाठी सतत काम करत असते. तिला मनापासून स्ट्राँगली मान्य करा, वापरा हेच खरे शरीरशास्त्र आहे. ताप आल्यावर, सर्दी झाल्यावर, शिंक आल्यावर कसलाही आजार झाल्यावर थोडे थांबा. प्रतिकारशक्तीला काम करू द्या. अशा आजारांवर वारेमाप खर्च करणे शरीरावर अत्याचार आहेत. शरीरशास्त्रात नैसर्गिक प्रतिकारशक्ती म्हणजे खरे विज्ञान आहे. आजारांच्या मागे आपलं अज्ञ मन असतं. कित्येकदा रुग्णाला याची माहिती नसते. डॉक्टरांकडे गेलं आणि उपचार घेतले की तात्पुरतं बरं वाटतं; थोड्या दिवसांनी पुन्हा दुखणं उफाळून येतं. यासाठी मन आणि शरीर यांना जोडणारी काही लक्षणे बघूया -एखाद्या गोष्टीची जबरदस्त भीती किंवा चिंता वाटली की घशाला कोरड पडते. परीक्षेचा किंवा अजून कसला तणाव असेल तर पोटात गोळा येतो. समोर एखादा अपघात किंवा दुर्घटना पाहिली की हातापायातली शक्ती गळून जाते. याविपरीत सतत हसतमुख असणारी व्यक्ती क्वचितच आजारी पडते. आपल्या शरीरातल्या आंतरिक क्रियांवरही अज्ञात मनाची सत्ता चालते. उलट जर तुम्ही ठामपणे विचार केलात माझं शरीर तंदुरुस्त आहे, प्रतिकारशक्ती प्रबळ आहे तर अवचेतन मन तसाच आदेश शरीराच्या पेशींना, अवयवांना पोहोचवतं आणि रोगप्रतिकारशक्ती वाढते. एखाद्या आजाराबद्दल सतत वाचत राहणे, त्याची भीती बाळगणे, यामुळे तो आजार प्रत्यक्षात येण्याची शक्यता वाढते. मात्र सकारात्मक मनस्थिती ठेवून ठरवून टाकलं की, मला काहीही झालं तरी मी यातून बाहेर पडणारच, तर डॉक्टरही सांगतात- अशी माणसं पटकन बरी होतात. तेव्हा दररोज मनाशी बोला- मी निरोगी आहे, माझं शरीर बलवान आहे. सोबतच ध्यानधारणा व प्राणायाम, श्वासावर लक्ष केंद्रित केल्याने मेंदू शांत राहतो व रोगप्रतिकारशक्ती वाढते.

**प्रा. सतीश मेरतकर**/ मेहकर

●● ●●

## विकासात खोडे घालू नका

'वेध' सदरातील 'शक्तिपीठ महामार्ग व्हावा लोकविकासाचा मार्ग' हे स्फूट वाचले (तरुण भारत, २६ ऑगस्ट). मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे विकासाची दृष्टी असलेले, भविष्याचा वेध घेणारे नेतृत्व आहे. त्यांनी सादर केलेल्या अनेक योजना केवळ शेतकऱ्यांच्या नव्हे, तर राज्यातील बहुसंख्य जनतेसाठी उपकारकच ठरल्या आहेत. या योजनांचा लाभ घेऊन जनतेने त्याचा प्रचंड फायदाही करून घेतला आहे. शक्तिपीठ महामार्गामुळेही रोजगाराच्या अनेक संधी उपलब्ध होणार आहेत. नागपूर ते गोवा या महत्त्वाकांक्षी महामार्गाच्या दोन्ही बाजूंना पेट्रोल पंप, हॉटेल्स, इस्पितळे, वाहन दुरुस्त्यांची दुकाने, हवा-पंक्चरची दुकाने अशा अनेक प्रकारच्या व्यवसायांना चालना मिळून रोजगाराच्या संधी उपलब्ध होणार आहेत. त्याचबरोबर पश्चिम महाराष्ट्रातून कोकणात-गोव्यात सहलींसाठी जाणाऱ्या पर्यटकांना सध्या उपलब्ध असलेल्या घाटांमध्ये प्रचंड वाहतुकीला सामोरे जावे लागते. त्यात वेळ, श्रम, पैसा, इंधन वाया जातेच; पण पर्यटकांची कुचंबणा होऊन सहलींमधील मजाही निघून जाते. या महामार्गामुळे असे विविध फायदे होत असतानाही काही राजकीय पक्ष आणि काही संघटनांचे नेते राजकीय स्वार्थासाठी या प्रकल्पाला अकारण विरोध करत आहेत. तेव्हा महाराष्ट्राच्या विकासात योगदान देता येत नसेल तरी हरकत नाही, पण त्यांनी विकासाच्या झारीतील शुक्राचार्य न होता विकासाच्या मार्गात खोडे तरी घालू नये.

**शिवराम वैद्य**/९८५०५१८०१८

●● ●●

## देही सौभाग्यं आरोग्यम्

कैलास पर्वतावर जगत्पिता महादेव उमेसह वास करतात. श्रावण महिन्यात महादेवाचे पृथ्वीतलावर आगमन अवतरण होते. त्यांचे स्तवन, अर्चन, अभिषेक, आरती प्रार्थना होते. त्यानंतर होते त्यांच्या चिरंजीवांचे 'गणराया'चे आगमन. बुद्धिनायकाचे बालगोपालांसह सगळे स्वागत करतात. नंतर माहेरवाशीण माहेरपणासाठी येते. जगत जननी आदिमायेचे तीन रुपे महाकाली, महालक्ष्मी, महासरस्वती. महालक्ष्मी स्वरूपातील ज्येष्ठा-कनिष्ठा अर्थात गौरीपूजनाचा सण. एक शक्तीची देवी तर दुसरी धनधान्य-ऐश्वर्याची देवी.

'देही सौभाग्यं आरोग्यम् । देहीमे परमं सुखम् ।
रुपं देही जयं देही । यशोदेही द्विषोजही ॥'

अशी अष्टधा लक्ष्मी प्रसन्न असली की मनुष्य ऐश्वर्य संपन्न होतो. 'श्री वर्चस्वं आयुष्यं आरोग्यं । विद्याच्छोभमान महियते ।
धान्यं धनं पशुं बहुपुत्रलाभम् । शतसंवत्सरं दीर्घआयुः ॥'

पूर्ण कुटुंबाचं एकमेकांशी घट्ट नातं निर्माण होतं. असे अनेक एकोप्याचे, आनंदाचे क्षण यामुळे निर्माण होतात. मानवी जीवनाचे उदात्तीकरण विकसित होते. माहेरपण तीन दिवसांचे हा एक मोठा संदेश आहे. जास्त दिवस माहेरात रेंगाळले तर कामकाज थांबते. कधी तरी कुणी एवढा वेळ देण्यास कदाचित असमर्थ असतो. तिकडे सासरचेही मंडळी वाट पाहत असतात. तीच तर कर्मभूमि आहे न नंतरच्या जीवनातील! देवीदेवतांना माहेर हवं तर मग श्रीमंत असो वा गरीब, स्वयंसिद्धा असो वा परावलंबी प्रत्येक मुलीला माहेराची आस असते, आकर्षण असते. तिचे स्वागत झाले तरच तिला माहेरी आल्यासारखे वाटते. ती तिच्या बालपणाच्या सुखद स्मृतीमध्ये रमते. तिच्या आवडीचा साजशृंगार, खानपान झाले तर माहेरवाशीण सुखावते. ▮

**डॉ. उज्ज्वला देशमुख**/९४२२८०७२४७

●● ●●

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.
प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८४७२६८ RNI Reg.No 46878/87
stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com

# जिल्ह्यात गणेशोत्सवाचा जल्लोष

## पारंपारिक वाद्यांच्या गजरात बाप्पाचं आगमन



**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.२७ ऑगस्ट**

गणपती बाप्पा मोरया, मंगलमूर्ती मोरया म्हणत मानाच्या गणपतीची मिरवणूक विविध शहरात लक्ष वेधून घेत आहे. गणेशोत्सवाचा आज पहिला दिवस आहे. उत्सवमूर्ती आता थाटात त्यांच्या स्थापना ठिकाणी पोहचत आहेत. त्याठिकाणी विधीवत प्राण प्रतिष्ठापन्ना करण्यात येईल. राज्यात आज घरोघरी आणि विविध मंडळात जल्लोषात गणपती बाप्पाचं आगमन झालं आहे. ढोल-ताशांच्या नादात आणि पारंपारिक वाद्यांच्या गजरात थाटात बाप्पाचे आगमन झाले. मानाच्या गणपतीच्या आगमन सोहळ्याची विवध शहरांमध्ये धूम सुरू होती. भाविक भक्ती भावात न्हाऊन निघाले.

राज्यभरात पुढील १० दिवस गणेशोत्सव हा सण मोठ्या उत्साहात पार पडणार आहे.मुंबई मधील सगळ्या मोठ्या गणपती मंडळामध्ये उत्साहाच वातावरण पाहायला मिळत आहे.लालबाग-परळ परिसर तर गर्दीने फुलून गेला आहे आणि लालबाग च्या राजाच दर्शन घेण्यासाठी पहिल्याच दिवशी मोठी गर्दी पाहायला मिळत आहे.लालबागच्या राजाच्या मुख दर्शन घेण्यासाठी भली मोठी रांग लागली आहे. राज्यातही अनेक शहरात, गाव खेड्यात गणेशोत्सवाचा आनंद सोहळा सुरू झाला आहे. दीड दिवसांचा, पाच दिवसांचा, दहा दिवसांच्या घरगुती गणपत्तीचे आगमन झाले.

# अंबाजोगाई पोलिसांनी नाट्यमयरीत्या अवघ्या सहा तासात खून करणाऱ्या आरोपीस तुळजापूर येथून केले जेरबंद



**तभा वृत्तसेवा**
**अंबाजोगाई दि.२७ ऑगस्ट**

अंबाजोगाई शहरात श्री गणेशाच्या स्थापनेची धामधुम सुरू असताना शहरातील साखर कारखाना रोड असलेल्या हॉटेल दरबार या ठिकाणी काल रात्री अविनाश देवकर या युवकावर दुसऱ्या युवकाने तीक्ष्ण हत्याराने वार केल्याने त्याचा जागीच मृत्यू झाला होता. या हत्ये नंतर आरोपी घटनास्थळावरून फरार झाला होता.

अंबाजोगाई येथील अप्पर पोलीस अधीक्षक चेतना तिडके पोलीस अधिकारी ऋषिकेश शिंदे, शहर पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक शरद जोगदंड, पोलीस उपनिरीक्षक कांदे, निलंगेकर, कांबळे यांच्यासह सह पोलीस पथकाने घटनास्थळी दाखल होऊन मयत अविनाश देवकर यांचा मृतदेह स्वामी रामानंद तीर्थ रुग्णालयात हालवण्यात आलेला होता. त्या नंतर रुग्णालय परिसरात प्रचंड गर्दी

**आरोपी स्वराज्य पौळ याने स्वसंरक्षणार्थ गुन्हा केल्याची कबुली**

जमा झाली होती

त्या नंतर अपर पोलीस अधीक्षक चेतना तिडके पोलीस अधिकारी ऋषिकेश शिंदे, शहर पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक शरद जोगदंड यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक ज्ञानेश्वर कांबळे पोलीस कॉन्स्टेबल भागवत नागरगोजे पोलीस कॉन्स्टेबल गायकवाड यांनी आरोपी स्वराज पौळ याचा सीसीटीव्ही च्या आधारे मार्ग काढत लातूर गाठले आणि त्यानंतर तो लातूरहून पुण्याला जाण्यासाठी एका ट्रॅव्हल्स ने बसल्याचे त्यांच्या तपासात दिसून आल्याने त्यांनी नाट्यमयरीत्या ट्रॅव्हल्स चालकास ट्रॅव्हल्स तुळजापूर येथे थांबवण्यास सांगितली आणि तुळजापूर पोलिसांच्या मदतीने आरोपी स्वराज पौळ यास ताब्यात घेतले असून आज पहाटे अंबाजोगाई शहर पोलीस स्टेशनला आणून हजर केले आहे.दरम्यान प्राथमिक चौकशी मधून आरोपी दरम्यान प्राथमिक चौकशी मधून आरोपी स्वराज पौळ याने स्व संरक्षणार्थ हा हल्ला केल्याचे त्याचे म्हणणे आसुन पुढील तपासात कोणकोणत्या बाबी समोर येतात हे आता पहावे लागणार आहे.

## ना. पंकजाताई मुंडे यांच्या 'रामटेक' निवासस्थानी पर्यावरणपूरक गणरायाचे थाटात आगमन

### 'श्रीं ' ची उत्साहात झाली प्रतिष्ठापना ; सामान्य माणूस, वंचितांसाठी काम करण्यासाठी शक्ती मिळावी यासाठी केली प्रार्थना

**तभा वृत्तसेवा**
**मुंबई दि.२७ ऑगस्ट**

राज्याच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री ना. पंकजाताई मुंडे यांच्या 'रामटेक' या शासकीय निवासस्थानी पर्यावरणपूरक गणरायाचे बुधवारी मोठ्या थाटात वाजतगाजत आगमन झाले. ना. पंकजाताई मुंडे व कुटूंबियांनी श्रींची उत्साहात प्रतिष्ठापना केली.

ना. पंकजाताई मुंडे यांच्या निवासस्थानी दरवर्षी गणेश चतुर्थीच्या दिवशी श्रीची प्रतिष्ठापना केली जाते. स्वतः पंकजाताई मुंडे या उत्सवाची सर्व तयारी करतात. गणपतीची मुर्ती आणण्यापासून ते त्याची स्थापना करण्यापर्यंत त्या स्वतः बारकाईने लक्ष घालतात, यावर्षी त्यांनी गणपतीची आरास अतिशय आकर्षक व सर्वांचे लक्ष वेधून घेणारी केली आहे. सकाळी ढोल ताशांच्या निनादात गणरायाचे आगमन झाले, त्यानंतर विधीवत पूजनाने ना. पंकजाताई मुंडे, त्यांचे चिरंजीव आर्यमान पालवे यांनी श्रींची प्रतिष्ठापना केली. यावेळी माजी खासदार डॉ.प्रीतमताई मुंडे, अगस्त्य खाडे व कुटूंबिय उपस्थित होते.



**सामान्य माणूस अन् वंचितासाठी काम करण्याची शक्ती मिळो**

बाप्पाने प्रत्येक संघर्षावर मात करून पुढे जाण्यासाठी शक्ती दिलीय. यापुढील काळात देखील सामान्य माणसासाठी, वंचितासाठी सातत्याने काम करता यावं एवढी शक्ती मला मिळावी अशी प्रार्थना आपण बाप्पाकडे केली असल्याचं ना. पंकजाताई मुंडेंनी माध्यमाशी बोलताना सांगितलं. दरम्यान, पर्यावरणपूरक गणेश मूर्त्या स्थापन करण्याबाबत त्या म्हणाल्या, मी आता पर्यावरण मंत्री असले तरी फार पूर्वीपासून माझ्या घरी मातीचाच गणपती मी आणते. तथापि पीओपी च्या मूर्त्या शक्यतो आणूच नका, आणल्याच तर त्याचे विसर्जन पर्यावरण विभाग आणि न्यायालयाने दिलेल्या मार्गदर्शक तत्त्वानुसार करावं ही लोकांकडून अपेक्षा व्यक्त आहे असं त्या म्हणाल्या.

## आंतरराष्ट्रीय कराटे स्पर्धेत साहद शेख याचे यश

**तभा वृत्तसेवा**
**माजलगाव दि.२७ ऑगस्ट**

छत्रपती संभाजीनगर येथे पार पडलेल्या आंतरराष्ट्रीय खुल्या कराटे चॅम्पियन्सशिपमध्ये काता व कुमिते या स्पर्धेत येथील साहद सादेक शेख याने प्रथम क्रमांक मिळविला आहे.

छत्रपती संभाजीनगर येथे दि. २४ रविवारी एसडीएमएए इंटरनॅशनल ओपन कराटे चॅम्पियन्सशिप २०२५ चे आयोजन सेल्फ डिफेन्स मार्शल आर्टस असोशिएशन महाराष्ट्र, एस. बी. वेलफेअर फाउंडेशन पुणे, सेल्फ डिफेन्स मार्शल आर्टस असोशिएशन छत्रपती संभाजीनगर यांचे वतीने करण्यात आले होते. यामध्ये येथील साहद सादेक शेख याने अंडर १५ मध्ये काता प्रकारात प्रथम तर



कुमीते प्रकारात व्दितीय क्रमांक मिळविला आहे. त्याच्या या यशाबद्दल संघर्ष मजुर संघटनेचे संस्थापक अध्यक्ष सादेक शेख, माजेद सर, राजु कुरेशी, इकासम राज, शेख अफसर, सय्यद गफ्फार, अयान सय्यद, अमान खान, मकसुद शेख, संजय जाधव, युवराज शिंदे, सादर आत्तार, गुलाब खान, जावेद सय्यद, अखिल शेख यांचेसह सर्व जिल्हाभरातुन तसेच असंगठित बांधकाम कामगार कृती समिती महाराष्ट्र राज्य च्या कामगार व सदस्यांनी अभिनंदन केले आहे.

## कै.दत्ताजी भाले शैक्षणिक संकुलात श्री ची स्थापना

**तभा वृत्तसेवा**
**अंबड दि.२७ ऑगस्ट**

कै.दत्ताजी भाले शैक्षणिक संकुलात स्थानिक व्यवस्था समितीचे अध्यक्ष माननीय श्री व्यंकटेश जी गोसावी यांच्या शुभहस्ते श्री ची स्थापना करण्यात आली.



या स्थापनेच्या वेळी ढोल ताशे वाजवत गणेश मंडळाचे सर्व सदस्य यांनी स्वागतासाठी काढलेल्या सुंदर रांगोळ्या मन भावावर भारावून गेले होते. यावेळी माननीय श्री वेंकटेशजी गोसावी व प्राथमिक विद्यालयाचे मुख्याध्यापक श्री.प्रदीप जोशी सर यांच्या उपस्थितीमध्ये श्री ची स्थापना संकुलामध्ये करण्यात आली. व श्री ची आरती करण्यात आली. सर्व विद्यार्थ्यांना व शिक्षकांना प्रसाद वाटप केले. यावेळी विद्यालयांमध्ये सर्व शिक्षक वृंद आवर्जून उपस्थित होते.

## पुराच्या पाण्यात वाहून गेलेल्या आमेर अजमेर पठाणच्या कुटुंबियांना धनंजय मुंडे यांच्या प्रयत्नातून प्रशासनाकडून चार लाखांची मदत

**तभा वृत्तसेवा**
**परळी वैद्यनाथ दि.२७ ऑगस्ट**

परळी वैद्यनाथ तालुक्यातील पांगरी परिसरातील पुलाच्या कामावर असताना परळी शहरातील कामगार आमेर अजमेर पठाण या तरुणाचा पुराच्या पाण्यात वाहून जाऊन मृत्यू झाला होता; परळीचे आमदार धनंजय मुंडे यांच्या प्रयत्नातून सदर तरुणाच्या कुटुंबीयांना आज प्रशासनाच्या वतीने चार लाख रुपयांच्या मदतीचा धनादेश सुपूर्द करण्यात आला.

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे युवक नेते तथा जिल्हा परिषदेचे माजी गटनेते अजय मुंडे यांच्यासह परळीचे तहसीलदार व्यंकटेश मुंडे यांच्या हस्ते या चार लाखांच्या धनादेशाचे वितरण पठाण यांच्या वारसांकडे करण्यात आले.

धनंजय मुंडे यांनी आपत्ती व्यवस्थापन मधून मयत कामगाराच्या वारसांना आर्थिक साहाय्य करण्याचे निर्देश तहसीलदार तथा स्थानिक प्रशासनास दिले होते त्या अनुषंगाने ही मदत तातडीने करण्यात आली.



बीड विभागीय कार्यालय : आदर्शनगर गणपती मंदिरासमोर पांगरी रोड, बीड मो.९४०३२६४९३०, E-Mail - jagannathdeshmukh2020@gmail.com

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com


# भरपावसात श्री गणेशाच्या ढोलताशांच्या गजरात मिरवणुका

## विघ्नहर्ता चिंतामणीच्या दर्शनासाठी भाविकांची गर्दी, घराघरात श्रीगणेशाची विधीवत पूजा करून स्थापना





**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २७ ऑगस्ट**
श्री गणेश चतुर्थी निमित्त जिल्ह्यात बाजारपेठांमध्ये श्री गणेश मूर्तीसह पूजेचे साहीत्य, सजावटीचे साहीत्य खरेदी करण्यासाठी नागरिकांनी मोठी गर्दी केली होती. भरपावसात गणेश मंडळांनी लाडक्या गणपत्ती बाप्पाची ढोलताशांच्या गजरात मिरवणूक काढली तर घराघरात श्री गणेशाची विधीवत पूजा करून स्थापना करण्यात आली. हिंगोलीचे मुख्य आकर्षण असणाऱ्या श्री विघ्नहर्ता चिंतामणीची पालखी मिरवणूक शहरातील प्रमुख मार्गावरून काढण्यात आली. चिंतामणीचे दर्शन घेण्यासाठी ठिकठिकाणी भाविकांनी गर्दी केली होती. जिल्ह्यात श्री गणेश चतुर्थी निमित्त बाजारपेठांमध्ये सकाळपासूनच श्री गणेशाची मूर्ती खरेदी करण्यासाठी नागरिकांनी कुटुंबासह गर्दी केली होती. लाडक्या बाप्पाला घेवून बच्चकंपनीसह अबालवृध्द अत्यंत आनंदात घरी जात असतांना दिसत होते. घराघरात

गणरायाची विधीवत पूजा करून स्थापना करण्यात आली. तसेच बाजारपेठांमध्ये पूजेचे साहीत्य, प्रसाद तसेच विविध सजावटीचे सामान खरेदी करण्यासाठी नागरिकांनी गर्दी केल्यामुळे बाजारपेठा भरून गेल्या होत्या.
गणेश मंडळांचे पदाधिकारी व कार्यकर्ते भरपावसात लाडक्या गणरायाला वाहनात घेऊन जाण्यासाठी दुकानांमध्ये दिसत होते. यावेळी ढोलताशांच्या गजरात गुलालाची उधळण करीत गणरायाचे स्वागत करण्यात आले. संध्याकाळी उशिरापर्यंत गणेश मंडळांच्या शहरातील विविध भागात मिरवणूका काढलेल्या दिसत होत्या. ढोल ताशांच्या गजरात पदाधिकारी व कार्यकर्ते थिरकत असतांना दिसत होते.
नवसाला पावणारा श्री विघ्नहर्ता चिंतामणी गणपतीची मिरवणूक येथील शासकीय विश्रामगृहापासून काढण्यात आली. या मिरवणुकीत वारकरी मंडळी तसेच संस्थानचे पदाधिकारी तसेच भाविक मोठ्या संख्येने सामील झाले होते. शहरातील प्रमुख मार्गावरून पालखी मिरवणुक जात असतांना भाविकांनी दर्शनासाठी मोठी गर्दी केल्याचे दिसत होते. जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांनी सपत्नीक श्री विघ्नहर्ता चिंतामणी गणपतीची विधीवत पूजा केली. यावेळी संस्थानचे दिलीप बांगर यांच्यासह पदाधिकारी उपस्थित होते.
औंढा नागनाथ येथे गणेशमूर्तीसह पूजेचे साहित्य खरेदीसाठी बुधवारी (ता.२७) भाविकांमध्ये लगबग दिसून आली. बच्चेकंपनी सकाळपासून आपल्या घरी गणरायाची मूर्ती घेऊन जाताना दिसून आले. या ठिकाणी पोलिस निरीक्षक जी. एस. राहीरे यांनी बंदोबस्त ठेवला होता. शहरामध्ये मानाचे गणपती आहेत. गणपती उत्सवाच्या पार्श्वभूमीवर बाजारपेठ फुलली असून, बाजारपेठमध्ये वेगवेगळ्या प्रकारच्या विद्युत रोषणाईच्या लायटिंग तसेच फुलांच्या वेली, मोतीहार, विविध प्रकारचे तोरण, झुंबर, पडदे, गणपती मूर्तीसाठी वेगवेगळ्या रंगाचे फेटे, गणपतीचे विविध प्रकारचे हार, मोत्याच्या माळा व विविध प्रकारचे डेकोरेशन साहित्य विक्रीस आल्याचे दिसून आले. हे सर्व साहित्य खरेदी करण्यासाठी बाजारपेठेमध्ये ग्राहकांची गर्दी होती. गणेश भक्त दुचाकी, स्कूटी, ट्रॅक्टर, टेम्पो, ऑटो आदींद्वारे आपल्या लाडक्या गणरायांची मूर्ती घेऊन जाताना दिसून आले.

## एबीएम इंग्लीश स्कूलमध्ये विद्यार्थ्यांनी बनविले शाडूचे गणपती

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २७ ऑगस्ट**
शहरातील ए बी एम इंग्लिश हायस्कूल येथे येणाऱ्या गणेशोत्सवाच्या निमित्ताने शाळेत मातीपासून मूर्ती बनवण्याच्या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले कार्यक्रमासाठी प्रमुख उपस्थिती म्हणून संस्थेचे अध्यक्ष माननीय दिलीप बांगर,शाळेचे उपमुख्याध्यापक आदेश बोराळकर, चंदा कान्हेड यांच्यासह सर्व शिक्षक व विद्यार्थी आदींची उपस्थिती होती.



या कार्यक्रमांमध्ये अनेक विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्तपणे सहभाग घेतला त्यामध्ये वर्गाच्या गटानुसार क्रमांक काढण्यात आले. त्यामध्ये इयत्ता पहिली ते चौथी या गटामध्ये पार्थवी गजानन कदम, अनन्या चंदेल, ईश्वरी देशमुख, आरोही कोटकर, आराध्या गोबाडे, आरुषी बांगर, या विद्यार्थिनींनी उत्कृष्ट क्रमांक मिळवले तसेच इयत्ता पाचवी ते आठवी या ग्रुपमध्ये शरयू शेप, श्लोक सोनी, रोशन कुमार, सानवी देशमुख, स्नेहल पवार, नेहा पवार ,या विद्यार्थ्यांनी क्रमांक पटकावले प्रसंगी संस्थेचे अध्यक्ष माननीय दिलीप बांगर यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. त्यांचे मनोबल वाढवले तसेच विद्यार्थ्यांनी अत्यंत उत्कृष्ट पद्धतीने आपल्या हाताने गणपतीच्या मूर्ती बनवल्या व सादर केल्या यावेळी विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावरचा उत्साह अवर्णनीय होता एकंदरीत या कार्यक्रमाला अत्यंत उत्साह जनक असा प्रतिसाद मिळाला व हा कार्यक्रम यशस्वीरित्या संपन्न झाला.



**हिंगोली– येथील भारतीय जनता पक्षाच्या जिल्हा कार्यालयात श्री गणेश चतुर्थी निमित्त श्रीगणेशाची विधीवत पूजा करून स्थापना करण्यात आली. यावेळी ज्येष्ठ कार्यकर्ते नारायणराव खेडेकर, जिल्हा सरचिटणीस उमेश नागरे, नंदकिशोर खिल्लारे, उपाध्यक्ष संतोष टेकाळे, तालुकाध्यक्ष माणिक लोडे, चंद्रकांत घोंगडे, अशोक काळे, राहुल शिंदे, गोविंद कऱ्हाळे, सचिन पाटोळे आदींची उपस्थिती होती. छाया– सुनील पाठक**

## संक्षिप्त वृत्त

### स्वयंसिध्दा नारी मंचतर्फे श्रीगणेश अथर्व शीर्षचे गुरूवारी सामूहीक वाचन

हिंगोली– शहरातील प्रसिद्ध श्री विघ्नहर्ता चिंतामणी गणपती मंदिर हे अनेक राज्यामध्ये मोदकोत्सवामुळे सर्व दूर प्रसिद्ध आहे. दरवर्षी गणेश उत्सव कालावधीत लाखो गणेश भक्त आपल्या हिंगोली शहरात श्री विघ्नहर्ता गणपती बाप्पाच्या दर्शनासाठी येतात. ज्या ज्या भाविकांनी अनंत चतुर्दशीला घेतलेल्या नवसाचा मोदकाची लाखो भाविकांना चांगली प्रचिती आलेली आहे. त्यामुळे नवसाच्या मोदकाकरता दरवर्षीच भाविकांची संख्या वाढत असते. शहरातील अनेक सामाजिक कार्यात अग्रस्थानी असलेल्या स्वयंसिद्धा नारी मंच हिंगोलीचे सर्व महिलांनी यावर्षी गणेश उत्सव मध्ये श्री.विघ्नहर्ता चिंतामणी गणपती मंदिर प्रांगणात २८ ऑगस्ट रोजी गुरुवारी सकाळी ७ वाजता गणेश अथर्वशीर्षाचे सामूहिक पठण आयोजन केले असून २१ आवर्तने होणार आहेत. यामध्ये अधिकाधिक संख्येने महिलांनी उपस्थित राहून सामूहिक पठनाने निर्माण होणाऱ्या सकारात्मक ऊर्जेच्या लाभ घ्यावा असे आवाहन स्वयंसिद्धा नारी मंचतर्फे करण्यात आले आहे.

### लहुजी शक्तीतर्फे पोलिस अधीक्षकांना निवेदन



हिंगोली– कळमनुरी तालुक्यातील महसुल कर्मचारी मिनाक्षी खंदारे यांच्या कार्यालयात येऊन असभ्य वर्तन करणाऱ्या आरोपीला तत्काळ अटक करण्याची मागणी लहुजी शक्ती सेनेच्यावतीने पोलीस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे यांचेकडे करण्यात आली आहे. यावेळी पांडुरंग खिल्लारे, बबनराव शिखरे, सुदामा गवळी, विशाल खंदारे, हरिभाऊ सोनूने, आत्माराम गायकवाड, हरिष बोरकर, अनिल खंदारे, दत्ता गायकवाड, कोंडबाजी खंदारे, जिल्हाध्यक्ष संदेश शिखरे व समाज बांधव उपस्थित होते.

### महिला समानता दिनानिमित्त कार्यक्रम

हिंगोली– येथील राष्ट्रमाता जिजाऊ आणि राजे संभाजी महाविद्यालयात महिला समानता दिनानिमित्त जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. यानिमित्ताने बालकल्याण समितीतर्फे तज्ञ मार्गदर्शक पी.आर. हेबांडे यांनी सर्व विद्यार्थ्यांना लैंगिक अपराधा पासून स्वताचे संरक्षण कसे करावे आणि पोक्सो कायद्याबद्दल सखोल माहिती दिली तसेच श्रीमती बाली भोसले व भगत मॅडम यांनी बालविवाह कायदा व शारीरिक तसेच मानसिक अपराधा पासून स्वरक्षण कसे करावे. याविषयी काही नियम समजावून सांगितले तसेच शपथ घेऊन कार्यक्रमाची सांगता करण्यात आली. या कार्यक्रमाला महाविद्यालयाचे प्राचार्य शेळके, शाळेचे मुख्याध्यापक बल्लाळ, उपमुख्याध्यापक डोल्हारे आणि शिक्षकवृंद व मोठ्या संख्येने विद्यार्थ्यांनी उपस्थित होत्या.

## गणेश उत्सवाच्या पार्श्वभूमीवर ६०० समाजकंटकावर प्रतिबंधात्मक कारवाई

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २७ ऑगस्ट**
श्री गणेश उत्सवाच्या काळात कायदा व सुव्यवस्था अबाधित रहावी यासाठी पोलिस विभागाच्यावतीने ६०० पेक्षा जास्त समाजकंटकांवर प्रतिबंधात्मक कारवाई करण्यात आली आहे. याशिवाय कारवाईची मोहीम सुरूच असल्याची माहीती पोलिसांनी दिली आहे.
हिंगोली जिल्ह्यात सुमारे एक हजारपेक्षा अधिक ठिकाणी गणेशमूर्तींची स्थापना केली जाते. गणेशोत्सवाच्या कालावधीत गणेश मंडळांकडून देखावे सादर केले जातात. याशिवाय समाज प्रबोधनात्मक उपक्रम देखील राबविले जातात. गणेश मूर्ती पाहण्यासाठी सायंकाळच्या वेळी महिला, तरूण–तरूणी तसेच भाविकांची मोठी गर्दी होते.
या कालावधीत जिल्ह्यात कुठेही कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ नये यासाठी पोलिस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे, अप्पर पोलिस अधीक्षक कमलेश मीना यांनी जिल्ह्याती पोलिस ठाण्यांमध्ये शांतता समितीची बैठक घेऊन सण, उत्सव शांततेत साजरे करण्याचे आवाहन केले आहे. तसेच हिंगोली जिल्ह्याला शांततेची परंपरा असून ही परंपरा कायम ठेवण्याचे आवाहनही केले आहे.
कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी पोलिस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे यांनी ठाणेदारांना समाजकंटकांवर कारवाई करण्याचे आदेश दिले आहेत. त्यानुसर मागील पंधरा ते वीस दिवसांच्या कालावधीत सुमारे ६०० पेक्षा अधिक समाजकंटकांवर प्रतिबंधात्मक कारवाई करण्यात आली आहे. याशिवाय २० पेक्षा अधिक जणांना जिल्ह्यातून हद्दपार करण्यात आले आहे. जिल्ह्यात कुठेही अनुचीत प्रकार घडू नये यासाठी पोलिस विभाग सतर्क असून गणेश मूर्ती स्थापना मिरवणूकीच्या वेळी संवेदनशील ठिकाणी छायाचित्रीकरण केले जाणार आहे. या सोबतच शहरी भागासोबतच ग्रामीण भागातही चिडीमार पथके स्थापन करण्यात आली आहेत. या पथकांचे गर्दीवर लक्ष राहणार आहे. महिला, तरूणींची छेड काढणाऱ्यावर तातडीने गुन्हे दाखल केले जाणार आहेत.
गणेश मंडळाच्या ठिकाणी काहीजण जुगार खेळणाऱ्यांकडे विशेष लक्ष दिले जाणार असून जुगार खेळतांना आढळल्यास संबंधितांसह पदाधिकाऱ्यांवर कठोर कारवाई करणार असल्याचे पोलिस विभागाने सांगितले आहे. हिंगोली शहरात यावर्षी १०१ गणपतीची स्थापना करण्यात आली असून चोख बंदोबस्त लावण्यात आला आहे.

## सेनगावमध्ये घरात घुसून विद्यार्थीनीचा विनयभंग, गुन्हा दाखल

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २७ ऑगस्ट**
सेनगाव पोलिस ठाण्यांतर्गत एका ठिकाणी कनिष्ठ महाविद्यालयात शिक्षण घेणाऱ्या एका अल्पवयीन विद्यार्थीनीच्या घरात घुसून तिचा विनयभंग करून जीव मारण्याची धमकी देणाऱ्या तरूणावर सेनगाव पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी फरार आरोपीचा शोध सुरू केला आहे.
पोलिसांनी दिलेल्या माहीतीनुसार सेनगाव पोलिस ठाण्यांतर्गत एका ठिकाणी राहणारी अल्पवयीन मुलगी कनिष्ठ महाविद्यालयात शिक्षण घेत आहे. सदर मुलगी दररोज कनिष्ठ महाविद्यालयात जात असतांना नर्सी येथील नामदेव शिंदे हा तरूण तिचा पाठलाग करीत होता. मात्र त्या मुलीने त्याकडे दुर्लक्ष केले होते. नामदेव हा तिला सतत बोलण्याचा प्रयत्न करीत होता मात्र तिने त्याच्या सोबत बोलण्याचेही टाळले. दरम्यान, रविवार दि २४ ऑगस्ट रोजी दुपारी सदर मुलगी घरात असतांना दुपारच्या सुमारास नामदेव याने तिच्या घरात प्रवेश केला. यावेळी त्याने मुलीचा विनयभंग केला तसेच आरडाओरड केल्यास जीवे मारण्याची धमकी दिली. त्यानंतर मुलीस मारहाण करण्यात सुरूवात केली. अचानक झालेल्या या प्रकारामुळे मुलगी घाबरून गेली. तिने आरडाओरड केल्यानंतर नामदेव पळून गेला. सदर प्रकार मुलीने तिच्या कुटुंबियांना सांगितल्यानंतर कुटुंबियांनी थेट सेनगाव पोलिस ठाणे गाठून तक्रार दाखल केली. यावरून पोलिसांनी नामदेव शिंदे रा नर्सी याच्याविरूध्द बाल लैंगिक अत्याचार प्रतिबंधक कायद्यांतर्गत गुन्हा दाखल केला आहे. पोलिस निरीक्षक दिपक मस्के, उपनिरीक्षक खंदारे, जमादार सुभाष चव्हाण यांच्या पथकाने घटनास्थळी भेट देऊन पाहणी केली असून आरोपीच्या शोधासाठी पथके रवाना करण्यात आली आहेत.

## आई जगदंबा मंडळाकडून दांडीया संदर्भात महिला मंडळाची बैठक



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २७ ऑगस्ट**
येथील आई जगदंबा नवरात्र महोत्सव समिती एनटीसीच्या वतीने गरबा/दांडिया महिला समितीची पुर्व नियोजन आढावा बैठक रविवारी संपन्न झाली. या बैठकीत पाच दिवशीय दांडिया महोत्सवाचे आयोजन करण्याचे सर्वानुमते ठरविण्यात आले.
रविवार दि.२४ ऑगस्ट रोजी छत्रपती शिवाजी राजे उद्यान एनटीसी हिंगोली येथे आई जगदंबा गरबा/दांडिया महिला समितीची बैठक संपन्न झाली. या बैठकीत नवरात्र महोत्सवात पाच दिवशीय गरबा/दांडियाचे आयोजन करण्याचे ठरविण्यात आले. यावेळी पासेस वितरण निःशुल्क असुन महिलांसाठी व पुरुषांसाठी वेगवेगळया पासेस संयोजन समितीच्या वतीने वितरीत करण्यात येणार आहे. गणेशात्सवा दरम्यान बासापुजन दिवशी पुन्हा एक बैठक घेऊन संयोजन समिती अंतिम करण्यात येणार आहे. हजारो रुपयांची बक्षीसे मान्यवरांच्या उपस्थितीत प्रत्येक दिवशी वितरीत करण्यात येणार आहेत. या शिवाय अनेक महत्वाचे निर्णय बैठकीत घेण्यात आले. या बैठकीला छाया मगर, योगिता देशमुख, दिपा भक्कड, प्रिती खंडेलवाल, शितल बोरकर, पुजा चौरसिया, मोहिनी इंगोले, पल्लवी ढाले, निकीता जगताप, प्रियल देशमुख, श्रुती देशपांडे, सायली इंगळे यांची उपस्थिती होती.

## पोलिस अधीक्षकांच्याहस्ते फॉरेन्सिक मोबाईल व्हॅनचे उद्घाटन

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली २७ ऑगस्ट**
हिंगोली जिल्हा पोलिस दलाच्या तपास यंत्रणेला अधिक सक्षम बनविण्यासाठी दि २७ ऑगस्ट रोजी अत्याधुनीक फॉरेन्सिक मोबाईल व्हॅन पोलिस दलाच्या ताफ्यात सामील झाली आहे. या व्हॅनचे उद्घाटन पोलिस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे यांचेहस्ते करण्यात आले.



तपास यंत्रणेला अधिक सक्षम बनविण्यासाठी या फॉरेन्सिक मोबाईल व्हॅनचा मोठा वाटा असणार आहे. सदरील व्हॅन गुन्हेगारी घटनास्थळी तत्काळ पोहोचून वैज्ञानिक पध्दतीने तपास करण्यासाठी उपयुक्त ठरणार आहे. पुरावे नष्ट होण्यापूर्वी वैज्ञानिक पध्दतीने गोळा करण्याचे काम व्हॅनच्या माध्यमातून होणार आहे आजच्या काळात गुन्हेगारीत झालेल्या बदलामुळे तपासाची दिशा वैज्ञानिक पध्दतीने नेणे आवश्यक झाले आहे. ही फॉरेन्सिक व्हॅन पोलिस दलाला अत्यंत उपयुक्त ठरेल आणि गुन्हे उघडकीस आणण्यात मदत करेल अशी माहीती पोलिस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे यांनी दिली. यावेळी अप्पर पोलिस अधीक्षक कमलेश मीना, पोलिस निरीक्षक मोहन भोसले यांची उपस्थिती होती.


# मराठा आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर वाहतुक मार्गात बदल

तभा वृत्तसेवा
जालना / प्रतिनिधी

मराठवाडयातील काही मराठा समाज दिनांक २६ ऑगस्ट, २०२५ रोजी पासुन अंतरवाली सराटी या ठिकाणी जमणार आहे. त्यामुळे दिनांक २६ ऑगस्ट, २०२५ रोजी मराठवाडयातील जालना जिल्हा वगळता इतर जिल्ह्यातील सुमारे १० ते १२ हजार लोक अंतरवाली सराटी याठिकाणी जमणार असून, सदर आंदोलन यात्रा दिनांक २७ ऑगस्ट, २०२५ रोजी १०.०० वा. मौजे अंतरवाली सराटी ते मुंबई येथे जाणार आहे. या यात्रेसाठी अंतरवाली सराटी येथे दिनांक २७ ऑगस्ट, २०२५ रोजी ४० ते ५० हजार मराठा आंदोलक जमण्याची शक्यता असल्याने सुमारे १० ते १२ हजार लोक आंदोलन यात्रेत सर्व सामानासह यात्रा सुरु करणार आहे. उरलेली लोक त्यांना बळेगावपर्यंत सोडण्यास येणार आहे. त्याअनुषंगाने सदर ठिकाणी मोठ्याप्रमाणात जनसमुदाय हजर राहणार आहे. सदर आंदोलन यात्रेच्या वेळी अडथळा निर्माण होवु नये, रस्ता मोकळा राहावा तसेच रस्त्यावर वाहणे उभी राहुन मार्गात अडथळा निर्माण होवून कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होवु नये. या दृष्टीने महाराष्ट्र पोलीस अधिनीयम १९५१ चे कलम ३६ अन्वये पोलीस अधिक्षक, अजय कुमार बंसल, जालना यांना प्रदान केलेल्या शक्ती नुसार जालना शहरातील वाहतुक नमुद पर्यायी मार्गाने वाहतुकीचे नियमनासाठी या मार्गावरील वाहतुकीस पर्यायी मार्गाने वळविण्यात (Diversion) आले आहे. सध्याचा प्रचलित मार्ग पैठण फाटा शहागड ते पैठण दिनांक २७ ऑगस्ट, २०२५ रोजी मराठा आंदोलन यात्रेच्या अनुषंगाने वाहतुक नियमन बाबत पर्यायी मार्ग बीड गेवराईकडून येणारी पैठण फाटा शहागड मार्गे पैठणकडे जाणारी वाहने ही शहागड पाचोड एनएच ५२ या महामार्गाने एकेरी वाहतुक जाण्यासाठी - येण्यासाठी राहणार आहे. वरील आदेश दिनांक २७ ऑगस्ट, २०२५ रोजी ९.०० वाजेपासून मराठा आंदोलन यात्रा संपेपर्यत अंमलात राहणा असल्याचे पोलीस अधिक्षक कार्यालय, जालना यांनी कळविले आहे.

# रोटरी आणि रोटरॅक्ट क्लबच्या स्वरम आंतरशालेय स्पर्धेत २८ शाळांचा सहभाग

## रिषी स्कूल व सीटीएमके गुजराती विद्यालय प्रथम



तभा वृत्तसेवा
जालना / प्रतिनिधी

रोटरी क्लब ऑफ जालना व रोटरॅक्ट क्लब ऑफ जालना यांच्या संयुक्त विद्यमाने आणि प्रायोजक एसआरजे स्टीलच्या सहकार्याने शनिवार, दि. २३ ऑगस्ट रोजी जेईएस महाविद्यालयात पार पडलेल्या स्वरम आंतरशालेय गायन स्पर्धेला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. मान्यवरांच्या हस्ते विजेत्या संघांना पारितोषिक प्रदान करण्यात आले. प्रारंभी रोटरी क्लब ऑफ जालनाच्या अध्यक्षा वर्षा पित्ती, सचिव लक्ष्मीनिवास मल्लावत, प्रकल्प प्रमुख प्रशांत महाजन, सुनीती मदन, यश बगडिया रोटरॅक्ट क्लबचे अध्यक्ष चिराग तलरेजा, सचिव शैलेश जैन, प्रकल्प प्रमुख सुमित जैन, अजय जाधव व जितेंद्र कारिया यांच्या प्रमुख उपस्थितीत दीपप्रज्वलनाने स्पर्धेला सुरुवात झाली. या स्पर्धेत सहभागी २८ शाळांच्या विद्यार्थ्यांनी एकापेक्षा एक सरस सादर केलेल्या देशभक्तीपर गीतांनी वातावरण भारावून टाकले. या कार्यक्रमाद्वारे देशभक्तीची भावना जागृत झाली तसेच बालकलाकारांना आपली कला सादर करण्यासाठी एक व्यासपीठ मिळाले. अशा प्रकारच्या आंतरशालेय स्पर्धेचे हे तिसरे वर्ष होते. वाद्यासह गायन या गटात रिषी स्कूलने प्रथम, एमआरडीए स्कूल ने द्वितीय तर पायोनियर इंटरनॅशनल सीबीएसई स्कूलने तृतीय, फक्त गायन या गटात एटीएमके गुजराती विद्यालयाने प्रथम, श्री संत तुकाराम महाराज वारकरी शिक्षण संस्थेने द्वितीय, श्री एम. एस. जैन इंग्लिश स्कूलने जिल्हा परिषद शाळेने तृतीय पारितोषिक पटकावले. या संघांना ट्राफी प्रदान करून मान्यवरांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले. परीक्षक म्हणून सौ. नेहा नितीन दंडे, सखाराम बोरुळ, शिक्षक प्रकाश कुंडलकर यांनी काम पाहिले. याप्रसंगी ज्येष्ठ रोटरियन अरुण अग्रवाल, उपाध्यक्ष सीए भरत अग्रवाल, सहसचिव अभिजीत मालपाणी, युवा उद्योजक यशराज पित्ती, डॉ. दीपक बगडिया, रवी भक्कड, यांच्यासह रोटरी परिवारातील सदस्य, विविध शाळांचे मुख्याध्यापक, शिक्षक आणि संगीतप्रेमी नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# संक्षिप्त

## संघटक विठ्ठलराव बरकुले यांचे उपमुख्यमंत्री ना. अजित पवार यांना विविध मागण्यांचे निवेदन



तभा वृत्तसेवा
परतुर / प्रतिनिधी

आज राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे राष्ट्रीय अध्यक्ष राज्याचे लाडके उपमुख्यमंत्री अजित दादा पवार साहेब यांच्यासोबत जालना जिल्हा संघटक विठ्ठलदादा बरकुले चर्चा करताना त्यांनी विविध कामांच्या मागण्या संदर्भात चर्चा केली व त्यांनी उपविभागीय बांधकाम विभाग कार्यालय परतूरला देण्यात यावे व अपंगांसाठी प्रत्येक कार्यालयात स्वतंत्र ऑफिस असावे व राष्ट्रवादीचे जुने शिलेदार म्हणजेच माजी तालुकाध्यक्ष, सोसायटी चेअरमन, सरपंच, उपसरपंच, माजी सदस्य ग्रामपंचायत, मार्केट कमिटीचे संचालक, पंचायत समिती सदस्य, जिल्हा परिषद सदस्य यांच्यावर कुठल्याही प्रकारचा अन्याय होऊ देणार नाही असे मत दादांनी व्यक्त केले सोबत गर्जे साहेब यांच्या समोर दादांनी कार्यालयात सूचना देऊन सांगितले परतूर मंठा विधानसभेतून जास्तीत जास्त जिल्हा परिषद पंचायत समिती सदस्य निवडून येतील दादाला अवगत केले. व सोबत सदाभाऊ शिरसाट सामाजिक न्याय विभाग जिल्हा उपाध्यक्ष जालना.

## आज पारनेर येथे पाणी संघर्ष समितीची बैठक संपन्न



तभा वृत्तसेवा
अंबड /प्रतिनिधी

अंबड शहरासह तालुक्यातील अवर्षण प्रवन क्षेत्रासाठी जायकवाडी धरणातून पाणी मिळावे यासाठी तालुक्यातील भूमीपुत्रांनी एकत्र येवून जायकवाडी पाणी मागणी संघर्ष समिती २०२४ मध्ये स्थापन करुन वेगवेगळ्या आंदोलनाच्या माध्यमातून शासनाकडे पाण्यासाठी पाठपुरावा सुरू केला आहे. पाणी समिती स्थापनेच्या वर्षपूर्ती निमित्ताने तसेच पुढील वाटचालीसाठी समिती अध्यक्ष अँड. शामसुंदर पाटील यांच्या अध्यक्षतेखाली दि. २५ रोजी दुपारी ४ वा पारनेर येथे बैठक संपन्न झाली. बैठकीला लक्ष्मण गाडेकर, चंद्रशेखर मोहरीर, रविंद्र गोल्डे, शिवप्रसाद चांगले, रामभाऊ लांडे, दिनेश काकडे, अय्युब बागवान, राम शेळके, गोवर्धन भोरे, शिवाजी जाधव, रावसाहेब पवार, शाम राठोड, गजानन सानप, शिवाजी गाडेकर, उध्दव जाधव, समाधान राजपूत, प्रल्हाद जाधव, सावता खांडेभराड, राजू निंबाळकर, बाबासाहेब चव्हाण, विनायक केदारे, राजू जाधव, शरीफ शेख, गणेश केदारे, कैलास खरे, प्रल्हाद बाबर, बाबा मिस्त्री, भगवान गादे, गफ्फार शेख, भगवान गाडेकर, ओम काकडे, रवी जाधव, जनार्दन गाडेकर, प्रेमसिंग राजपूत अमोल आढाव आदी उपस्थित होते. जायकवाडी धरणाच्या पाणी मागणीसाठी सप्टेंबर महिन्यात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस तसेच जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे यांची पाणी समिती भेट घेणार असल्याचे अध्यक्ष पाटील यांनी सांगितले.

## महाबँक ग्रामीण स्वयंरोजगार प्रशिक्षण केंद्रातर्फे राणीऊंचेगाव येथे एकदिवसीय शेतकरी मेळावा संपन्न



तभा वृत्तसेवा
जालना / प्रतिनिधी

महाबँक स्वयंरोजगार प्रशिक्षण केंद्रातर्फे आज दि. २५ ऑगस्ट रोजी राणीऊंचेगाव येथे एक दिवसीय शेतकरी मेळावा संपन्न झाला. या एक दिवसीय शेतकरी मेळाव्यात केंद्र आणि राज्य शासनाच्या बँके मार्फत राबावण्यात येणाऱ्या विविध योजनांची माहिती देण्यात आली. या कार्यक्रमाच्या माध्यमातून शेतीस पूरक जोड धंदे वाढवण्याचा हा एक प्रयत्न आहे असे श्री मंगेश केदार यांनी यावेळी सांगितले. मेळाव्यास प्रमुख पाहुणे म्हणून जालना जिल्हा अग्रणी बँकेचे व्यवस्थापक मंगेश केदार उपस्थित होते. तसेच महाबँक स्वयंरोजगार प्रशिक्षण केंद्रातर्फे संचालक गिरीश सुलताने, प्रशिक्षक दाभाडे उपस्थित होते. कार्यक्रमाचे नियोजन श्रीमती अनुराधा बोराडे आणि कमलेश भुरेवाल यांनी केले. या मेळाव्यात प्रशिक्षणार्थी आणि गावकरी यांची उपस्थिती होती.

# राजर्षी शाहूच्या विद्यार्थ्यांनी बनवल्या पर्यावरण पूरक श्रीगणेश मूर्ती



तभा वृत्तसेवा
पारध / प्रतिनिधी

पारध येथील भिलदरी बहुउद्देशीय संस्थेच्या राजर्षी शाहू विद्यालयातील विद्यार्थ्यांनी शाडू माती पासून पर्यावरण पूरक अशा श्री गणेशाच्या मूर्ती बनविल्या, विद्यार्थ्यांना पर्यावरण पूरक गणेश मूर्तीचे फायदे समजावून सांगण्यात आले. तसेच निसर्गाचा समतोल कसा राखावा तसेच निसर्गाशी आपली असलेली बांधिलकी याचे महत्व विद्यार्थ्यांना पटवून देणे हा मानस ठेवून शाळेने हा उपक्रम राबविला. हा उपक्रम कला शिक्षक विवेक पऱ्हाड यांच्या संकल्पनेतून घेण्यात आला. यावेळी विद्यालयातील सर्व विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. याप्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. राजाराम डोईफोडे, अधीक्षक किशोर वाघ, उपप्राचार्य अमोल बांडगे, मुख्याध्यापक विलास लोखंडे, उपमुख्याध्यापक विवेक अवसरमोल, निलेश लोखंडे, ज्ञानेश्वर आल्हाट, अनिल लक्कस, स्वप्निल वाघ, भागवत पानपाटील, गजानन लोखंडे यांच्यासह विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. विद्यार्थ्यांच्या कलागुणांचा विकास व्हावा या हेतूने विद्यालयाचे कलाशिक्षक आमच्या विद्यालयांमध्ये विविध प्रकारचे उपक्रम नेहमी राबवतात. यासाठी संस्थेचे संस्थापक सचिव डॉ. सुखदेव मांटे सर व संस्थेच्या अध्यक्षा रेवतीताई मांटे यांचे आम्हाला व विद्यार्थ्यांना वेळोवेळी मोलाचे मार्गदर्शन मिळत असते.

# गणेशोत्सव शांततेत साजरा करावा - मनोज राठोड

## मंठा येथे शांतता कमिटीची बैठक संपन्न



तभा वृत्तसेवा
मंठा/ प्रतिनिधी

गणेश मंडळांनी नियमांचे पालन करून कायदा व सुव्यवस्था अबाधित राहण्यासाठी पोलीस प्रशासनाला सहकार्य करून गणेशोत्सव शांततेत साजरा करावा असे आवाहन मंठा पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक मनोज राठोड यांनी केले.

गणेशोत्सव व ईद सणाच्या पार्श्वभूमीवर मंठा पोलीस स्टेशनमध्ये मंगळवार (ता. २६) रोजी शांतता कमिटीच्या बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी श्री राठोड बोलत होते. या बैठकीला नगराध्यक्ष वैजनाथ बोराडे, तहसीलदार कल्याण काळदाते, नगरपंचायतचे मुख्याधिकारी मनोज उकिरडे, उपनगराध्यक्ष अरुण वाघमारे, नगरसेवक दीपक बोराडे, विकास सूर्यवंशी, एन डी दवणे, बाजखान पठाण, आर आर कुलकर्णी, उपनिरीक्षक संतोष माळगे, विठ्ठल केंद्रे, मुस्तफा पठाण यांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी बोलताना पोलीस निरीक्षक मनोज राठोड म्हणाले की, मंठा शहरातील नागरिक शांतताप्रिय असून सर्व सण आणि उत्सव एकोप्याने साजरे करतात, यावर्षी सुद्धा सर्वांनी पोलीस प्रशासनाला सहकार्य करावे तसेच गणेश मंडळांनी नियमांचे पालन करावे अशा सूचना केल्या. यावेळी तहसीलदार कल्याण काळदाते यांनी सांगितले की, गणेश उत्सवावर प्रशासनाची नजर राहणार असून सर्वसामान्य लोकांना अडचण येणार नाही यासाठी प्रयत्न करावेत असे म्हणाले. मुख्याधिकारी मनोज उकिरडे यांनी मिरवणूक मार्गावर सीसीटीव्ही कॅमेरे लावण्यासह मिरवणूक मार्ग तसेच दिवाबत्ती आणि विसर्जन विहिरीतील गाळ काढणे आदी सर्व कामे वेळेत पूर्ण केले जातील असे आश्वासन दिले.

यावेळी नगरसेवक दीपक बोराडे यांनी पोलीस प्रशासनाला सूचना केल्या. विसर्जन मिरवणुकीतील गणेश मंडळांना क्रमांक दिल्यास विसर्जनास कोणतीच अडचण येणार नाही असे सांगितले. या बैठकीला सिराजखान पठाण, कयूमभाई कुरेशी, सुनील कुलकर्णी, प्रकाश मुळे, प्रकाश घुले यांच्यासह सर्व विभागाचे अधिकारी, प्रतिनिधी यांची उपस्थिती होती.

# सीसीआयला कापूस विक्रीसाठी आता कपास किसान ॲप!

## सीसीआयच्या खरेदी केंद्रावर हमीभावाने कापूस विक्री करण्यासाठी शेतकऱ्यांना नोंदणी बंधनकारक - राहुल लोणीकर



तभा वृत्तसेवा
जालना / प्रतिनिधी

भारतीय कपास निगम (सीसीआय) ला कापूस विक्री करण्यासाठी शेतकऱ्यांना आता मोबाईल ॲपच्या माध्यमातून नोंदणी करावी लागणार आहे. 'कपास किसान ॲप' या नावाने उपलब्ध होणाऱ्या ॲपवर नोंदणी न केलेल्या शेतकऱ्यांना सीसीआयमार्फत हमीभावाने कापूस विक्री करता येणार नाही, असे आवाहन परतुर कृषी उत्पन्न बाजार समितीकडून करण्यात आले आहे. सन २०२५-२६ या कापूस हंगामात शेतकऱ्यांना ३० ऑगस्ट २०२५ नंतर कपास किसान ॲप मोबाईलवर डाउनलोड करून १ सप्टेंबर ते ३० सप्टेंबर २०२५ या कालावधीत नोंदणी पूर्ण करावी लागणार आहे. ३० सप्टेंबर २०२५ ही नोंदणीची अंतिम मुदत असून, त्यानंतर नोंदणी करण्याची सुविधा उपलब्ध राहणार नाही. नोंदणीसाठी शेतकऱ्यांना सातबारा उतारा, त्यावर कापूस पिकाची नोंद, आधारकार्ड, शेतकऱ्याचा फोटो असणे अनिवार्य आहे. सीसीआयच्या खरेदी केंद्रावर हमीभावाने कापूस विक्री करण्यासाठी ही नोंदणी बंधनकारक असून, शेतकऱ्यांनी आवश्यक ती कागदपत्रे तत्काळ तयार ठेवावीत, असे बाजार समितीचे सभापती राहुल लोणीकर प्रदेश सचिव भारतीय जनता पार्टी. उपसभापती संभाजी वारे, सचिव आर. बी. लिपने व सर्व सन्माननीय संचालक मंडळ व केंद्र प्रभारी सीसीआय परतुर यांनी आव्हान केले आहे.

# तळणी गावातील अवैध धंद्यांविरोधात नागरिकांचे निवेदन

तभा वृत्तसेवा
तळणी / प्रतिनिधी

तळणी गावात वाढत्या अवैध धंद्यांविरोधात नागरिकांनी आज दि. २६ ऑगस्ट रोजी पोलीस अधीक्षक, जालना यांना निवेदन सादर केले. या निवेदनात गावात खुलेआम सुरू असलेल्या मटका-जुगार, ऑनलाईन व ऑफलाईन चक्री, गुटखा विक्री, पत्ता क्लब तसेच इतर बेकायदेशीर धंद्यांवर तात्काळ कारवाई करण्याची मागणी करण्यात आली आहे. हे निवेदन कैलास सिताराम पवार (मंठा तालुका अध्यक्ष - राष्ट्रीय बंजारा संघटना, जिल्हा अध्यक्ष ग्राहक रक्षक समिती जालना), विष्णू भाऊराव सरकटे व पंढरी लक्ष्मण हानवते (तळणी) यांनी संयुक्तपणे दिले आहे. निवेदनात म्हटले आहे की, या अवैध धंद्यांमुळे गावातील तरुणाई व्यसनाधीन होत असून अनेक कुटुंबांचे संसार उद्ध्वस्त होत आहेत. चोरी, घरगुती कलह, भांडणे, मारामाऱ्या व गुन्हेगारी प्रवृत्ती वाढीस लागली आहे. शेतकरी व कामगार वर्ग व्यसनाच्या विळख्यात अडकत असून समाजातील शांतता व बंधुता धोक्यात आली आहे. नागरिकांनी पुढील मुख्य मागण्या केल्या आहेत . तळणी व परिसरातील सर्व अवैध धंद्यांवर छापेमारी करून कठोर कारवाई करण्यात यावी.भविष्यात असे धंदे पुन्हा सुरू होऊ नयेत यासाठी नियमित गस्त घालावी. अनेक वर्षांपासून तळणीमध्ये कार्यरत असलेल्या बिट जमादाराची तात्काळ बदली करण्यात यावी. या निवेदनाची प्रत आ. बबनराव लोणीकर, जिल्हाधिकारी जालना, पोलीस उपविभागीय अधिकारी परतुर व पोलीस निरीक्षक मंठा यांना पाठविण्यात आली आहे.

# गणेशोत्सव सन डीजे मुक्त साजरा करा उपविभागीय पोलीस अधिकारी कटेकर यांचे नागरिकांना आवाहन



तभा वृत्तसेवा
भोकरदन / प्रतिनिधी

आगामी गणेशोत्व तसेच दिनांक ०५ सप्टेंबर रोजी ईद ए मिलाद उत्सवाचे अनुषंगाने पोलीस अधिक्षक अजयकुमार बन्सल व अप्पर पोलीस अधिक्षक यांच्या मार्गदर्शनाखाली भोकरदन पोलीस स्टेशनच्या वतीने ता.२५ रोजी गणेशोत्व व ईद ए मिलाद पार्श्वभूमीवर शांतता बैठकीचेआयोजन करण्यात आले होते, सदरील शांतता बैठकीला शांतता कमेटी अध्यक्ष म्हणून आमदार संतोष पाटील दानवे, शांतता कमेटी सदस्य, उपविभागीय अधिकारी बी. सरवनन, नायब तहसिलदार अविनाश पाटील, मुख्याधीकारी भोकरदन गजानन तायडे, उपविभागीय पोलीस अधिकारी भोकरदन डॉ. नितीन कटेकर व पोलीस निरीक्षक किरण बिडवे, गटविकास अधिकारी यांची प्रमुख उपस्थिती होती, यावेळी आ. संतोष दानवे म्हणाले की आगामी गणेशोत्सव तसेच ईद ए मिलाद उत्सव शांततेत साजरा करण्याचे आवाहन करण्यात आले असुन संबंधित शासकीय कार्यालय प्रमुख यांना योग्य त्या उपाययोजना करण्याचे सांगीतले आहे. उपविभागीय अधिकारी बी. सरवनन यांचेकडुन योग्य ते मार्गदर्शन करण्यात आले. उपविभागीय पोलीस अधिकारी नितीन कटेकर यांनी व पोलीस निरीक्षक किरण बिडवे पोलीस ठाणे भोकरदन यांनी सदर उत्सवा दरम्यान श्री गणेश स्थापना व विसर्जन मिरवणुकांमध्ये डी. जे. डॉल्बी वाजविण्यात येणार नाही डी. जे, डॉल्बी चा वापर करुन ध्वनि प्रदुषन नियमनाचे उल्लंघन केल्यास संबंधितांवर योग्य ती कायदेशिर कार्यवाही करून डी. जे. जाप्त करण्यात येईल. गणेश विसर्जन मिरवणुका लवकर सुरुवात कतरुन शासनाने दिलेल्या वेळेत सपविण्यात याव्या सदर उत्सव शांततेत साजरे करुन पोलीसांना सहकार्य करण्याचे आवाहन देखील करण्यात आले आहे. या बैठकीला सार्वजनिक बांधकाम उप विभाग सत्यम संगणवार, एस. एस. ई. बी. कार्यालयाचे सुरेश पगारे संदिप कोलते, सरपंच पोलीस पाटील, भोकरदन जाफ्राबाद तालुक्यातील सर्व धर्मीय प्रतिष्ठीत नागरीक, पत्रकार बांधव, तसेच भोकरदन जाफ्राबाद तालुक्यातील श्री गणेश मंडळाचे अध्यक्ष उपाध्यक्ष मोठ्या संख्येने उपस्थित होते .




नांदेड - जिल्ह्यासह शहरात ठिक- ठिकाणी लाडक्या गणरायाचे उत्साहात, ढोल- ताश्याच्या गजरात स्वगत करण्यात आले.

# कायदा व सुव्यवस्था लक्षात घेऊन सण साजरे करावे : शिंदे

**तभा वृत्तसेवा**
**नवीन नांदेड , दि. २७ ऑगस्ट -**



येणाऱ्या काळात गणेशउत्सव असो की अन्य सण उत्सव असो तरुणांनी कायदा व सुव्यवस्था लक्षात घेऊन उत्सव साजरे करावे असे मत पोलीस उपविभागीय अधिकारी इतवारा प्रशांत शिंदे यांनी नांदेड ग्रामीण पोलीस ठाणे येथील शांतता कमिटीच्या बैठकीत उपस्थितांना मार्गदर्शन केले.

नांदेड ग्रामीण पोलीस ठाणे सिडको येथे दिनांक २५ ऑगस्ट रोजी ४ वाजता आयोजित शांतता कमिटीच्या बैठक ठाण्याचे पोलीस निरीक्षक ओमकांत चिंचोलकर यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. या बैठकीस उपविभागीय पोलीस अधिकारी प्रशांत शिंदे यांनी येणारे सण उत्सव आनंदात साजरी करावे तरुणांनी कसली गडबड गोंधळ घालून कायदा हातात घेऊ नये आपापल्या मिरवणुका वेळेत काढून वेळेत गणेश विसर्जन करावे असे मार्गदर्शन करण्यात आले. त्याचप्रमाणे नांदेड ग्रामीण पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक ओमकांत चिंचोलकर यांनीही ठाणे अतर्गत असलेल्या परवाना - विनापरवाना गणेश मंडळांनी आपापले मंडळ व मंडळातील कार्यकर्त्यांनी अजिबात भांडण तंटा असे गैरवर्तन करू नये. पोलीस प्रशासना सहकार्य करावे असे सांगण्यात आले. याप्रसंगी पोनि. रोकडे यांनी गणेश स्थापनेपासून ते विसर्जनापर्यंत होणाऱ्या बारीक सारीक घडामोडीचे विस्तृत माहिती देऊन गणेश मंडळांच्या पदाधिकाऱ्यांना सतर्क रहावे असे सांगण्यात आले.तसेच यावेळी संबंधित विभागाचे अधिकारी यांची उपस्थिती होती आणि त्यांनीही गणेश मंडळांना सूचना केल्या. यावेळी पोलीस उपविभागी अधिकारी इतवारा प्रशांत शिंदे, पोलीस निरीक्षक ओमकांत चिंचोलकर, पोनि. बाळासाहेब रोकडे,पोउपनि ज्ञानेश्वर भोसले, अग्निशामन दलाचे अधिकारी डी. एन. गायकवाड, मनपाचे अधिकारी मोहन लांडगे, वीज महामंडळाचे अभियंता कांबळे यांच्यासह इतर काही अधिकारी व परिसरातील सर्व गणेश मंडळाचे अध्यक्ष, पोलीस पाटील, सामाजिक कार्यकर्ते व पत्रकार यांची उपस्थिती होती. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन बालाजी दंतापले यांनी केले तर आभार प्रदर्शन पोनि. ओमकांत चिंचोलकर यांनी मानले.

## संक्षिप्त वृत्त

### नरसी येथे एकदंत नगर नामफलकाचे पत्रकार गोविंद नरसीकर यांच्या हस्ते अनावरण

**नरसी , दि. २७ ऑगस्ट -** नरसी येथे श्री गणेश उत्सवाचे औचित्य साधून एकदंत नगर मध्ये नायगाव तालुका मराठी पत्रकार संघाचे उपाध्यक्ष गोविंद नरसीकर यांच्या हस्ते दि.२६ ऑगस्ट २०२५ रोजी मंगळवारी




नरसी - मुखेड रोडवरील एकदंत नगर या नाम फलकाचे अनावरण ढोल ताशाच्या गजरेत व फटाक्यांची आतिषबाजी करून करण्यात आले. यावेळी सामाजिक कार्यकर्ते शिवाजी सुर्यवंशी, शंकर टोकलवाड, रमाकांत सुर्यवंशी, एकदंत नगर मधील एकदंत गणेश मंडळाचे सल्लागार, चंद्रकांत सुर्यवंशी, अविनाश बादवाड, अध्यक्ष प्रशांत सूर्यवंशी, सुर्यकांत सुर्यवंशी, सचिन सुर्यवंशी, श्याम पललवाड, साईनाथ सुर्यवंशी, साहेबराव भेदे, अंतेश्वर सुर्यवंशी, अनिल भेदे, तोटरे सह पदाधिकारी, कार्यकर्ते, गावातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### मोक्षवासी प.पु.बळीरामजी भारती महाराज यांचा आज दहावा पुण्यतिथी सोहळा २

**माहूर -**मोक्षवासी परम पुज्य बळीरामजी भारती गुरु राम भारती महाराज दत्त शिखर माहूरगड यांच्या दहाव्या पुण्यतिथी सोहळ्याचा कार्यक्रम २८ रोजी दत्त शिखर माहूरगड येथे आयोजित करण्यात आला आहे. कार्यक्रमाची रूपरेषा पुढीलप्रमाणे असणार आहे. गुरुवार, दि.२८ऑगस्ट २०२५ रोजी सकाळी ६.०० वा. तिर्थस्थापना व दत्तनाम एक्का सुरुवात व दुपारी ३.०० वा. समाधी अभिषेक तसेच रात्री ८ ते १० किर्तन द.भ.प. श्री. दत्ता महाराज मुळावेकर यांचे किर्तनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. रात्री १० ते सकाळी ५.०० वाजेपर्यंत चौसष्ट महापुजेचा कार्यक्रम, तर महापुजेनंतर लगेच जेवणाचा (महाप्रसादाचा) कार्यक्रम राहणार आहे. महाप्रसाद हे सायंकाळी ७.०० ते दत्तभक्तांच्या आगमना पर्यंत सुरू असणार आहे. जास्तीत जास्त दत्तभक्तांनी या पुण्यतिथी सोहळ्यास उपस्थित राहून लाभ घ्यावा, असे आवाहन वासुदेव भारती गुरु बळीरामजी भारती मुख्य पुजारी श्री दत्त शिखर माहूरगड यांनी केले आहे.

### गणेशत्सवाचे औचित्य साधून अन्नेलवार कुटुंबात उत्साहाचे वातावरण

**किनवट -** गणेशोत्सवाचे पावन पर्व संपूर्ण देशभर मोठ्या श्रद्धा, भक्ती व उत्साहाने साजरे केले जाते. या परंपरेला अनुसरून माजी नगरसेविका सौ. अनुसया मधुकर अन्नेलवार व पत्रकार



मधुकर अन्नेलवार यांनी आपल्या निवासस्थानी भगवान श्री गणेशाची विधिवत प्रतिष्ठापना करून मनोभावे पूजन-अर्चन केले. सकाळी शुभमुहूर्तावर गणेशमूर्तीची स्थापना करण्यात आली. त्यानंतर मंत्रोच्चार, आरती व प्रसाद वितरणाने परिसरात भक्तिमय वातावरण निर्माण झाले. घरातील सर्वच सदस्यांसह नातेवाईक व शेजाऱ्यांनी या उत्सवात सहभागी होऊन श्रींच्या चरणी कृतज्ञता व्यक्त केली. अन्नेलवार दांपत्याने या प्रसंगी समाजातील सर्व नागरिकांना एकतेचा, शांततेचा व सद्भावनेचा संदेश दिला. गणेशत्सवाच्या निमित्ताने घरात आनंद, उत्साह व भक्तिभावाचे वातावरण अनुभवायला मिळाले.

### मुगट सर्कलमध्ये मराठा आरक्षण जनजागृती मोटरसायकल रॅली

**नांदेड -**मुदखेड तालुक्यातील मुगट सर्कल मधील सकल मराठा समाज बांधवांनी मराठा आरक्षण संदर्भात दिनांक २९ ऑगस्ट रोजी जरांगे पाटील यांचे मुंबई येथे बेधडक मोर्चा निघणार असून मराठा आरक्षण मोर्चात सहभागी होण्यासाठी सकल मराठा समाज जनजागृती



करण्यासाठी मुगट सर्कलमधील सर्वपक्षीय मराठा बांधव एकत्र येऊन मोटरसायकल रॅली काढण्यात आली. यावेळी मोटर सायकल रॅलीची सुरुवात मुगट गावा पासून आमदुरा, शिखाचीवाडी, रोहीपिंपळगाव,वसंतवाडी, देरेगाव, खुजडा, टाकळी, चिलपिंपरी, महाटी, माळकौठा, कामळज, देवापुर, शंखतीर्थ, वासरी,या गावात प्रत्यक्ष भेटी देऊन मुंबई येथील मोर्चात जाण्यासाठी सर्वांनी तयारी करावी व आपल्या हक्काच्या लढ्यात सहभागी व्हावे असे रॅलीच्या माध्यमातून आवाहन करण्यात आले.सर्व गावातील लोकांनी 'एक मराठा लाख मराठा, जरांगे पाटील तुम आगे बढो हम तुम्हारे साथ है' 'आता कुठे जायचं मुंबईला जायचं!, 'सरसकट मराठ्यांना ओबीसी मधून आरक्षण मिळालेच पाहिजे' 'राज्यकर्ते झाले बहिरे, आमची मागणी सगे सोयरे' अशा घोषणा देत रॅलीला स्फुर्तपणे प्रतिसाद दिला आणि शेवटी आमदुरा येथे राष्ट्रगीताने मोटरसायकल रॅलीची सांगता झाली. या मोटरसायकल रॅलीमध्ये मुगट सर्कल मधील सर्व मराठा समाज बांधवांनी परिश्रम घेतला होता.

### नांदेड येथे बायोमिक्सचे उत्पादन केंद्र सुरू होणार :भागवत देवसरकर

**हदगाव -**वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ परभणी अंतर्गत नांदेड येथील कापूस संशोधन केंद्रात बायोमिक्स औषधीचे उत्पादन केंद्र लवकरच सुरू होणार असल्याची माहिती कार्यकारी परिषदेचे सदस्य भागवत देवसरकर यांनी दिली आहे. नांदेड जिल्ह्यातील हळद व केळी भाजीपाला वर्गीय पिके इतर अनेक पिकासाठी बहुउपयोगी कृषी विद्यापीठाच औषध म्हणून शेतकऱ्यातून नावलौकिक मिळाले असलेलं बायोमिक्सला जिल्ह्यात शेतकऱ्यांतून प्रचंड मागणी आहे. जिल्ह्यातील शेतकरी परभणी येथे जाऊन रांग लावून बायोमिक्स औषधीची खरेदी करत असतात. याच बाबीची दखल घेत शेतकऱ्याची गैरसोय दूर होण्याकरिता कार्यकारी परिषदेचे सदस्य भागवत देवसरकर यांनी पुढाकार घेऊन बायोमिक्स औषधीचे उत्पादन केंद्र नांदेड येथे सुरू करून येथेच विक्री करण्याचा ठराव कार्यकारी परिषदेत मांडला होता. हा ठराव सर्वानुमते मंजूर होऊन कापूस संशोधन केंद्र नांदेड येथे सर्व अत्याधुनिक सोयीसुविधासह बायोमिक्स उत्पादन केंद्र सुरू होणार आहे. त्यामुळे जिल्ह्यातील शेतकऱ्यांची गैरसोय हेळसांड होणार नाही अशी माहिती भागवत देवसरकर यांनी दिली आहे.

# भरदिवसा गोदावरी नदी पात्रातून अवैध वाळू उपसा; प्रशासनाचे दुर्लक्ष

**तभा वृत्तसेवा**
**मुदखेड , दि. २७ ऑगस्ट -**

मुदखेड तालुक्यातील गोदावरी नदी पात्रात भरदिवसा अवैध वाळू उपसा सुरू असून, प्रशासन याकडे डोळेझाक करत असल्याची तीव्र नाराजी नागरिकांमध्ये व्यक्त होत आहे.

गोदावरी नदी पात्रातून मोठ्या प्रमाणात वाळू उपसा होत असल्याने पर्यावरणाला गंभीर धोका निर्माण झाला आहे. शेतजमिनींची धूप, रस्त्यांची हानी आणि पाणीपातळी घसरणे या समस्यांना नागरिकांना तोंड द्यावे लागत आहे.



काही दिवसांपूर्वी गावकऱ्यांनी तहसीलदार कार्यालयात निवेदन देऊन हा उपसा तात्काळ थांबवावा, अशी मागणी केली होती. याशिवाय प्रसारमाध्यमांतूनही हा मुद्दा वारंवार मांडण्यात आला. मात्र, कारवाईच्या नावाने प्रशासन मौन बाळगून असल्याने उपसाऱ्यांचे मनोबल वाढले आहे. भरदिवसा ट्रॅक्टर-ट्रॉलीने वाळू नेली जाते, तरी कोणीही कारवाई करत नाही. शहरातुन भरदिवसा हायवा गाडया भरधाव वेगाने धावत आसल्याने पायी चालणारे नागरिक व दुचाकी वाहनधारकांच्या मनात आपघाताची भीती निर्माण होत आहे जर आपघात झाल्यास याची जबाबदारी कोण घेणार? असा संतप्त प्रश्न नागरिकांनी उपस्थित केला आहे.

अवैध वाळू उपसा थांबवण्यासाठी प्रशासन आता तरी जागे होणार का, की नागरिकांचा आक्रोश दुर्लक्षितच राहणार, असा प्रश्न उपस्थित होत आहे.

# शेतकऱ्यांच्या आयुष्यात सुख- समृद्धी व भरघोस पीक येण्याचे आ. केराम यांचे गणरायास साकडे

**तभा वृत्तसेवा**
**किनवट , दि. २७ ऑगस्ट -**

प्रामुख्याने तालुक्यातील जनतेशी सातत्याने संवाद साधण्यासाठी उभारण्यात आलेल्या आमदार भिमराव केराम यांच्या लोकार्पण या संपर्क कार्यालयात यावर्षी गणेशोत्सवाचे औचित्य साधून श्री गणेशाची स्थापना करण्यात आली. या प्रसंगी आमदार केराम यांनी स्वतः मनोभावे श्री गणेशाची पूजा-अर्चा केली. पूजेनंतर त्यांनी तालुक्यातील अलीकडील पुरामुळे संकटात सापडलेल्या शेतकऱ्यांच्या हितासाठी श्री गणेशाचे चरणी साकडे घालून त्यांच्या आयुष्यात सुख-समृद्धी व भरघोस पीक येण्याची प्रार्थना केली. कार्यक्रमाच्या वेळी




परिसरात भक्तिभावाचे वातावरण निर्माण झाले होते. श्री गणेशाच्या आरतीवेळी उपस्थित मान्यवर व नागरिकांनी सहभाग नोंदवून गणपती बाप्पा मोरयाच्या गजरांनी संपूर्ण कार्यालय परिसर दुमदुमून गेला. या वेळी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे ज्येष्ठ नेते वैजनाथ करपुडे पाटील, माजी उपनगराध्यक्ष अनिल तिरमनवार, भाजपा जिल्हा उपाध्यक्ष श्रीनिवास नेम्मानिवार, सेवा निवृत्त पोलिस निरीक्षक यशवंत जाधव, तसेच अजय कदम, पवन सर्पे यांच्यासह विविध मान्यवर व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. या सोहळ्यामुळे लोकार्पण संपर्क कार्यालय परिसरात उत्सवी आणि धार्मिक वातावरण निर्माण झाले. नागरिकांनी श्री गणेशाची दर्शन घेतले.

किनवट शहरात २५ ते ३० ठीकाणी व किनवट पोलिस स्टेशन हद्दीतील ७२ गावांमध्ये ८२ ते ८५ ठीकाणी सार्वजनिक गणेश मंडळाव्दारे गणेशोत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात येत असुन यावेळी शहरात मानाचे सार्वजनिक व मंडळांचे गणपती स्थापन करण्यात आले आहेत. तसेच भाजपा नेते सुधाकर भोयर, माजी नगराध्यक्ष आनंद मच्छेवार, माजी नगराध्यक्ष के. मुर्ती, माजी नगराध्यक्ष सुनिल पाटील, माजी उपनगराध्यक्ष अनिल तिरमनवार, माजी उपनगराध्यक्ष श्रीनिवास नेम्मानिवार, मंडळ अध्यक्ष स्वागत आयनेनीवार, दानशुर सामाजिक कार्यकर्ते श्रीनिवास यादवराव नेम्मानिवार, शिवसेना शहर प्रमुख सुरज सातुरवार, माजी नगरसेवक संजय सिरमनवार, शिवाजी आंधळे, नरेश सिरमनावार, ड. दिलीप काळे, पत्रकार आशिष देशपांडे, मधुकर अन्नेलवार यांनी हि त्यांच्या घरी मोठ्या उत्साहात श्री गणेशाचे स्वागत करुन उत्साहात गणेशत्सव साजरा केला ज्याला समाज माध्यमाद्वारे नागरीकांनी मोठा प्रतिसाद दिला.

# राष्ट्रीय आरोग्य अभियानातील कर्मचाऱ्यांनी मोर्चामध्ये सहभागी व्हावे

**तभा वृत्तसेवा**
**लोहा, दि. २७ ऑगस्ट -**

राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत अधिकारी व कर्मचारी यांची एकत्रीकरण समिती जिल्हा शाखा नांदेडच्या वतीने २८ ऑगस्ट २०२५ रोजी जिल्हाधिकारी कार्यालयावर धडक मोर्चा काढण्यात येणार आहे. या मोर्चामध्ये जिल्ह्यातील राष्ट्रीय आरोग्य अभियानमधील अधिकारी व कर्मचाऱ्यांनी उपस्थित राहावे, असे आवाहन संघटनेचे जिल्हा सचिव बाळासाहेब चौधरी, जिल्हाध्यक्ष इंजि. माणिक गिरगावकर यांनी केले आहे.

राष्ट्रीय आरोग्य अभियान जिल्हा परिषद नांदेड व महानगरपालिका नांदेड येथील विविध संवर्गातील हजारो कर्मचारी गेल्या १५ ते २० वर्षापासून कंत्राटी पद्धतीने कार्यरत आहेत. या कर्मचाऱ्यांना शासन सेवेत कायम करावे यासाठी कर्मचाऱ्यांनी अनेक वेळा आंदोलने केले, त्यामुळे शासनाने १४ मार्च २०२४ रोजी एक जीआर काढून, ज्या कर्मचाऱ्यांची सेवा दहा वर्षे व त्यापेक्षा जास्त झालेले आहे अशा कर्मचाऱ्यांना शासन सेवेत सामावून घेण्यात येईल. परंतु जवळपास दीड वर्ष कालावधी संपून सुद्धा अद्यापपर्यंत कर्मचाऱ्यांचे समायोजन झालेले नाही, सर्वोच्च न्यायालय व उच्च न्यायालय यांनी सुद्धा,



दहा वर्ष त्यापेक्षा जास्त सेवा झालेल्या कर्मचाऱ्यांना शासन सेवेत कायम करण्याचा निर्णय दिलेला आहे. परंतु न्यायालयाच्या निकालाची सुद्धा अंमलबजावणी शासनाने केलेली नाही.

दि. १९ ऑगस्ट २०२५ पासून महाराष्ट्रभर बेमुदत काम बंद आंदोलन सुरू केले आहे. त्याचाच एक भाग म्हणून नांदेड येथील जिल्हा परिषद कार्यालयासमोर कर्मचाऱ्यांनी बेमुदत काम बंद आंदोलन चालू केले आहे. शासनाला पुन्हा एकदा जागे करण्यासाठी संघटनेची ताकत दाखवण्यासाठी . २८ ऑगस्ट रोजी नांदेड जिल्हाधिकारी कार्यालयावर राष्ट्रीय आरोग्य अभियानातील कर्मचाऱ्यांना शासन सेवेत सामावून घ्यावे, या मुख्य मागणीसाठी तसेच अधिकारी व कर्मचारी यांच्या इतर १८ मागण्या घेऊन भव्य मोर्चा काढण्यात येणार आहे. या अभियानातील सर्व कर्मचाऱ्यांनी सहभागी व्हावे असे आवाहन केले आहे.

# ढिम्म तालुका प्रशासनाच्या कारभाराला वैतागून अखेर काँग्रेस जिल्हा सरचिटणीस समस्याग्रस्त नागरिकांसह जिल्हाधिकाऱ्यांच्या भेटीला

**तभा वृत्तसेवा**
**माहूर , दि. २७ ऑगस्ट -**

माहूर शहरासह तालुक्यातील नागरिकांच्या विविध समस्या सोडविण्यासाठी प्रशासन स्तरावर पाठपुरावा करून नागरिकांच्या समस्या सोडविण्याचा विडा उचलून गेल्या काही महिन्यांपासून सातत्याने पाठपुरावा करत असतांना स्थानिक प्रशासनाकडून केवळ कागदी घोडे नाचविण्या पलीकडे काहीही घडत नसल्याने ढिम्म तालुका प्रशासनाच्या कारभाराला वैतागून भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्षाचे नांदेड जिल्हा सरचिटणीस आनंद पाटील तुपदाळे यांनी दि.२६ रोजी माहूर शहरातील शेकडो लाभार्थ्यांसह जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांची भेट घेऊन निवेदन दिले.

माहूर शहर व तालुक्यातील विविध आवास योजनेच्या घरकुल लाभार्थ्यांना शासनामार्फत ५ ब्रास मोफत वाळू उपलब्ध करून द्या , तसेच खासगी बांधकाम धारकांना रेती उपलब्ध करून द्या या मागणीसाठी दि.२२ जुलै २०२५ रोजी संदर्भीय पत्र २ नुसार तहसीलदार माहूर यांचेकडून लेखी आश्वासन मिळाले. परंतु अद्यापही अनेक जण वंचित आहेत.तसेच माहूर शहरातील तानुशा बानुशा परिसरात एसटी बसला विनंती थांबा मंजूर करा या मागणीच्या अनुषंगाने रापम आगार माहूर च्या वतीने आगार व्यवस्थापक यांन दिनांक १९ जुलै २०२५ पत्र देऊन विनंती थांबा सुरु केला खरा परंतु अनेक एसटी बस त्याठीकाणी थांबत नसून रापम त्याबाबत कोणतीही कार्यवाही करीत नाही. त्यामुळे संबधित प्रशासनाने एकीकडे लेखी आश्वासन पत्रे देऊन बोळवण करून जनतेची व नागरिकाची फसवणूक केली, असा आरोप जिल्हाधिकाऱ्यांना सादर केलेल्या निवेदनात करण्यात आला.

यावेळी माहूर नगरपंचायत च्या माजी उपाध्यक्षा सौ.अश्विनी



आनंद पाटील तुपदाळे, जेष्ठ काँग्रेस नेते शेख मुस्सा, शेख शेरअली, शंकर राठोड, शेख अजगर,शाम जाधव,सुनील पवार, धनंजय जाधव, मनोज राठोड, देवसिंग चव्हाण, तारासिंग जाधव, दत्ता वाघमारे, किनवट माहूर विधानसभा उपाध्यक्ष सचिन बेहेरे, माजी शहर अध्यक्ष अहेमद कुरेशी, सलमान काजी, जमीर खान, शेख शरीफ, सैय्यद मन्नाण, शेख सादिक, जगदीश पाटील तुपदाळे, नवनाथ सूर्यवंशी, सरदार खान, सुशीलकुमार टाक, शेख जावेद,तरबेज खान पठाण, सलीम खान, रामसिंग जाधव, आबाराव महाराज, करण जाधव, सुनिल राठोड, चांद खान, शेख चंदू, राजू जाधव, सैय्यद जलील, शेख सुलतान, खेरूला खान, प्रल्हाद जाधव, मनोज जाधव, वाजीद खान, कदिर खान, रोशन खान, शेख सौकत यासह कार्यकर्ते व नागरिक मोठया संख्येने उपस्थित होते. त्यानंतर नांदेड येथे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ, खा. रविंद्र चव्हाण, जिल्हाध्यक्ष माजी आ. हणमंत पाटील बेटमोगरेकर, व राजेश पावडे या काँग्रेसच्या जेष्ठ नेत्यांच्या उपस्थितीत नक्षत्र लॉन्स येथे आयोजित असलेल्या भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्षाच्या आढावा बैठकीस शेकडो समर्थक व कार्यकर्त्यासह उपस्थिती लावली.

# जनसेवेच्या दीपस्तंभांना अभिवादन : नायगांवात चव्हाण कुटुंबाच्या कार्याचा गौरव सोहळा

**तभा वृत्तसेवा**
**नायगाव , दि. २७ ऑगस्ट -**

नायगांव नगरीने आज एक ऐतिहासिक व भावनिक सोहळा अनुभवला. 'ज्ञान स्मृती' स्व. आमदार बळवंतराव अमृतराव चव्हाण आणि स्व. खासदार वसंतराव बळवंतराव चव्हाण यांच्या पूर्णाकृती पुतळ्यांचे अनावरण विविध राजकीय व सामाजिक क्षेत्रातील दिग्गजांच्या उपस्थितीत अत्यंत भव्य स्वरूपात संपन्न झाले.

कार्यक्रमाची सुरुवात दि. २६ ऑगस्ट रोजी सकाळी जनता हायस्कूलच्या प्रांगणात झाली. स्व. बळवंत राव चव्हाण यांच्या पुतळ्यावर ड्रोनद्वारे पुष्पवृष्टी करण्यात आली. त्यानंतर खासदार छत्रपती शाहू महाराज (कोल्हापूर) यांच्या हस्ते पुतळ्याचे अनावरण करण्यात आले. या सोहळ्यास माजी मुख्यमंत्री अशोक चव्हाण, काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन पाटील, माजी मंत्री कमलकिशोर कदम, भास्करराव पाटील खतगावकर,



माणिकराव ठाकरे, अमित भैय्या देशमुख,माधवराव पाटील किन्हाळकर, आमदार जितेश रावसाहेब अंतापुरकर,माजी आमदार अविनाश घाटे, यांच्यासह अनेक खासदार,आमदार आणि स्थानिक नेते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यानंतर ॲग्री कॉलेजच्या प्रांगणात वसंत स्मृती म्हणून स्व. वसंतराव चव्हाण यांच्या पुतळ्याचे अनावरण करण्यात आले. येथेही ड्रोनद्वारे पुष्पवृष्टी करत त्यांना अभिवादन करण्यात आले. या दोन्ही कार्यक्रमांना स्थानिक नागरिक,सामाजिक कार्यकर्ते आणि नायगांव सह परिसरातील हजारो नागरिक या वेळी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमात खासदार रविंद्र चव्हाण यांनी अत्यंत भावूक शब्दांत आपल्या वडील व आजोबांच्या सार्वजनिक जीवनातील संघर्षाचे स्मरण केले. ते म्हणाले, विधानसभा निवडणुकीत पराभव झाल्या नंतर दुसऱ्याच दिवशी बाबा जनसंपर्क कार्यालयात उपस्थित होते. ते म्हणाले होते 'हार म्हणजे पराभव नाही, ती नव्या उमेदीची सुरुवात असते!' हे सांगताना त्यांच्या डोळ्यांत अश्रू दाटले होते.

माजी मुख्यमंत्री अशोक चव्हाण यांनी आपल्या भाषणात स्व. बळवंतराव चव्हाण आणि पद्मश्री शामराव कदम यांच्या कार्याचे कौतुक करत सांगितले, मी वेगळ्या पक्षात असलो तरी चव्हाण कुटुंबाशी आमचे भावनिक नाते कायम आहे. हा कार्यक्रम राजकीय नाही, तर पूर्णतः भावनिक आहे.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी असलेले माजी शिक्षण मंत्री कमलकिशोर कदम यांनी बळवंतराव चव्हाण यांच्या लढवय्या वृत्तीचे स्मरण करत गौरवोद्गार काढले खासदार रविंद्र चव्हाण हे आपल्या आजोबा आणि वडिलांच्या कार्याचे योग्य वारस आहेत.

कार्यक्रमाचे सुत्रसंचालन सिप्रा मानकर यांनी केले तर आभार प्रदर्शन आनंद चव्हाण यांनी केले. या पूर्णाकृती अनावरण सोहळ्याची काही विशेष वैशिष्ट्ये म्हणजे दोन पिढ्यांच्या लोकसेवेचा गौरव, विविध पक्षांचे नेते एकत्र आलेला ऐक्याचा अनुभव, आणि जनतेच्या मनात स्थान निर्माण करणाऱ्या नेत्यांचे स्मरण करणारा राजकीय मतभेदांपलीकडे जाणारा भावनिक कार्यक्रम.